MISRULE OF THE NIZAM &C.

i) "हैद्राबाद संस्थानांत हिंदूंची दुर्दशा".

प्रकाशक- [illegible]. ह. कुलकर्णी.

ii) Misrule of the Nizam.

Ed. D. Raghvendra Ra

हैद्राबाद संस्थानांत
हिंदूंची दुर्दशा

Plight of Hindus in the Hyderabad State.

95549

प्रकाशकः—
गो. ह. कुळकर्णी

किंमत चार आणे.

पुस्तक मिळण्याचें ठिकाणः— दि इंटरन्याशनल बुक सर्व्हिस
बुकसेलर्स, पब्लिशर्स, न्यूज एजंटस्, पुणें नं. ४.
Poona No. 4.

समर्पण

हैद्राबाद संस्थानच्या
राजकीय, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक इ०
सुधारणांचे आद्य पुरस्कर्ते व पुढारी
कै० ना. न्या. पंडित **केशवराव**, हायकोर्ट जज्ज,
ज्यांचे दातृत्व, स्वार्थत्याग, दया, क्षमा, शांति हे गुण
व
लोकसेवेबद्दलचे अहर्निश परिश्रम सर्व श्रुत आहेत;
ज्यांचे ता. २१ मे, १९३२ इ. रोजीं
पुणें येथें आकस्मिक निधन झालें,
त्यांच्या चिरस्मृतीची अत्यल्प
सेवा म्हणून
सादर समर्पण.

प्रकाशक.

हैद्राबाद संस्थानांतील हिंदू प्रजेचीं धार्मिक गाऱ्हाणीं.

निजाम इलाख्यांतील हिंदू प्रजेच्या धार्मिक हक्कांवर ज्या सरकारी वटहुकुमान्वयें नियंत्रण घालण्यांत आलें आहे, त्यांपैकीं कांहीं हुकूम ह्या पत्रकांत प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. त्यांवरून हिंदू प्रजेला आपले धार्मिक उत्सव व सण यथोचित थाटमाटानें साजरे करण्याचा जो नैसर्गिक हक्क आहे त्यावर कसे निर्बंध घालण्यांत आले आहेत हें दिसून येईल. वस्तुतः धार्मिक विधी अनिर्बंधपणें पार पडणें अशक्य होईल अशा रीतीनें आपल्या प्रजेच्या जन्मसिद्ध धार्मिक हक्कांत ढवळाढवळ करण्याचा कोणत्याहि सरकारला हक्क पोंहचत नाहीं. परंतु सरकारनें उदारपणें बहाल केलेल्या हक्कांशिवाय स्वतंत्र व जन्मसिद्ध असे कांहीं हक्क असूं शकतात याची जाणीवच सदरहू हुकूम प्रसिद्ध करणाऱ्यांना नव्हती असें दिसतें.

हुकूम नं. १ हा मोहरमाचे वेळीं दसरा आला असतां काय करावें याविषयीं प्रसिद्ध करण्यांत आला होता. हिंदूंनीं दसऱ्याचा सण वाद्यें न वाजवितां, इतकेंच नव्हे तर आनंदसूचक अशी कोणतीही वस्तु न वापरतां पाळावा आणि सीमोल्लंघनासही बाजा न वाजवितां (सुतक्याप्रमाणें !) जावें, असें ह्या हुकुमांत फर्माविण्यांत आलें आहे. दसऱ्याच्या दिवशीं बऱ्याच ठिकाणीं झेंडे उभारण्याचा सांप्रदाय आहे परंतु हा विधि मोहरमाच्या १५ व्या तारखेस म्हणजे मुसलमानांचा सण संपल्यानंतर करावा असेंही ह्या हुकुमांत जाहीर करण्यांत आलें आहे. मोहरम हा मुसलमानांचा सुतकी सण आहे, तेव्हां त्याच्याकरितां हिंदूंनीं आपला आनंदाचा सणहि सुतक्याप्रमाणें पाळावा असा हुकूम देण्यांत हिंदूंच्या मनोवृत्तींची पर्वा न करितां मुसलमानांच्या भावनांविषयीं आदर दाखवावा हा हेतु स्पष्ट दिसतो. स्वतःचे धार्मिक विधि पाळतांना इतर धर्मीयांच्या भावनांकडे लक्ष देऊं नये असें कोणीहि म्हणत नाहीं. परंतु याचा अर्थ असा नाहीं कीं, हिंदूंनींच आपले सण पुढें ढकलावेत व आपल्या भावना बाजूस ठेवून मुसलमानांपुढें नमतें घ्यावें.

हुकूम नं. २ मध्यें असें फर्माविण्यांत आलें आहे कीं, कोणताहि नवा धार्मिक उत्सव धर्मखात्याची अगाऊ परवानगी घेतल्यावांचून सार्वजनिक ठिकाणीं साजरा करण्यांत येऊं नये. मिरवणूक हें उत्सवाचें एक महत्त्वाचें अंग आहे; परंतु धार्मिक मिरवणुकी ह्या हुकुमाच्या कक्षेंत येत असल्यामुळें जिल्ह्याधिकाऱ्यांकडून त्यांना बंदी करण्यांत ह्या हुकूमाचा सर्रास उपयोग करण्यांत येतो. वस्तुतः सार्वजनिक रस्त्या-

वरून मिरवणूक काढण्याचा हक्क ब्रिटिश हिंदुस्थानांतील हायकोर्टानीं व खुद्द प्रिव्ही कौन्सिलनेंही मान्य केला आहे परंतु हा सर्वमान्य हक्क सदरहू हुकुमानें धाब्यावर बसविण्यांत आला आहे. ५२ इंडियन अपील्स (पृ. ६१) मध्यें प्रिव्ही कौन्सिलनें असा निर्णय दिला आहे कीं, " सार्वजनिक रस्त्यावरून योग्य लवाजम्यासह मिरवणूक काढण्याचा एक हक्क आहे, व त्या रस्त्यावरून जाणाऱ्या इतर लोकांच्या मार्गांत अडथळा होणार नाहीं, अशा बेतानें तो कोणत्याहि धर्माच्या लोकांस बजावतां येतो. मात्र सार्वजनिक शांततेचा भंग होऊं नये, किंवा रस्ता पूर्णपणें अडवला जाऊं नये, म्हणून मॅजिस्ट्रेट ज्या सूचना करील, त्यांची अंमलबजावणी होणें अवश्य आहे. " ऑल-इंडिया रिपोर्टर १९३१ अलाहाबाद मध्यें पृ. ४३१ वर प्रसिद्ध झालेल्या निकालांत न्या. सुलेमान म्हणतात, " सार्वजनिक रस्त्यावरून योग्य लवाजम्यासह धार्मिक मिरवणूक काढण्याचा प्रत्येक समाजास हक्क आहे. हा हक्क जन्मसिद्ध असून तो रूढीवर किंवा पूर्वापार वहिवाटविर अवलंबून नाहीं. अशी मिरवणूक अगदीं नवी असली तरी तिला कायदेशिर हक्कांचा पाठिंबा आहे. हा हक्क कोणत्याही वहिवाटीवर अवलंबून नसून स्वतंत्र असल्यामुळें, कित्येक वर्षें त्याची अंमलबजावणी झाली नाहीं ह्या सबबीवर तो नाहींसा होऊं शकत नाहीं. " सदरहू विद्वान् न्यायमूर्तींनीं त्याच निकालांत पुढें असें म्हटलें आहे कीं, " सार्वजनिक रस्त्यावरील मशीदींत किंवा मंदिरांत प्रार्थना अथवा पूजा करणाऱ्या लोकांना आपल्या प्रार्थनेंत किंवा पूजेंत व्यत्यय येतो या सबबीवर मशीदी किंवा देवळांपुढून जाणाऱ्या मिरवणुकींतील वाद्यें बंद करण्यास भाग पाडतां येणार नाहीं. धार्मिक किंवा इतर वाद्यांनीं एखाद्या धर्माच्या लोकांचीं मनें दुखविलीं जातात ह्या सबबीवर त्यांना मनाई करतां येणार नाहीं. मिरवणुकींतील वाद्यांनीं जशीं एका समाजाचीं मनें दुखविलीं जाण्याचा संभव आहे, तशींच वाद्यें बंद केल्यानें मिरवणुकींतील लोकांचीं मनें दुखविलीं जाण्याचा संभव आहे, त्यामुळें वाद्यें बंद करविण्याचा हक्क कोणासहि पोहोंचूं शकत नाहीं. " न्या. सुलेमान ह्यांनीं हुकूम नं.२-३-४ मधील तत्त्वें उत्तम रीतीनें सदरहू निकालांत खोडून काढलीं आहेत.

हुकूम नं. ३ व ४ मध्यें मशीदीपासून ३०० पावलांच्या आंत वाद्यें वाजविण्यास मनाई करण्यांत आली आहे. ही मनाई केवळ नमाजाच्या वेळेपुरतीच नसून नेहमींकरतां आहे ही त्यांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. ऑल इंडिया रिपोर्टर १९३० मद्रास पृ. ७०१ मध्यें असें ठरविण्यांत आलें आहे कीं, हिंदूंना वाद्यासह मिरवणूक काढण्याचा हक्क आहे,मात्र मिरवणुकीच्या योगानें सार्वजनिक रस्त्यावरील इतर लोकांस व्यत्यय येणार नाहीं अशी खबरदारी घेतली गेली पाहिजे व मॅजिस्ट्रेटनें कांहीं कायदेशीर सूचना दिल्या असल्यास त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे. ऑल इंडिया रिपोर्टर १९३१ अलाहाबाद पृ. ६७४ मध्यें असा निर्णय दिला आहे कीं, सार्वजनिक रस्त्यावरून धार्मिक व सामाजिक मिरवणूक काढण्याचा व मशिदींसमोरून जातां-

नाहि वाद्यें वाजविण्याचा हिंदुसमाजास हक्क आहे. त्याचप्रमाणें ठाकुरद्वारामध्यें वाद्यांसह भजन पूजन करण्याचा हक्क आहे. अर्थात् ह्या दोन्ही बाबतींत पोलिस अधिकाऱ्यानें किंवा मॅजिस्ट्रेटनें १४४ कलमाप्रमाणें किंवा दुसऱ्या एखाद्या कायद्याप्रमाणें जे हुकूम दिले असतील त्यांची अंमलबजावणी होणें अवश्य आहे.

धार्मिक पूजनविधीसंबंधानें ह्या निकालांत जीं तत्त्वें मान्य करण्यांत आलीं आहेत तीं थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहेतः—

(१) प्रत्येकास पूजन करण्याचा हक्क आहे.

(२) हा हक्क वहिवाटीवर अवलंबून नाहीं.

(३) हा हक्क अनियंत्रित नसून दुसऱ्यांच्या हक्कांनीं मर्यादित आहे.

(४) सरकारी अधिकाऱ्यांना आपल्या कायदेशीर हुकुमांनीं ह्या हक्कावर निर्बंध घालतां येतात. हे निर्बंध क्रि. प्रो. कोडच्या १४४ किंवा १३३ कलमाप्रमाणें अथवा पोलिस ॲक्टाच्या ३० व्या कलमाप्रमाणें घालतां येतील.

(५) दिवाणी कोर्टांना खासगी किंवा सार्वजनिक (Nuisance) च्या सबबीवर ह्या हक्कावर निर्बंध घालतां येत नाहीं.

मॅजिस्ट्रेट किंवा पोलिस अधिकाऱ्यांना सार्वजनिक शांततेच्या रक्षणाकरितां प्रासंगिक हुकूम देण्याचा अधिकार आहे असें वरील निकालावरून दिसून येतें; परंतु सरकारच्या परवानगीवांचून सार्वजनिक रस्त्यावरून कोणतीहि मिरवणूक काढण्यांत येऊं नये, असा सर्वसामान्य हुकूम काढणें म्हणजे प्रजेच्या जन्मसिद्ध हक्कांची पायमल्ली करून त्यांच्या मार्गांत विनाकारण व्यत्यय उत्पन्न करण्यासारखें आणि समाजासमाजांत भेदभाव उत्पन्न करण्यास अधिकाऱ्यांच्या हातीं एक साधन देण्यासारखें आहे.

सर्क्युलर नं. ५ मध्यें असा विचित्र हुकूम देण्यांत आला आहे कीं, हैद्राबाद शहरांत किंवा ज्या ठिकाणीं मुसलमानांची वस्ती जास्त असेल अशा ठिकाणीं जुन्या देवळांची दुरुस्ती किंवा वाढ करण्यांत येऊं नये. दुसरीकडे मशीदींना सरकारी मदत देण्याबाबत जीं सर्क्युलरें दिलीं आहेत त्यांची ह्या सर्क्युलरशीं तुलना केली असतां सरकारचें धोरण ह्या बाबतींत कोणत्याही राजकारणाच्या अथवा न्यायाच्या तत्त्वावर अवलंबून आहे असें म्हणतां येत नाहीं. सरकारी पैशाचा विनियोग मशीदी बांधण्याकडे व त्यांच्या डागडुजीकडे करण्यांत यावा, परंतु संस्थानांतील हिंदूंची संख्या शेंकडा ८५ असतां त्यांना मात्र ह्या सवलती कां देण्यांत येऊं नयेत हें समजणें कठीण आहे. ह्याशिवाय ह्या सर्क्युलरमध्यें असेंही फर्माविण्यांत आलें आहे कीं, खासगी व्यक्तीनें देखील स्वतःच्या खर्चानें देवळांची दुरुस्ती करूं नये. सदरहु हुकूम कोणत्या

तत्त्वांवर काढण्यांत आले आहेत व त्यांचा किती घातुक परिणाम होत असेल ह्याचा विचार वाचकांनींच करावा.

सक्युंलर नं. ६ ची मूलभूत कल्पना अशी आहे कीं, हैद्राबाद संस्थान हें इस्लामी संस्थान आहे आणि म्हणून मुसलमानांविषयीं आणि त्यांच्या धर्मांविषयीं सहानुभूति दाखविणें ह्या संस्थानचें कर्तव्य आहे. मुसलमानांच्या धार्मिक प्रगती-करितां प्रयत्न करण्यांत येऊं नयेत असें आम्ही म्हणत नाहीं परंतु कोणतेंही सरकार एका विशिष्ट धर्माचें असतें ह्या कल्पनेचाच आम्ही जोरानें निषेध करितों. सरकारनें सर्व समाजांविषयीं आपलें कर्तव्य सारख्याच प्रमाणावर बजाविलें पाहिजे. एका समाजास वरिष्ठ किंवा दुसऱ्यास कनिष्ठ ठरविणें हा जात्यभिमान आहे, व ह्यापासून सरकारनें अलिप्त राहिलें पाहिजे.

सक्युंलर नं. ७ हें नुकेंच निघालें असून त्यांत धार्मिक उत्सवांविषयीं आणि मिरवणुकींविषयीं नियम देण्यांत आले आहेत. ह्या नियमाप्रमाणें मिरवणुकीपूर्वी दहा दिवस जिल्ह्यांत तहसीलदारांकडे आणि हैद्राबाद शहरांत कोतवाल साहेबांकडे सूचना दिली पाहिजे, त्यामुळें खेड्यांपाड्यांतील लोकांना वाटेल त्या अंतरावरून तालुक्याच्य गांवीं धांव घ्यावी लागते. ह्या त्रासाशिवाय रयतेच्या मूलभूत हक्कांवरच ह्या हुकुमानें धाव घातला असून, सुधारलेल्या देशांतील वरिष्ठ न्यायकोर्टांनीं ठरविलेलीं तत्त्वें पूर्णपणें दृष्टीआड करण्यांत आलीं आहेत. ह्या नियमाप्रमाणें मिरवणुकीची परवानगी देण्यापूर्वी बेजबाबदार आक्षेपकांना आपले आक्षेप पुढें मांडण्याविषयीं संधि देण्यांत येते, आणि आक्षेपाचें साधन इतकें जबरदस्त आहे कीं, त्यानें मिरवणूक बंद झालीच पाहिजे. कारण आक्षेपित मिरवणुकींना बाबे हुकूमतची परवानगी घ्यावी लागते व तत्पूर्वी अनेक टप्प्यांतून हें प्रकरण जाणें भाग असल्यामुळें त्याला बराच कालावधि लागतो आणि त्यांत मिरवणुकीचा व उत्सवांचा जो हेतु असतो तोच निष्फळ होतो. शिवाय उत्सव जुना आहे कीं नवा आहे हें ठरविण्याची कसोटीहि मोठी चमत्कारिक व अनिश्चित आहे. सारांश, ह्या नियमांनीं रयतेच्या धार्मिक हक्कांत विनाकारण ढवळाढवळ केली जाऊन खोडसाळपणास चांगलेंच प्रोत्साहन मिळतें.

प्रजेच्या धार्मिक हक्कांवर नियंत्रण घालणारे इतरहि कांहीं हुकूम आहेत परंतु स्थलाभावीं ते येथें देतां येत नाहींत. ह्या सर्व हुकुमांचा किती विघातक परिणाम होत असेल आणि हिंदूंना किती अडचणी सोसाव्या लागत असतील ह्याची वाचकांना सहज कल्पना येऊं शकेल. सरकारी अधिकारी हे बव्हंशीं मुसलमान असल्यामुळें त्यांना मुसलमानांच्या मिरवणुकी व उत्सवासंबंधीं साहजिकच आपलेपणा वाटतो व त्यांच्या मार्गांत कधीं व्यत्यय येत नाहीं परंतु हिंदूंना मात्र हे नियम अत्यंत जाचक होतात. ह्या हुकुमांचा बहुतेक वेळां हिंदूंना विघातक असा अर्थ लावून त्यांच्या उत्सवास व

मिरवणुकीस बंदी करण्यांत येते किंवा निदान कांहीं काळ तरी व्यत्यय उत्पन्न करण्यांत येतो अशी हिंदूसमाजाची सार्वत्रिक तक्रार आहे.

कांहीं ठिकाणीं तर एका ठराविक रस्त्यानें मिरवणूक नेण्याची वहिवाट सिद्ध होऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं मंजुरी दिली असतांही स्थानिक अधिकाऱ्यांनीं कोणत्या-तरी सबबीवर अंमलबजावणींत टाळाटाळ केल्याचीं आणि गुंडगिरीला आळा न घालतां, कायदेशीर रीतीनें वागणाऱ्या लोकांच्या धार्मिक हक्कांचें रक्षण करण्याचे कामीं खबरदारी न घेतल्याचीं वाटेल तितकीं उदाहरणें आहेत. गुलबुर्गा येथील सात वर्षांपूर्वीं शरणबसप्पाच्या देवळासंबंधीं उपस्थित झालेला झगडा, त्याचप्रमाणें पैठण, परभणी, नांदेड, कळमनुरी, पालिम, बासर, बीड, बिदर, औंढा इत्यादि अनेक ठिकाणीं गणपतीच्या मिरवणुकीबद्दल व दिंडीबद्दल जीं प्रकरणें उपस्थित झालीं त्यांचा ह्यासंबंधीं उदाहरणें म्हणून उल्लेख करतां येईल.

पुष्कळ ठिकाणीं हिंदू देवतांच्या मूर्ति फोडल्या व छिन्नभिन्न केल्या गेल्या तरी गुन्हेगारांना शिक्षा देण्याचे कामीं कसोशीनें कोणतेही प्रयत्न करण्यांत आले नाहींत. स्थानिक वर्तमानपत्रें वाचणाऱ्या वाचकांना ह्या विधानाची सत्यता सिद्ध करून दाखविण्याचें कारण नाहीं. ह्या बाबतींत बीड, औंढा, उदगीर, अष्टी, देवनी, गंगाखेड आणि इतर बरींच उदाहरणें दाखवितां येतील.

ज्या ठिकाणीं मशिदी बांधण्याबाबत हिंदूकडून योग्य असे आक्षेप घेण्यांत आले होते, त्या ठिकाणींही मशीदी बांधण्यांत आल्या, उलटपक्षीं हिंदूंच्या देवळांची डागडुजी व वाढ करण्यास कांहीं तरी क्षुल्लक व असमर्थनीय कारणांनीं नकार देण्यांत आला. ह्या बाबतींत बीड, उदगीर, अष्टी, अटनूर, भाईमांडवा, इ. ठिकाणचीं उदाहरणें उल्लेखनीय आहेत.

इस्लामी धर्माच्या प्रचारकांना सरकारी अधिकाऱ्यांकडूनच नव्हे तर सुद्धां सरकारी तिजोरींतूनहि मदत करण्यांत येते. उलटपक्षीं हिंदुधर्मप्रचारकांना मात्र आपल्या प्रचारकार्यास कायदेशीर स्वातंत्र्य नाकारण्यांत येतें, इतकेंच नव्हे तर त्यांचा छळ करण्यांत येतो असें अनेक उदाहरणांवरून दाखवितां येण्यासारखें आहे.

सर्क्युलर नं. १

(सर्क्युलर नं. ३ ता. १३ आबान १३२६)

सरकारआलीचे आज्ञेवरून:-

ह्या वर्षीं दसरा मोहरममध्यें येत असल्यामुळें पुढीलप्रमाणें व्यवस्था करण्यांत येत आहे, त्याप्रमाणें प्रत्येकानें अंमल करणें भाग आहे.

(१) हैद्राबाद शहर व जिल्ह्यांतील सर्व हिंदूंनीं कोणतींहि वाद्यें न वाजवितां पूजा करावी.

(२) ज्यांना सीमोल्लंघनासाठीं बागेंत जावयाचें असेल त्यांनीं कोणतींही वाद्यें किंवा आनंदर्शक साधनें बरोबर न घेतां बागेंत जाऊन पूजा करावी.

(३) बदकम्मा (देवि) घेऊन बाहेर निघूं नये आणि हिंदूंनीं आपल्या घरांतील लहान लहान देवालयांतही वाद्यें वाजवूं नयेत.

(४) ज्या मोठमोठ्या व खास देवळांच्याभोंवतीं उंच भिंती असतील त्यांत साध्या वाद्यांसह हिंदूंना पूजा करतां येईल. पण देवळाच्याबाहेर त्यांनीं मुळींच निघतां कामा नये. मुसलमानांनीं देवळांतील पूजेंत व्यत्यय आणूं नये. हा अपवाद हिंदूंच्या घरगुती लहान देवळांना लागूं नाहीं अर्थात् अशा देवळांत पूजेच्या वेळीं त्यांनीं वाद्यें वाजवितां कामा नये.

(५) दसऱ्याचे झेंडे १५ मोहरमला उभारावे व त्यासंबंधीं पूजा व बलिदान इ. विधिहि त्याच तारखेस (१५ मोहरमला) करण्यांत यावे.

जो कोणी, मग तो हिंदू असो किंवा मुसलमान, याविरुद्ध वागेल त्यावर खटला करण्यांत येईल. पोलिसांनीं ह्या कायद्याची अंमलबजावणी करावी आणि त्यांत कोणत्याही प्रकारचा अतिरेक किंवा जुलूम न होईल अशी खबरदारी घ्यावी. पायगा इस्टेटस्, जाहागीरदार वगैरेंनीं आपापल्या हद्दींत हे नियम पाळावेत.

सर्क्युलर नं. २

(सर्क्युलर नं. ४ बाबत् सन १३२९ फ.)

हुकूम

जर कोणास एखादा धार्मिक उत्सव नव्यानें सुरूं करण्याची अथवा कांहीं काळापासून बंद असलेला उत्सव पुन्हां सुरूं करण्याची इच्छा असेल अथवा कोण्या मनुष्यास किंवा समाजास सार्वजनिक ठिकाणीं एखादा सार्वजनिक धार्मिक विधि करावयाची इच्छा असेल आणि अशा उत्सवामुळें आणि धार्मिक विधीमुळें दुसऱ्या समाजाचीं मनें दुखविलीं जाण्याचा संभव असेल अथवा सार्वजनिक शांततेचा भंग होण्याचा किंवा सार्वजनिक आरोग्यावर दुष्परिणाम होण्याचा संभव असेल तर धर्मखात्याच्या अधिकाऱ्यांमार्फत होम-सेक्रेटरीची परवानगी मिळेपर्यंत वरील उत्सवास किंवा धार्मिक विधीस बंदी करण्यांत येईल. होम-सेक्रेटरीचा ठराव नं. २१/७ ता० १२ मेहेर १३४० फ. अन्वयें धर्मखात्याचा अधिकारी ह्याचा अर्थ हैद्राबाद

शहरांत "नाझम-उमूर मजहबी" (धर्मखात्याचे मुख्य अधिकारी) आणि जिल्ह्यांत सुभेदार, तालुकदार व तहसीलदार हे होत. हैद्राबादेंत असा अर्ज धर्म खात्याच्या मुख्य अधिकाऱ्यामार्फत यावा लागेल आणि जिल्ह्यांत तो क्रमानें तहसिलदार, तालुकदार व सुभेदार ह्यांचे मार्फत धर्मखात्याच्या मुख्य अधिकाऱ्याकडे जाऊन मग बाबे-हुकूमत पुढें सादर करण्यांत येईल. ज्या धार्मिक खात्याच्या अधिकाऱ्यासमोर अर्ज दिला जाईल त्यानें आक्षेपकांचे लेखी आक्षेप घेऊन त्यावर स्वतःचें मत लिहून तो अर्ज क्रमानुसार वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठविणें भाग आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनींहि आपलीं मतें लिहून बाबे-हुकूमतच्या हुकुमाकरितां पाठवावा. जर तालुकदार किंवा सुभेदार ह्यांचा कनिष्ठ अधिकाऱ्यांशीं मतभेद असेल आणि एका किंवा अधिक पक्षांविषयीं पुन्हा चौकशी होणें अवश्य आहे असें त्यांचें मत असेल तर त्याप्रमाणें त्यांनीं चौकशी करून आपलीं मतें द्यावीं. हीं मतें बाबे-हुकूमत पुढें सादर करण्यापूर्वी एखाद्या पक्षाचें म्हणणें ऐकून घेण्याचा आणि पोलिस व मेडिकल खात्याचीं मतें मागविण्याचा आणि त्यावर स्वतःचें मत देण्याचाहि होम-सेक्रेटरीस अधिकार राहील. बाबे-हुकूमतनें सादर केलेल्या हुकुमांची सूचना पोलिस व मेडिकल खात्यास अवश्य ती व्यवस्था करतां यावी ह्या हेतूनें ताबडतोब देण्यांत येईल.

सर्क्युलर नं. २

फौजदारी सर्क्युलर नं. ३ ता. २५ बहमन १२९५ फसलीच्या सोबत दिलेल्या यादींतील १२ व्या कलमाप्रमाणें मशीदीसमोर वाद्यें वाजविण्यास मनाई करण्यांत आली आणि तसें करणें एक गुन्हा ठरविण्यांत आला. १३०६ च्या जाहिरपत्रकानें त्या हुकुमाची पूर्णपणें अंमलबजावणी करण्यास व जो कोणी ह्या हुकूम पाळणार नाहीं, त्यावर खटला भरण्यास पोलिस अधिकाऱ्यांना हुकूम देण्यांत आला आहे.

न्यायखात्याच्या कित्येक सन्माननीय अधिकाऱ्यांनीं व हैद्राबादेंतील कित्येक गृहस्थांनीं अशी लेखी तक्रार केली आहे कीं, मशीदीसमोर वाद्यें इतक्या जोरानें वाजविण्यांत येतात कीं यानें मानहानीशिवाय प्रार्थनेंतही व्यत्यय येतो व अशा वेळीं इमामची प्रार्थना व वाचन अनुयायांच्या कानांपर्यंत पोहोंचूं शकत नाहीं. धर्मखात्याच्या नाझमसाहेबांनीं त्या तक्रारीकडे सरकारचें लक्ष वेधलें आहे. प्रत्येकाच्या धार्मिक हक्काचें संरक्षण करणें हें सरकारचें काम आहे शिवाय मशीदीसमोर वाद्यें बंद ठेवण्याची जुनी वहिवाट आहे. तेव्हां ह्या हुकुमावरून असें जाहिर करण्यांत येत आहे कीं, मशिदीसमोर कोणत्याही प्रकारचीं वाद्यें वाजविण्यांत येऊं नयेत. मशीदीसमोर आल्याबरोबर वाद्यें बंद करण्यांत यावीं. जो कोणी ह्या हुकूम पाळणार नाहीं तो फौजदारी सर्क्युलर नं. ३ ता. २५ बहमन १२९५ फ. च्या यादींतील १२ व्या

कलमाप्रमाणें अपराधी होईल. ह्या हुकुमाची पूर्णपणें अंमलबजावणी होईल आणि कोणीही त्या विरुद्ध वागणार नाहीं. या बद्दल पोलिस अधिकाऱ्यांनीं खबरदारी घ्यावी. जो कोणी ह्याविरुद्ध वागेल त्यावर तावडतोब खटला भरण्यांत येईल.

अव्वल मदतगार मोतमद
अदालत

सर्क्युलर नं. ४

नाजम आणि मोतमद धर्मखातें ह्यांचें जाहीरपत्रक.

(नं. ४१४ ता. २८ आजुर १३१० फसली).

नबाब मदारूलमहाम बहादुर ह्यांच्या हुकुमावरून ह्या ऑफिसच्या सूचनेवरून मशीदीसमोर वाद्यें वाजविण्यासंबंधींचा मनाई हुकूम होम सेक्रेटरींनीं ह्या पूर्वींच प्रसिद्ध केला होता परंतु त्या संबंधीं वसूल झालेल्या तक्रारींवरून असें दिसतें कीं, त्या हुकुमाची अंमलबजावणी करण्यांत येत नाहीं व त्यामुळें पुष्कळ वेळां शांतताभंग व दंगा होतो करितां ह्या हुकुमान्वयें सरकारआलीच्या सर्व प्रजाजनांस कळविण्यांत येत आहे कीं, मशीदीपासून ३०० पावलांच्या आंत कोणत्याही प्रकारचें वाद्य वाजविण्यांत येऊं नये. जो कोणी ह्याविरुद्ध वर्तन करील त्यास गश्ती निशाण ३ ता. २५ बहमन सन १२९५ फ. सह देण्यांत आलेल्या यादींतिल १२ व्या कलमाखालीं खटला करण्यांत येईल. शिवाय मशीदीसमोर वाद्यें वाजविणें हा गुन्हा ठरविण्यांत आला असल्यामुळें सदरहू हुकूम मोडणारास १०० रु. दंडाची शिक्षा देण्यांत येईल.

नाजम धर्मखातें.

सर्क्युलर नं. ५.

जाहीर पत्रक.

निजाम सरकारचें गॅझेट भाग १ ला. पृ. ६१६
ता. २४ शहेरेवर १३०८ फसली.
धर्मखातें ता. १९-१०-१३०८ फ.

(नबाब मदारुलमहाम बहादर ह्यांचे हुकुमावरून.)

ह्या हुकुमान्वयें सर्व लोकांस असें जाहीर करण्यांत येत आहे कीं, हैद्राबाद शहरांत किंवा शहराबाहेर किंवा निजाम इलाख्यांत जेथें मुसलमानांची अधिक वसती असेल तेथें जुनीं देवळें व गढ्यांची सुधारणा किंवा वाढ करण्यांत येऊं नये. असल्या गढ्या वगैरे पूर्वीं ज्या स्थितींत असतील त्या स्थितींतच असूं द्याव्या.

इसाखान कुरेशी
धर्मखात्याचे मदतगार चिटणीस.

सर्क्युलर नं. ६

इस्लामी धर्माच्या मदतीकरितां रकमेची मंजूरी.

आलीजनाब माहाराजा यमीनुस सलतनत बहादुर
मदारुलमहाम ह्यांचा ठराव.

होम-सेक्रेटरी (धार्मिक विभाग) ह्यांजकडून नं. १८–१२
मि.नि. ६४ सन १३११ ता. ३ खुर्दाद् १३१८ फ. (१५ रबिलावल १३२८) हि. ता. ७ एप्रिल १९०९ इ.

प्रकरणः–

इस्लामच्या अनुयायांच्या इमारतींची बांधणी, सुधारणा आणि देखरेख ह्यासंबंधीं नियम.

खालील कागदपत्रें पुढें ठेवण्यांत व पाहण्यांत आलीः—

(१) होम सेक्रेटरी (धार्मिक विभाग) ह्यांचा ठराव नं. २१।७ ता. १२ मेहेर १३१० फ.

(२) फिनॉन्स ऑफिसचें पत्र पत्र नं. १२९९ ता. १३ शहरेवर १३१७ फ. हें एक इस्लामी संस्थान असल्यामुळें निजामसरकारास धार्मिक इमारतीविषयीं विशेष आस्था वाटते. धार्मिक देणग्यांसंबंधीं साधारण रीतीनें जरी ठराव नं. २१।७ ता. ३ जमादिलावल १३१९ मध्यें नियम करण्यांत आले आहेत तरी विशेषरीतीनें इस्लामी धर्माच्या इमारतींच्या बांधणी व सुधारणेबद्दल कोणतेही नियम तयार करण्यांत आलेले नाहींत. ही उणीव भरून काढण्यासाठीं अशा प्रकारचे नियम तयार करावयास धर्मखात्याच्या मुख्य अधिकाऱ्यास सुचविण्यांत आलें होतें. परंतु त्यांच्याकडून अद्याप नियम आले नाहींत.

नियम नसल्यामुळें फिनॅन्स ऑफिसनें रकमांची मंजुरी नाकारली त्या करितां होमसेक्रेटरींनीं स्वतः नियम तयार करून फिनॅन्स ऑफिसकडे पाठविले; परंतु याच्या उत्तरांत फिनॅन्स ऑफिसनें ता. २३ शहरेवर १३१८ फ. च्या नं. १२९९ च्या पत्रानें असें कळविलें कीं, धर्मखात्याकडूनच योग्य नियम तयार होऊं शकतील. त्यावरून ते नियम मंजुरी करितां हिज एक्झाल्टेड हायनेस यांच्या सेवेंत सादर करण्यांत आले आणि त्यावर पुढीलप्रमाणें हुकूम देण्यांत आला.

नियमांचा सारांश खालीं देण्यात आला आहे. हे नियम १३१८ फ. पासून अमलांत येतील.

नियम नं. १ ज्या इमारतींना हे नियम लागू आहेत त्या पुढीलप्रमाणें आहेतः–

(१) मशीद (२) ईदगा (३) "मकान आसार शरीफ"

व " तबरुक्कात " (४) खानकाह (५) मकाने वाज (६) मुकबरा (७) आशूरखाना.

नियम नं. २ उपरिनिर्दिष्ट इमारतींचे तीन प्रकार असतील.

(१) वस्ती असलेल्या किंवा ज्यांत पुढें वस्ती होईल अशा

(२) मौकुफा (दान दिलेल्या) ज्यांत वस्ती असेल किंवा पुढें होईल अशा.

(३) ज्यांत वस्ती नाहीं अशा.

नियम नं. ३ राज्यव्यवस्थेकरितां काढण्यांत आलेल्या हुकूम नं. २१ । ७ ता. १२ मेहेर १३१० फसलीप्रमाणें " नाझम " ह्या नांवाचा धर्मखात्याचा एक मुख्य अधिकारी असेल आणि सुभेदार, तालुकदार व तहसीलदार, हे अनुक्रमें सुभा, जिल्हा व तालुक्यांतील धर्मखात्याचे मुख्य अधिकारी समजले जातील. नाझम "उमुर मजहबी " (धर्मखात्याचे मुख्य अधिकारी) ह्यांच्या अधिकाराबाहेरील प्रकरणें होमसेक्रेटरीमार्फत बाबेहुकुमत पुढें ठेवण्यांत येतील.

नियम नं. ४:– धर्मखात्याचे स्थानिक मुख्याधिकारी (तहसिलदार व तालुकदार) अंदाजपत्रकांच्या सवलतीप्रमाणें वर्षातून प्रत्येक इमारतीवर ५० रु. खर्च करूं शकेल.

सुभेदार दरवर्षी प्रत्येक इमारतीवर रु. १०० खर्च करूं शकेल.

अंदाजपत्रकांत बचत होऊं शकत असेल तर प्रत्येक इमारतीकरितां धर्मखात्याचे नाजम १५० रु. पर्यंत मंजूरी देऊं शकतील, मात्र प्रत्येक इमारतीच्या किरकोळ खर्च सुधारणा व दुरुस्तीकरितां वर्षातून एकदांच रकमेची मागणी करितां येईल.

धर्मखात्याच्या दिवाणांनाही दरवर्षी प्रत्येक इमारतीच्या दुरुस्ती व किरकोळ खर्चाकरितां १५० रु. आणि नवीन इमारत बांधण्याकरितां ४५० रु. मंजूर करण्याचा अधिकार आहे. मुख्य दिवाणांना एका वर्षात एका इमारतीकरितां १००० रु. पर्यंत मदत देण्याचा अधिकार आहे. अधिक रकमेकरितां मुख्य दिवाणाचे अधिकाराबाबत जे नियम आहेत, त्यांतील १८ व्या नियमाप्रमाणें क्यॅबिनेट कौन्सिलची मंजुरी आवश्यक आहे.

नियम नं. ५ (अंदाजपत्रकांत मंजूर केलेल्या रकमेची विभागणी हैद्राबादशहर, जिल्हे व सुभे ह्यांत कशारीतीनें करण्यात यावी ह्याचें स्पष्टीकरण ह्या नियमांत करण्यांत आलें असून, रकमेचा विनियोग योग्य रितीनें व्हावा, कोणत्याही इमारतीविषयीं दुर्लक्ष

करण्यांत येऊं नये, मंजूर झालेल्या रकमा वर्षाअखेरपर्यंत खर्च झाल्याविना राहूं नयेत आणि आवश्यकतेप्रमाणें सुभेदाराच्या परवानगीनें एका जिल्ह्यांतील रक्कम दुसऱ्या जिल्ह्यांत उपयोजिली जावी, इ. सूचना देण्यांत आल्या आहेत.)

नियम नं. ६ (ज्या इमारतीकरितां रकमेची मंजूरी देण्यांत आली असेल त्या इमारतीबाबत कांहीं उत्पन्न असेल तर त्याविषयीं त्या इमारतीच्या " मुतवल्लीनें " स्थानिक धर्माधिकाऱ्यांस सूचना दिली पाहिजे. जर उत्पन्न नसेल तर चौकशीनंतर अंदाजपत्रकांतलि रकमेंतून व्यवस्था करण्यांत येईल. मंजूरी देणाऱ्या अधिकाऱ्याच्या अधिकाराबाहेर रकमेची अवश्यकता असल्यास क्रमाक्रमानें योग्य अधिकाऱ्यांची मंजूरी घेण्यांत येईल, इ.)

नियम नं ७ (या नियमांत अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबद्दल विवरण करण्यांत आलें असून त्यांत मुतवल्लीनें द्यावयाच्या माहितीचा पुढीलप्रमाणें तपशील दिला आहेः—

(अ) इमारतीबाबत कांहीं उत्पन्न आहे किंवा कसें ?

(आ) ज्या मोहल्ल्यांत इमारत असेल तेथील ज्या लोकांना सदर इमारतीचा उपयोग होत असेल ते खर्चाची तोंडमिळवणी करूं शकतात किंवा नाही.

(इ) इमारत पुराणवस्तु संशोधन दृष्टीनें महत्त्वाची आहे कीं काय ?

(ई) मदती करितां देण्यांत आलेला अर्ज फेंटाळून लावण्यांत आल्यास बहुसंख्याक प्रजेला त्रास होईल कीं काय ?

(उ) सदर कार्याप्रीत्यर्थ दुसरी एकादी योग्य अशी इमारत मिळूं शकेल काय ?

(ऊ) सरकारअलीच्या प्रजाजनांपैकीं निरनिराळ्या समाजांत तंटे उपस्थित होण्याचा संभव आहे काय?

(हा नमुना मुख्यधर्माधिकाऱ्यांनीं भरून दिला पाहिजे)

नवीन इमारत बांधल्यानें तंटे उपस्थित होण्याचा संभव असल्यास पोलिस खात्याची संमति आवश्यक आहे. आणि त्याचप्रमाणें आरोग्यखात्याची संमति अवश्यक असल्यास तीही घेण्यांत यावी इ.

नियम नं. ८ इमारत जर दुय्यम दर्जाची असेल तर चौकशीनंतर सरकारी मदतीची अवश्यकता आहे किंवा नाहीं व असल्यास कोणत्या प्रकारच्या मदतीची, ह्याविषयीं रिपोर्ट करण्यांत यावा.

नियम नं. ९ इमारत पहिल्या दर्जाची असेल तर साधारण दुरुस्तीच्या खर्चाचें अंदाजपत्रक नकाशासह सादर करण्यांत यावें.

नियम नं. १० (रकमेची मंजूरी ४५० रु. पर्यंत असेल तर मुख्य धर्माधिकाऱ्यांनीं सदरहु काम लोकलफंड किंवा खाजगी गुत्तेदारांमार्फत करवून घ्यावें, आणि रकमेची मंजूरी वरील रकमेइतकी किंवा त्यापेक्षां ज्यास्त असल्यास काम तामिरात खात्यातर्फे किंवा ज्याप्रमाणें नाझम अथवा सरकार खास हुकूम देतील त्याबरहुकूम करवून घेण्यांत यावें.)

नियम नं. ११ ह्या नियमांत काम कोणत्या पद्धतीनें करवून घेण्यांत यावें याचा तपशील देण्यांत आला आहे.

नियम नं. १२ ह्या नियमान्वयें खर्चाविषयींचे तक्ते सरकारकडे पाठविण्याची जबाबदार सरकारी अधिकारी अथवा गुत्तेदार ह्यांजवर राहील.

नियम नं. १३ ह्या ठरावान्वयें ठराव $\frac{3}{7}$ ता. १२ मेहर १३१० फ. चें दुसरें कलम रद्द करण्यांत आलें आहे.

(नोट) कंसांत दिलेले नियम सारांशरूपानें दिलेले आहेत.

आला हजरतांचें फर्मान.

धार्मिक उत्सवासंबंधीं नियम

(सदर आजम बहादूर यांच्या हुकुमावरून)

खालील नियम ता. १ तीर सन १३३८ रोजीं आलाहजरतांच्या फर्मानद्वारां मंजूर झाले आहेत.

दुसऱ्याच्या हक्काला व सार्वजनिक शांततेला बाध न आणतां प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य दिलें जावें, असेंच धार्मिक उत्सवाच्या बाबतींत सरकारचें धोरण चालत आलें आहे. त्याबरोबर पूर्वीपासून हे उत्सव चालत आले असतील, तर त्यांत सार्वजनिक शांततेस बाधक अथवा बाधक होण्याचा संभव असणारी कोणतीहि नवी बाब अमलांत येणार नाहीं याविषयींहि खबरदारी घेण्यांत आली आहे आणि याच धोरणास अनुसरून वेळोवेळीं हुकूम जारी करण्यांत आले आहेत. परंतु हे हुकूम निरनिराळ्या वेळीं जारी झाल्यामुळें व ते एकत्र नसल्यामुळें त्यांची अंमलबजावणी

करितांना केव्हां केव्हां गैरसमज होत असल्याचें सरकारआलीस आढळून आलें आहे. तेव्हां हा अनुभव लक्षांत घेऊन ज्या योगानें त्या हुकुमाच्या अंमलबजावणीतील अडचणी नाहींशा होऊन त्यांत एकसूत्रीपणा उत्पन्न होईल व पूर्वींपासून चालत आलेल्या उत्सवाकरितां परवानगीची आवश्यकता नसून ती फक्त नवीन उत्सवाकरितांच आहे, हें सरकारआलीचें धोरणहि व्यक्त होईल अशी दुरुस्ती व सुधारणा त्या हुकमांत करणें अवश्य आहे. करितां खालील नियम करण्यांत आले; त्यांची अंमलबजावणी जरिदा प्रसिद्ध झाल्या तारखेपासून करण्यांत येईल.

उत्सवाची व्याख्या.

हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती किंवा पारशी यांपैकीं कुणाचेहि सार्वजनिक, धार्मिक समारंभ, मिरवणुकी, विधी सर्वांचा या "धार्मिक उत्सव" या शब्दांत समावेश होतो.

(१) सार्वजनिक धार्मिक उत्सव मग तो जुना असो कीं नवा असो, करण्यापूर्वीं पंधरा दिवस अगोदर तहसीलदारास कळविणें हें सदर्हु उत्सव करूं इच्छिणाऱ्या व्यक्तीचें किंवा व्यक्तींचें कर्तव्य आहे. या मुदतींची गणना तहसीलदारास सूचना मिळाल्या दिवसापासून करण्यांत येईल. सूचनेच्याबरोबर जो उत्सव करण्यांत येणार आहे, त्याची थोडक्यांत माहितीहि देणें अवश्य आहे. वरील मुदतींत, 'मंजुरी मिळेपर्यंत उत्सव करण्यांत येऊं नये' असा हुकूम तहसीलदाराकडून न आल्यास त्यानंतर चालकांना सदर्हू उत्सव करण्याची मुभा राहील.

नोट—धार्मिक उत्सवाची आगाऊ सूचना देणें दोन कारणांमुळें अवश्य आहे. एक तर सदर्हू उत्सव आक्षेपार्ह नसतांहि प्रसंगीं पोलिसाच्या साह्याची अवश्यकता असण्याचा संभव आहे. दुसरें, अशी सूचना न दिली गेल्यास नियोजित उत्सव करावा किंवा करूं नये याचा नियम ३ प्रमाणें निकाल देण्यास तहसीलदारास संधि मिळणार नाहीं.

(२) उत्सव नवा नसेल तर नियम १ प्रमाणें सूचना मिळाल्यावर स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांना कळविण्यापलीकडे तहसीलदाराकडून दुसरी कांहीं कारवाई करण्यांत येणार नाहीं.

(३) नियोजित उत्सवानें सरकारआलीच्या प्रजेपैकीं कोणाचेंहि मन दुखवलें जाण्याचा संभव असो किंवा नसो उत्सव जर नवा असेल किंवा कांहीं योग्य कारणांनीं तो नवा असल्याची तहसीलदारास खात्री वाटत असेल, तर, 'त्या उत्सवास मंजुरीची आवश्यकता आहे, व लेखी मंजुरी मिळाल्याशिवाय तो करण्यांत येऊं नये,' असें उत्तर उत्सवाच्या चालकास तहसीलदाराकडून तावडतोब देण्यांत येईल. सदर्हू उत्सव नियम १ प्रमाणें सूचना मिळाल्या दिवसापासून एक आठवड्याच्या आंत

देलें जाणें अवश्य असून त्याची एक प्रत स्थानिक पोलिस अधिकाऱ्यास पाठविली जाईल.

नव्या उत्सवाची व्याख्या.

नोटः—या नियमांच्या हेतूस अनुसरून नव्या उत्सवाची व्याख्या करणें शक्य नाहीं. एकादा उत्सव कित्येक वर्षें बंद असेल पण त्यापूर्वी कमीअधिक प्रमाणांत व्यवस्थित रीतीनें कांहीं काळपर्यंत होत असेल तो नवा समजण्यांत येऊं नये.

याच्या उलट एकादा उत्सव वर्षानुवर्षें व्यवस्थित रीतीनें होत असला तरी त्यांत त्याचें स्वरूप पूर्णपणें बदलून टाकणारी एकादी नवी बाब समाविष्ट झाल्यानें किंवा परिस्थितींत बदल झाल्यानें उदा० वाद्यांचा उपयोग करण्याचें स्थळ किंवा रस्ता बदलण्यानें किंवा पूर्वी उत्सवाच्या वेळीं अस्तित्वांत नसलेल्या मशीदी, मंदिरें, आशुरखाने किंवा गिरजा इत्यादि रस्त्यांत बांधण्यांत आल्यानें तो उत्सव नवा असें म्हणावें लागेल. किंवा ज्या ठिकाणीं उत्सव करावयाचा असेल त्या ठिकाणीं तो नव्यानेंच होत असेल तर त्यास नवा उत्सव असें म्हणावें लागेल. उदा० हैदराबाद शहरांत २० वर्षांपासून गणपतींची मिरवणूक निघणें शक्य आहे, पण ती जर लातूर किंवा अदलाबाद येथें प्रथमच काढणें असेल, तर त्यास नवीनच उत्सव म्हणावें लागेल. सारांश या बाबतींत स्थानिक अधिकाऱ्यांनीं सारासार विचार करून सदर्हू नियमान्वयें त्यास देण्यांत आलेल्या अधिकाराच्या दुरुपयोगानें सरकारआलीच्या धार्मिक स्वातंत्र्यांत अवश्यक अडथळे उत्पन्न होणार नाहींत अशी खबरदारी घेणें अवश्य आहे.

(४) नियम ३ प्रमाणें तहसीलदाराकडून जर एखाद्या उत्सवास मनाई करण्यांत येईल तर उत्सवाच्या ठिकाणीं तावडतोब दवंडी पिटवून किंवा इतर मार्गांनीं असें जाहीर करण्यांत येईल कीं, अशा प्रकारचा उत्सव करण्यांत येणार आहे. तेव्हां ज्या कोणास यापासून अंतःकरणास धक्का पोंचण्याच्या सबबीवर आक्षेप असेल तर त्यानें एका आठवड्याच्या आंत आपले लेखी आक्षेप सविस्तर कारणासह तहसीलकचेरींत दाखल करावेत. एक आठवडा संपल्यावर पुढें कोणाच्याहि आक्षेपाचा विचार करण्यांत येणार नाहीं.

(५) उत्सवासंबंधीं वरील प्रकारचे आक्षेप कुणाकडून करण्यांत येवोत किंवा न येवोत तहसीलदारास अवश्य वाटल्यास उत्सव नवा आहे किंवा नाहीं हें ठरविण्यास अवश्य लागणारा साक्षीपुरावा घेण्याचा त्यास अधिकार आहे. सदर उत्सव नवा असल्याचें मान्य केलें गेलें असेल आणि तो नवा नसल्याबद्दल तहसीलदाराची खात्री पटली असेल व त्यासंबंधीं कोणताहि आक्षेप नसेल तर स्वतः मंजुरी देण्याचा त्यास अधिकार आहे. ही मंजुरी तावडतोब देण्यांत आली पाहिजे. परंतु उत्सव नवा असल्याचें सर्वांसच मान्य असेल किंवा तो नवीन उत्सवाच्या सदरांत

येतो असें पुराव्यानंतर तससीलदारास वाटल्यास त्याच्या मतासह ते सर्व कागद तालुकदाराकडे हुकुमाकरितां पाठविण्यांत येतील.

(६) ज्याच्या विषयीं आक्षेप घेतला गेला नसेल अशा नव्या उत्सवाची मंजुरी देण्याचा प्रामुख्यानें तालुकदारांसच अधिकार आहे परंतु अशा उत्सवाच्या संबंधी आक्षेप घेतला गेला असेल किंवा घेतला नसतांहि तालुकदारास कांहीं विशिष्ट कारणामुळें वरिष्ठ अधिकाऱ्यांची मंजुरी घेणें अवश्य वाटत असेल तर त्याच्या मतासह सर्व कागद मोतमदी अदालत व कोतवाली व रमूर आमाकडे पाठवून देण्यांत येतील.

(७) बाबे हुकुमतमध्यें जेव्हां हें प्रकरण येईल तेव्हां न्यायखात्याचे सेक्रेटरी या दोघांच्या मतासह व ते दोघेही हजर असतांना न्यायखात्याच्या सेक्रेटरीकडून पुढें मांडण्यांत येईल.

(८) ज्या ज्या खात्याशीं या प्रकरणाचा संबंध येईल त्यांनीं तावडतोब आपापलीं कामें करावीं.

(९) प्रेतयात्रा किंवा लग्नमिरवणुकी किंवा विधि हे सार्वजनिक स्थळीं करण्यांत आले तरी त्यांना वरील नियम लागूं नाहींत. त्याचप्रमाणें खाजगी किंवा सरकारी इमारतींत केले जाणारे धार्मिक समारंभ, मिरवणुकी किंवा विधि यांनाही जरी त्यांत सर्व लोकांना येण्याची परवानगी दिली असली तरी नियम लागू नाहींत.

(१०) वरील नियम जेव्हांपासून अंमलांत येतील तेव्हांपासून पूर्वीचे या-संबंधींचे सर्व हुकूम रद्द समजण्यांत येतील.

नवाब अकबर यारजंग,
सेक्रेटरी न्याय व पोलीस खातें.

गेल्या पांच वर्षांत संस्थानांतील संस्थांना व व्यक्तींना दिली गेलेली सरकारी मदत.

रु. मुसलमान

१३६२ अब्दुल अलि मुन्सिफ परगी
४८८२ / ११०० } सरदार अक्षमतुल्ला
३५,६३९ मुसलमान अनाथालय गुलगर्गा
९०० "उरसुलाअबाद"च्या लेखकास
२,००० नबाब हैदरजंग तचत बई
११३४ उस्मानिया कॉलेजचें मुखपत्र
२५० संपादक 'इस्ला-मिक कल्चर'
१४१० 'सुबह-दक्कन' वर्तमान-पत्र
२५०० 'सहीफा' " पत्र
१२०० दरगा-औरंगाबाद
४१० 'शाहनामा' इस्लामची सविस्तर व्याख्या.
१६२५ धार्मिक पुस्तक दिनियात
२००० 'मयरे सियम' वर्तमानपत्र
६१०० परभनणीची मस्जिद
६००० शाह मिरझा बेग
३६०० श्रीमती " "
४३२ दिनियातचीं पुस्तकें
४०० सिराजुल हुसेन कस्टम्स खाते
१५०० मशीदी
५०० हाजी अब्दुल रहीम
५००० तुर्कस्तानचे भूतपूर्व सुलतान
५०० हाजी शेख इस्मायल

रु. सार्वजनिक

५०,००० डिचपल्ली येथील महारोग्यांचा दवाखाना
४३०० आसफाबादमध्यें मदत
३५०,०० डिचपल्ली येथील महारोग्यांचा दवाखाना
८,००० हिमायत स्विमिंग बाथ
५,००० उर्दू गश्ती पुस्तकालय
५०० लेडी बार्टन बोलारम मेला
६०,००० छात्रवृत्त्या
३,००० पल्लमपेठ (पुराण वस्तुसंशोधन विभाग)
१२,००० डिचपल्ली कुष्ठालय
४०,००० को-ऑपरेटिव्ह विभाग
५,००० रेसकोर्स मैदान-सिकंद्राबाद
३,००० श्री. काळे यांना कांच बनविण्याचें शिक्षण घेण्याकरितां
३६० पोष्ट खाते
१४,००० रामप्पा देवालय वरंगल (पुराण वस्तुशोधन विभाग)
९०० लंडन टाइम्सचा इन्डियानंबर
५० स्थानिक पांच वर्तमानपत्रांना
१०,००० ब्रिटिश रेसिडेंटच्या शिकारीची व्यवस्था
१००० टिचर्स असोसिएशन मासिक
१०,००० मि. फतेहुल्लाबेग-एका खटल्यांत
४८८×३ टिचर्स मॅगेझिन
१००,००० विश्व भारती- अरबी भाषाविषयाकरितां
५०० दीन दयाल शर्मा दिल्ली
५,००० प्रो. कर्वे महिला विश्व विद्यालय
६०० वार्षिक "

गेल्या पांचवर्षांत संस्थानच्या बाहेरच्या संस्थांस व व्यक्तींना दिली गेलेली सरकारी मदत.

रु.	मुसलमान
१०,००० पौंड.	लंडन-कबरस्थान
६,००,०००	नज्द मदत
१०००	बलुचिस्तान लंगर
१०००	पेलेस्टाइन
५,००,०००	लन्डन-मस्जिद
१२०	मदीनाचे लोक
५०० पौंड.	लंडन छात्रालय
१००० ,,	,, दवाखाना
३०० ,,	मक्का ,,
१०,०००	दिल्ली ,,
५०००	,, विधवा फंड
५०००	निजामुद्दीन दरगा
२५००	अलिगड विश्वविद्यालय
२५०	बेदोनिन
५०० पौंड.	पॅलेस्टाइचे मुसलमान
५००० पौंड.	,, मस्जिदची दुरुस्ती
५२००	मद्रास-मुसलमान स्त्रियांचें शिक्षण
५००००	राष्ट्रीय विश्वविद्यालय (जमेमिल्लीया) दिल्ली
१०,००,०००	अलिगड-विश्वविद्यालय
२४०००	अलिगड विश्व-विद्यालयाच्या वार्षिक हप्त्यांत बढती
२०००	अजमेर
१९०००	खामगांव (बेरार) अँग्लो उर्दू पाठशाला
२०,०००	पानीपत मुस्लिम पाठशाळा
३,०००	वार्षिक
५० पौं.	शफी अहंमह
१९० पौं.	शफी अहंमह
७८०४	कुराणाचे इंग्रजी भाषांतर
१५०००	अवालेया दरगा

रु.	सार्वजनिक
२,००,०००	कृषी-संशोधन सभा-सिमला
५०,०००	व्हाइसरॉय रिलिफ फंड
२,००० पौं.	स्त्री-सभा
१०००	वाय. एम्. सी. ए.
१५०००	वाय. एम्. सी. ए.
१,०००००	वादन परिषद
५०,०००	सिन्द रिलीफ-काठियावाड
५००	कलाकौशल्य
१,१००००	बंगाल गव्हर्नरच्याकडे लोकांच्या मदतीकरितां दिले गेलेले
२५०००	मद्रास गव्हर्नरच्या जवळ दिले गेलेले
१५०००	ट्रॉपीकल इन्सटिट्यूट-कलकत्ता.
२५०००	सिन्द रिलीफ
१००	सागर
५०००	डोळ्याचा दवाखाना, दिल्ली
२,००,०००	अ.भा. स्त्री शिक्षण परिषद
२,००,०००	,, ,, दिल्ली
२,०००००	किंग एडवर्ड मेमोरियल दवाखाना
१५०००	हॉर्स शो.(घोड्यांचें प्रदर्शन)
३००	वार्षिक
५००	इर्व्हिन मेमोरियल फंड
१००००	कानपूर
१००० पौं.	आर्मस्ट्रॉंग पुस्तकालय

मदतीचें स्वरूप	मदत धर्मवार.					मदतीची रक्कम धर्मवार					
	पूर्ण संख्या	मुसलमान	हिंदु	पारसी	खिश्चियन किस्तान	एकंदर मदत	मुसलमानांना	हिंदूंना	पारशींना	खिश्चियनांना	शे. खुलासा
स्पेशल आणि रियायती अलौंस (भत्ता)	५०७	४६६	३७		४	२८,९७४	२६२८३०	१३८८४		७२६०	वार्षिक
स्पेशल आणि धार्मिक अलौंस (भत्ता)	६५१	६४१	६	१	३	२०५.४६	२०७६४२	१३४४	६००	२४६०	
उपकारी मदत	१२	१२				६१७०	५९७०				
मनसबदार	३२१८	२८५६	३४०	१३	९	९८९१३-९-६	८३४२७-६-६	१३४७५-८-०	१२९१-११-०	७१९—०—०	मासिक
संस्थानाच्या बाहेरच्या शाळांस सार्वजनिक शिक्षा विभागच्या डायरेक्टरकडून	३०	३०				१२७७४८	१२७७४८				वार्षिक
संस्थानच्या बाहेरच्या संस्थांस	७	७				३४३५७	३४३५७				

धार्मिक मदत						२०५८२२	१८९७४२	१०००		१४२८०	वार्षिक
अजुमने तरक्की उर्दू						५०,०००					
खाजा कमालुद्दिन						२८००					
मोइदुल इस्लाम						४००					
संपादक–पैसा अखबार						२३३४					
मुस्लीम आउट लुक						५८३४					
इंन्डियन न्यूज अँडर–टेटस्						२८००					

हैद्राबाद संस्थानांतील सरकारी नौकरींत हिंदूंचें प्रमाण.

हैद्राबाद संस्थानांत सन १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें हिंदूंची लोकसंख्या १,२२,०३,५०० व मुसलमानांची १५३४३६६ आहे. परंतु सरकारी नोकरींत त्यांचें प्रमाण व्यस्त आहे. हिंदु लोक कोणत्याहि दृष्टीनें मुसलमानांपेक्षां कमी योग्यतेचे नाहींत असें बिनदिक्कत विधान करतां येईल. असें असतां सरकारी नोकऱ्या त्यांना न देण्यास कोणतेंही योग्य कारण दिसत नाहीं. संस्थानांतील हिंदूमध्यें आंध्र, महाराष्ट्रीय आणि कर्नाटकी यांचा समावेश होतो. कोणत्याही राष्ट्रानें अभिमानानें पहावें अशा उच्च संस्कृतीचे त्याच्यावर संस्कार झाले आहेत. संस्थानांत त्यांच्या नोकरीविषयक प्रगतीच्या आड जर कोणती गोष्ट येत असेल तर तो त्यांचा धर्म होय.

संस्थानच्या कार्यकारी कौन्सिलांत फक्त अध्यक्ष हिंदू आहेत.इतर एकही सभासद हिंदू नाहीं. खास आलाहजरतांच्या पेशींतील दिवाणांना धरून पांच सभासद मुसलमान आहेत व एक युरोपियन आहे, कार्यकारी कौन्सिलच्या अध्यक्षांचे कचेरींत पांच अधिकारी आहेत. ते सर्व मुसलमान आहेत. मुख्य सेक्रेटरीच्या कचेरींत पांच अधिकाऱ्यांच्या जागा आहेत. पैकीं एक रिकामी असून बाकीच्या जागांवर सर्व मुसलमान आहेत. एकाही हिंदूला मुख्य सेक्रेटरियेटमध्यें जागा मिळूं शकली नाहीं.

पोलिटिकल सेक्रेटरियेट (मोतमद्दी सियासियात) मध्यें ९ जागा आहेत. पैकीं दोन रिकाम्या असून ४ मुसलमान, २ हिंदू आणि एक पारशी असे अधिकारी आहेत.

फायनान्शियल सेक्रेटरियेट (मोतमद्दी फिनान्स) मध्यें आठ अधिकारी आहेत. पकीं ४ मुसलमान, ३ हिंदू व १ पारशी आहे. रेव्हेन्यूसेक्रेटरियेट (मोतमद्दी मालगुजारी) मध्यें १८ अधिकारी आहेत पैकीं १३ मुसलमान, ५ हिंदू व १ युरोपियन आहे. ज्युडिशिअल सेक्रेटरियेट (मोतमद्दी अदालत) मध्यें ९ अधिकारी आहेत. ते सर्व मुसलमान आहेत. त्याचप्रमाणें लेजिस्लेटिव्ह सेक्रेटरियेट (मोतमद्दी वजे कवानीन) मध्यें ४ अधिकारी असून ते सर्व मुसलमान आहेत. मिलिटरी सेक्रेटरियेट (मोतमद्दी फौज) मध्यें व रिलिजस सेक्रेटरियेट (मोतमद्दी उमूर मजहबी) मध्यें सर्व अधिकारी मुसलमान आहेत. परिशिष्ट नं. २ प्रमाणें सर्व सेक्रेटरियेटमध्यें एकूण ७८ अधिकारी आहेत. पैकीं ५४ मुसलमान व १६ हिंदू आहेत.

फायनान्शियल डिपार्टमेंट (महकमे फिनान्स) मध्यें ४४ अधिकारी आहेत. पैकीं २६ मुसलमान व १५ हिंदू आहेत. (परिशिष्ट नं. ३ पहा.) रेव्हेन्यू डिपार्टमेंट (महकमे मालगुजारी) मध्यें ज्याचा प्रजेशीं जिल्हाळ्याचा संबंध आहे. एकूण ग्याझेटेड अधिकाऱ्यांची संख्या २२२ आहे. पैकीं १९६ मुलसमान असून फक्त २० हिंदू आहेत. (परिशिष्ट नं. ४ पहा.) ज्युडिशियल डिपार्टमेंट (महकमे अदालत) मध्यें

जेथें शेंकडा ८५ लोकसंख्याक हिंदूंच्या धर्मशास्त्रविषयक कज्जांचा निकाल लावावा लागतो तेथें १३६ अधिकारी मुसलमान आणि १२ हिंदू आहेत. (परिशिष्ट नं. ५ पहा.) जिल्ह्यांतून १४ डिस्ट्रिक्ट जज्ज (नाजम जिल्हा) व ७ ॲडिशनल डि. जज्ज (जायद नाजम जिल्हा) आहेत. परंतु त्यांपैकीं एकही हिंदू नाहीं. त्याचप्रमाणें ६ सरकारी वकील आहेत. तेही सर्व मुसलमान आहेत. सिटी सिव्हिलकोर्टांतील बारही जज्ज मुसलमान आहेत.

पोलिस व जेलखात्यांत मुसलमान अधिकाऱ्यांची संख्या ४० तर हिंदूंची फक्त १३ आहे. (परिशिष्ट नं. ६ पहा.) शिक्षणखात्यांत एकूण २७७ गॅझेटेड अधिकारी आहेत. त्यांपैकीं १८३ मुसलमान, ५३ हिंदू व २३ युरोपियन आहेत. डिव्हिजनल इन्स्पेक्टरच्या पांच जागा आहेत. पण त्यांवर एकही हिंदू नाहीं. उस्मानिया युनिव्हर्सिटी कॉलेज व सिटी कॉलेजमध्यें अनुक्रमें ७५ व ८ जागा आहेत त्यावर अनुक्रमें ११ व १ हिंदू असून बाकी सर्व मुसलमान आहेत. सदरहू कॉलेजांतून देशी व गीर्वाण (classical) भाषा शिकवाव्या लागतात म्हणून इतकी तरी हिंदूंची संख्या दिसते. (परिशिष्ट नं. ७ पहा.)

मेडिकल खात्यांत (महकमे तिबाबत) मध्यें ११८ अधिकारी आहेत. पैकीं ४१ मुसलमान व ४५ हिंदू आहेत. (परिशिष्ट नं. ८ पहा.) त्याचप्रमाणें पाब्लिक वर्क्स डिपार्टमेंट (महकमे तामीरात) मध्यें ११२ अधिकारी आहेत. त्यांपैकीं ६२ मुसलमान व ३४ हिंदू आहेत. (परिशिष्ट नं. ९ पहा) इतर खात्यांच्या मानानें ह्या दोन खात्यांमध्यें हिंदू अधिकाऱ्यांची संख्या जास्त दिसते, याचें कारण बहुधा हेंच असावें कीं, ह्या खात्यांत विशिष्ट शिक्षण घेतलेले पदवीधरच लागतात.

इतर खात्यांपैकीं, धर्मखातें (उमूर मजहबी) दुसर दिवाणी व मुलकी, पुराणवस्तुसंशोधन, सेन्सस व स्टॅटिस्टिक्स (खानेसुमारी) ह्या खात्यांत एकही हिंदु अधिकारी नाहीं. परिशिष्ट नं. १० मध्यें इतर गॅझेटेड अधिकाऱ्यांची संख्या दिली आहे. त्यांत १८६ एकूण अधिकाऱ्यांपैकीं १२६ मुसलमान व ४० हिंदू आहेत.

एकंदर गॅझेटेड अधिकाऱ्यांपैकीं ८७५ मुसलमान असून २४९ हिंदू आहेत. मुसलमान अधिकाऱ्यांना एकूण पगार दरमहा ४८३७५४ रु. आणि हिंदू अधिकाऱ्यांना, दरमहा १२३११७ रु. ८ आ. मिळतो.

खालच्या जागासंबंधीं आंकडे मिळत नसल्याकारणानें त्यासंबंधीं कांहीं निश्चित विधान करतां येत नाहीं. परंतु एवढें खात्रीनें सांगण्यास हरकत नाहीं कीं, खालच्या जागांवर हिंदूंचें प्रमाण उच्च दर्जाच्या जागांइतकेंच किंबहुना त्यापेक्षांहि कमी पडलें.

परिशिष्ट १ ते १०

या परिशिष्टांमध्यें दिलेले आंकडे सन १९३१ च्या सिव्हिल लिस्टमधून घेतले आहेत.

संस्थानांतील सरकारी नोकरीमध्यें भिन्न भिन्न अधिकाऱ्यांचें प्रमाण दाखविणारें परिशिष्ट.

अनुक्रम नंबर	नांव.	अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	मुसलमान अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	हिंदु अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	पारशी अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	इंग्रज अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	सर्व अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्या सुद्धां.	मुसलमान अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्या-सुद्धां.	हिंदु अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्या-सुद्धां.	पारशी अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भ.सु.	इंग्रज अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्या-सुद्धां.	(फक्त गॅझेटेड अधिकाऱ्यां-संबंधीं शेरा.)
	परिशिष्ट नंबर १ एक्सेक्युटिव्ह कौन्सिल.						रु.					
१	अध्यक्ष एक्सेक्युटिव्ह कौन्सिल	१	०	१	०	०	७०००+१०००	०	७०००+१०००	०	०	
२	सदरुल महाम	७	६	०	०	१	२६२५०+ ९५०	२२२५०+७००	०	०	४०००+३५०	
३	अध्यक्षांच्या कचेरींत	५	५	०	०	०	२१२०+ ७००	२१२०+७००	०	०	०	
	एकूण...	१३	११	१	०	१	३८८२०	२६५७०	८०००	०	४२५०	
	परिशिष्ट नंबर २. मोतमया (सेक्रेटरीयेटस)											
१	मुख्य सेक्रेटरीयेट	५	४	०	०	०	२३००+ २१०	२३००+२१०	०	०	०	एक खालीं

२	मोतमद् सियासत (पोलिटिकल सेक्रेटरीयेट)	६	४	२	१	०	४१२५०	२६००	७२५	८००	०	दोन खाली
३	मोतमदी फायनान्स (फायनान्शिल सेक्रेटरीएट)	८	४	३	१	०	६१४०+१५००	३४१५+१३००	१९७५+२००	७५०	०	
४	मोतमदी माल गुजारी (रेव्हेन्यु सेक्रेटरीएट)	१९	१३	५	०	१	१६१२५+२५२०	८३३५+११२०	४५५०+१००	०	३२००+१३००	
५	ज्युडिशियल सेक्रेटरीएट (मोतमदी अदालत)	९	९	०	०	०	७५००+ ३५०	७५०+३५०	०	०	०	
६	मोतमदी तामीरात (पब्लिक वर्कस सेक्रेटरियेट)	१३	८	४	०	१	१०६०५+१२५०	६७०५+९००	२४००+५०	०	१५००+३००	
७	ड्रनेज सेक्रेटरिएट	२	१	१	०	०	२१५०+ ६००	१८००+५००	३५०	०	०	
८	मिलिटरी सेक्रेटरीएट (मोतमदी फौज)	५	५	०	०	०	४०५०+ ५००	४०५०+५००	०	०	०	
९	मोतमदी उद्योगधंदे खाते.	३	१	१	०	१	४०२५+१३२५	४५०	३७५	०	३२००+१३२५	
१०	मोतमदी कायदे कौन्सिल	४	४	०	०	०	३९००+ ४००	३९००+४००	०	०	०	
११	रिलिजस सेक्रेटरीएट (मोतमदी उमूर मजहबी)	१	१	०	०	०	१५००	१५००	०	०	०	
	एकूण...	७८	५४	१६	२	३	१०८२८०	४८०५५	१०७२५	१५५०	१०८२५	
	परिशिष्ट नंबर ३ **फायनान्स खातें.**											
१	फायनान्स खातें	२८	१८	८	१	१	२०४९०+११०५	१२४४५+९००	६६१०+२०५	७५०	६८५	

अनुक्रम नंबर	नांव.	अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	मुसलमान अधिकाऱ्यांची संख्या.	हिंदु अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	पारशी अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	इंग्रज अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	सर्व अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्या-सुद्धां.	मुसलमान अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्या-सुद्धां.	हिंदु अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्या-सुद्धां.	पारशी अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भ.सु.	इंग्रज अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्या-सुद्धां.	(फुल गॅझेटेड अधिकाऱ्यांसंबंधी) शेरा.
२	सदर खजाना(सेंट्रल ट्रेझरी)	१	०	१	०	०	५२५	०	५२५	०	०	
३	मुंतजमखजाना	१५	८	६	१	०	४८५०	२५४०	१९६०	३५०	०	
	एकूण...	४४	२६	१५	२	१	२६९७०	१५८८५	९३००	११००	६८५	
	परिशिष्ट नंबर ४ –रेव्हेन्यू खातें–											
१	सुभेदार	४	३	०	१	०	६०००+ ८००	४५००+३००	०	१५००+१५००+५००	०	
२	नायब सुभेदार	४	४	०	०	०	१६००	१६००	०	०	०	
३	तालुकदार	१५	१४	०	१	०	१५९००+ २००	१४९००+२००	०	१०००	०	
४	खासतालुकदार	१	१	०	०	०	१०००	१०००	०	०	०	
५	नायबतालुकद. (असिस्टंट)	४०	३७	३	०	०	२००५०+ ४५०	१८४००+४५०	१६५०	०	०	
६	तहसिलदार (मामलेदार)	११२	१०२	९	१	०	३१०१५+ ७०	२८५४०+७०	२१००	३७५	०	
७	प्रोबेशनर मामलेदार	१८	१२	६	०	०	२१८५	१३५०	८३५	०	०	
८	सरफखास इलाख्यांतील तहसिलदार	४	४	०	०	०	६७५	६७५	०	०	०	

९	बंदोबस्त खातें	४	३	०	१	०	३२००+ २५०	२५५०+२००	०	०	०
	(सेटलमेंट डिपार्टमेंट)									६५०+ ५०	०
१०	मद्दगार बंदोबस्त	९	८	०	१	०	४९५०+१०८०	४३५०+९६०	०	६००+ १२०	०
११	जमाबंदी अधिकारी	२	२	०	०	०	६२५+ ८५	६२५+ ८५	०	०	०
१२	नायबमद्दगार	२	०	१	१	०	४००+ ८५	०	२००	२००+ ८५	०
१३	ल्यॉंड रिकार्ड ऑफिस (निमत्तानदार)	५	४	१	०	०	११७५	८५०	३२५	०	०
१४	प्रोबेशनर	२	२	०	०	०	२००	२००	०	०	०
	एकूण...	२२२	१९६	२०	६	०	९१९९५	८१८०५	५११०	४६-०	०

परिशिष्ट नंबर ५
—न्यायखातें—

१	हायकोर्ट न्यायाधीश	८	६	२	०	०	१६५००+ १००	१२५००+१००	४०००	०	०
२	रेजिस्ट्रार	२	२	०	०	०	१४००	१४००	०	०	०
३	हायकोर्टातील मुख्य सुपरिंटेंडेंट (मुंतजीम)	३	३	०	०	०	११२५	११२५	०	०	०
४	सरकारी वकील	६	६	०	०	०	१४००	१४००	०	०	०
५	सिटी सिव्हिल कोर्टाचे न्यायाधीश	४	४	०	०	०	२९७५	२९८५	०		०
६	सिटिमॅजिस्ट्रेट	५	४	१	०	०	३४५०+ १००	३०७५+१००	३७५	०	०
७	काजीचें कोर्ट	१	१	०	०	०	९००	९००	०	०	०
८	जिल्ह्याचे स्पेशल मॅजिस्ट्रेट	१	१	०	०	०	८००	८००	०	०	०

अनुक्रम नंबर	नांव.	अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	मुसलमान अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	हिंदु अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	पारशी अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	इंग्रज अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	सर्व अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्यासुद्धां.	मुसलमान अधिकाऱ्यांची एकूण मासिक पगार भत्त्यासुद्धां	हिंदु अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्यासुद्धां.	पारशी अधिकाऱ्यांची एकूण मासिक पगार भ.सु.	इंग्रज अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्यासुद्धां.	(फूल गॅझेटेड अधिकाऱ्यांसंबंधीं) शेरा.
९	सेशन कोर्टाचे न्यायाधीश	७	६	१	०	०	८२००+ ३००	७३००+३००	९००	०	०	
१०	जिल्हा न्यायाधीश (डिस्ट्रिक्टज्ज)	१४	१४	०	०	०	११०५०	११०५०	०	०	०	
११	ॲडिशनल सिव्हिलजज्ज (जादा दिवाणी न्यायाधीश)	७	७	०	०	०	३७००	३७००	०	०	०	
१२	मुनसिफ (३०० ते ६००	११	१०	१	०	०	६०००	५४५०	५५०	०	०	
१३	मुनसिफ (२५० ते ४००	८०	७२	७	१	०	२६२८५	२३६८५	२२७५	३२५	०	
	एकूण...	१४९	१३६	१२	१	०	८४२८५	७८८६०	८१००	३२५	०	
	परिशिष्ट नंबर ६. -पोलीस व जेलखातें-											
१	जेलखातें	४	३	०	०	१	१३७५+ ५०	११००	०	०	२७५+ ५०	
२	सिटी व शहराखालील प्रांताचे पोलीस	१०	८	२	०	०	६९००	५०००	१९००	०	०	

३ डायरेक्टर जनरलचे कचेरींत	९	४	२	०	२	८१००+२७६२	२५५०+५३०	१५००+२००	०	४०५०+२०३२	एक जाग खाली
४ खास पोलिस अधिकारी	१	०	०	०	१	१०००+ ५००	०	०	०	१०००+५००	
५ पोलीस ट्रेनिंग कॉलेज	२	१	१	०	०	९५०+ २००	३००+ ५०	६५०+ ५०	०	०	
६ पोलीस सुपरिंटेंडेंट	१८	१३	५	०	०	११५०	९०००	२४५०	०	०	
७ पोलिस असिस्टंट सुपरिंटेंडंट (मद्‌दगार मुंतजीम)	१५	११	२	१	०	३९००+ ४८०	३१००+३४५	३००+ ३०	०	०	एकूण जा खाली
८ क्रिमिनल सेटलमेंट ऑफिसर	१	०	१	०	०	५५०+ ५०	०	५५०+ ५०	०	०	
एकूण...	६०	४०	१३	१	४	३८२६७	२१९७५	८८५५	३३०	७९०७	
परिशिष्ट नंबर ७ —शिक्षण खातें—											
१ डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन	५	४	१	०	०	४३३५+ ३७५	३८३५+३००	५००+ ७५	०	०	
२ डायरेक्टर फिजिकल ट्रेनिंग	१	०	०	०	१	१५२५	०	०	०	१५२५	
३ डिव्हिजनल इन्स्पेक्टर	५	५	०	०	०	३७१०+ ३००	३७१०+३००	०	०	०	
४ इन्स्पेक्ट्रेस गर्ल्स स्कूल (मुलींच्या शाळेचे परीक्षक)	१	०	०	०	१	१०००+ १००	०	०	०	१०००+१००	
५ जिल्हा इन्स्पेक्टर	१७	१३	४	०	०	५६६५+ १६०	४०५५	१६१०+१६०	०	०	
६ निझाम कॉलेज	१७	७	९	०	१	८६७०+ ६२५	३७८५*	३७८५	०	१०००	

अनुक्रम नंबर	नांव.	अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	मुसलमान अधिकाऱ्यांची एकूण संख्या	हिंदु अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	पारशी अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	इंग्रज अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	सर्व अधिकाऱ्यांची एकूण मासिक पगार भत्त्या सुद्धां.	मुसलमान अधिकाऱ्यांची एकूण मासिक पगार भत्त्या सुद्धां	हिंदु अधिकाऱ्यांची एकूण मासिक पगार भत्त्या सुद्धां.	पारशी अधिकाऱ्यांची एकूण मासिक पगार भ.सु.	इंग्रज अधिकाऱ्यांची एकूण मासिक पगार भत्त्या सुद्धां	(फल गॅझेटेड अधिकाऱ्यां-संबंधीं) शेरा.
७	उस्मानिया युनिव्हर्सिटी ऑफिस	३	३	०	०	०	१७३०+ २००	१७३०+२००	०	०	०	
८	मद्रसे आलिया	२	१	०	०	१	८१०+ १५०	३१०+१५०	०	०	५००	
९	ट्रॅन्सलेशन ब्यूरो भाषांतर खातें	२१	२०	१	०	०	१०५१५	१००९०	४२५	०	०	
१०	उस्मानिया मेडिकल कॉलेज	१८	७	७	२	१	५२१५+२७६७-८	२६५०+९५००	२५३५+७६७-८-	५००	२००	एक जागा खाली
११	उस्मानिया युनिव्हर्सिटी कॉलेज	७५	५६	११	०	१	३६७००+२३००	२९९९०+९७००	५२१०+५००	०	१५००+१००	सात जागा खाली
१२	एंजिनियरिंग कॉलेज	९	८	१	०	०	४३५०	३८२५	५२५	०	०	
१३	सिटि इंटरमिजिएट कॉलेज	८	६	१	०	१	२४६०+ ३५	१७४०	२९५+ ३५	०	४२५	
१४	झनाना कॉलेज	५	३	०	०	२	१८२५	९२५	०	०	९००	
१५	इतर कॉलेजें व हायस्कूल	९०	५०	१८	२	२०	३४५२०+२०७६	१७९४०+९४४	६०५०	७५०	९८८०+९९३०	
	एकूण...	२७७	१८३	५३	४	२९	१३२११७-८-	८९४८०	२२६०२-८-	१२५०	१८१६०	

	परिशिष्ट नंबर ८ —मेडिकल खातें—										
१	मेडिकल डायरेक्टर ऑफिस	३	२	०	०	१	४५५०+ ६००	१५००+ ५०	०	०	३०५०+१००	
२	केमिकल एक्झॅमिनर	१	०	०	१	०	७५०+ २५०	०	०	७५० २५०+	०	
३	मेडिकल स्टोअर्स	१	१	०	०	०	५५०+ २००	५५०+२००	०	०	०	
४	सिव्हिलसर्जन	२१	५	४	२	३	१०९००+१२९५-५-	३६००+१२५	२३५०+ ७५	१५०० ६५०	३४५० ५ +४४५	सा.जा. खा.
५	लेडीसिव्हिलसर्जन	५	०	१	१	२	२९००	०	२५०	९००	१४५०	ए. जा. खा.
६	लेडीअसिस्टंटसर्जन	११	१	२	२	६	२९५०+ ५०	२००	४५०	५५० ५०+	१७५०	
७	असिस्टंटसर्जन	६१	२०	३७	२	२	१५१००+१४०५	५०५०+४०५	८९००+८५०	८५० १५०+	४००	
८	मलेरियल ऑफिसर	२	१	१	०	०	६५०+ ३५०	२००+ ५०	४५०+३५०	०	०	
९	मेट्रन्स	२	०	०	०	२	५१०	०	०	०	५१०	
१०	युनानी हॉस्पिटल	९	९	०	०	०	२६५०	२६५०	०	०	०	
११	युनानी मेडिकल स्कूल	२	२	०	०	०	६००	६००	०	०	०	
	एकूण...	११८	४१	४५	८	१६	४६२६०–५–०	१५६३०	१३९७५	५५५०	११९५५-५-०	
	परिशिष्ट नंबर ९ —पब्लिक वर्क्स खातें—										
१	सुपरिंटेंडिंग एंजिनियर	४	४	०	०	०	६०००	६०००	०	०	०	
२	एक्झेक्युटिव्ह ”	१६	८	५	१	०	१२३००+ ६००	७६००+५००	४२००	५०० १००+	०	२ जा. खा.
३	असिस्टंट एंजिनियर	२८	१७	४	२	२	१२८००	८४२५	२०७५	१२९०	११००	३ जा. खा.
४	प्रोबेशनर ”	४	३	१	०	०	१४००	१०५०	१५०	०	०	

अनुक्रम नंबर	नांव.	अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	मुसलमान अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	हिंदु अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	पारशी अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	इंग्रज अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	सर्व अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्यासुद्धां.	मुसलमान अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्यासुद्धां.	हिंदु अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्यासुद्धां.	पारशी अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भ.सु.	इंग्रज अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्यासुद्धां	(फुल गॅझेटेड अधिकाऱ्यांसंबंधीं) शेरा.
५	मदतगार एंजिनियर	२४	१२	११	०	१	८५४५	४१७५	४०००	०	३७५	
६	इतर जागा पी. डब्ल्यु. खात्यांतील	३६	१८	१३	१	४	२४३५०+ ९२५	१२३७५+६७५	७४२५+२५०	८००	३७९०	
	एकूण...	११२	६२	३४	४	७	६६९२०	३५४००	१८३००	२६००	५२२५	
	परिशिष्ट नंबर १० —मिसलनियस (किरकोळ-)											
१	राजपुत्र व साहेबजादे याचे कोर्ट रॉलर्स	५	१	०	०	४	७६८०+१६९१-११-०	३३०	०	०	७३५० १६९१+११०	
२	मिंट इलेक्ट्रिकसिटी स्टॅंप खातें	८	३	२	१	२	५१००	८५०	६५०	१०००	२२५०	
३	फॉरेस्ट (जंगल) खातें	१८	१३	३	१	१	१२९१०	१७९०	१९००	३२०	१०००	
४	फॉरेस्ट बंदोबस्त	२	२	०	०	०	१२००+ २४०	१२००+२४०	०	०	०	
५	करोडगिरी खातें	२५	१९	३	३	०	१३८७०+ ४७४	९९७०+२२४	११५०	२७५०+२५०	०	

६ अबकारी खातें कमिशनर नायब व मदतगार „	३	२	०	१	०	३६००+ २५०	१५५०	०	२०५० २५०	०
७ अबकारी तालुकादार	४	२	२	०	०	२७००	१४००	१३००	०	०
८ अबकारी सुपरिंटेंडंट	१७	१४	१	०	२	८०००	६५००	६००	०	९००
९ मुंतजीम आफू	१	१	०	०	०	३००	३००	०	०	०
१० खाणी खातें	५	३	२	०	०	२९००	२०००	९००	०	०
११ शेतकी खातें	९	३	५	१	०	४६७+ १५०	१७४०+१००	२५३५	४००+ ५०	०
१२ व्यापार व उद्योगधंदे खातें	५	२	३	०	०	३७५०+ ७०	१८००	२२००+ ७०	०	०
१३ कॉटेजइंडस्ट्री	३	०	३	०	०	९७०+ ३५	०	९७०+ ३५	०	०
१४ उद्योगधंद्याची प्रयोग शाळा	६	३	३	०	०	२९२०+ ५०	१६२०	१३००+ ५०	०	०
१५ इन्सेक्ट स्टीमबॉइलर	३	१	१	०	१	१७७५+ ५५०	३००	२७५	०	१२००+५५०
१६ कोऑपरेटिव्ह सोसायटी	१५	१२	२	०	१	६३७५+ १००	५२००+१००	७७५	०	४००
१७ टपाल खातें	१०	८	१	१	०	४७५५	२३५५	२००	१२००	०
१८ सदारत आलीया	१	१	०	०	०	५००+ ५०	५००+ ५०	०	०	०
१९ उमूर मजहबी	२	२	०	०	०	५५०	५५०	०	०	०
२० दफ्तर दिवाणी व माल	७	७	०	०	०	२६५०	२६५०	०	०	०
२१ सेंट्रल प्रेस	३	२	१	०	०	१५७०+ २९०	६७०+५००	९००+२४०	०	०
२२ निझामिया आब्झरवेटरी	१	०	१	०	०	७००	०	७००	०	०
२३ सरकारी लायब्ररी	१	१	०	०	०	६००	६००	०	०	०
२४ टेलिफोन	२	१	१	०	०	१२७५+ १५०	४५०+ ५०	८००+१००	०	०
२५ व्हेटरनरी	७	२	५	०	०	३५३०+ ४५०	१५३०+३५०	२०००+१००	०	०

अनुक्रम नंबर.	नांव.	अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	मुसलमान अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	हिंदू अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	पारशी अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	इंग्रज अधिकाऱ्यांची एकूण संख्या.	सर्व अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्या सुद्धां.	मुसलमान अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्या सुद्धां	हिंदू अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्या सुद्धां	पारशी अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भ.सु.	इंग्रज अधिकाऱ्यांचा एकूण मासिक पगार भत्त्या सुद्धां	(फुल गॅझेटेड अधिकाऱ्यां-संबंधीं) शेरा.
२६	पाब्लिक गार्डन	१	१	०	०	०	६००+ २५	६००+ २५	०	०	०	
२७	पुराणवस्तु संशोधन खातें	४	४	०	०	०	२३००+ १७०	२३००+१७०	०	०	०	
२८	सेन्सस खातें	२	२	०	०	०	१७५०+ १००	१७५०+१००	०	०	०	
२९	स्टॅटिस्टिक्स खातें (एदार शुमार)	२	२	०	०	०	१६००	१६००	०	०	०	
३०	लँड कॉंपेन्सेशन	१	१	०	०	०	१०००+ १९०	१०००+१९०	०	०	०	
३१	हैदराबाद म्युनिसिपॅलिटी	१०	८	१	१	०	४९०५+ ५६०	४१०५+४६०	३००	५००+१००	०	
३२	लोकल फंड	१	१	०	०	०	६००+ १००	६००+१००	०	०	०	
३३	कोर्ट ऑफ वार्डस	२	२	०	०	०	१४५०+ १५०	१४५०+१५०	०	०	०	
	एकूण...	१८६	१२६	४०	९	११	११४२०५-११-०	७००९४	१९९५०	८८७०	१५३४१-११-०	

हैद्राबाद संस्थानांतील हिंदूंची शिक्षणविषयक परिस्थिति

साक्षरतेचें प्रमाण हें देशांतील शिक्षणविषयक उन्नतीचें खरें गमक आहे हें तत्त्व सर्वमान्य झालेलें आहे. ह्या दृष्टीनें गेल्या ५० वर्षांत हैद्राबाद संस्थानानें कशी काय प्रगति केली आहे तें आपण पाहूं. तक्ते नं. १ व ३ वर नजर टाकल्यास असें दिसून येईल कीं, १८८१ सालीं साक्षरतेचें प्रमाण हजारीं ३७ होतें, तें घसरत घसरत १९२१ मध्यें ३३ वर आलें आहे. त्याबरोबरच हीही गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते कीं १८९१ सालीं तर साक्षरतेचें प्रमाण हजारीं ४४ होतें. ह्याचा अर्थ असा कीं, शिक्षणखातें बाल्यावस्थेंत असतांनाही १९२१ च्या मानानें १८९१ सालीं दर हजारीं साक्षरांची संख्या ११ नें जास्त होती.

सरकारनें शिक्षणावर करावयाचा खर्च कमी केल्यामुळें कदाचित् साक्षरतेचें प्रमाण कमी झालें असेल असा वाचकांचा समज होण्याचा संभव; पण तो बरोबर नाहीं. तक्ता नं. २ पाहिल्यास सरकार ह्या कामीं अधिकाअधिक पैसा खर्च करीत आहे असें दिसून येईल. जेव्हां साक्षरतेचें प्रमाण हजारीं ४४ होतें, तेव्हां ह्या बाबतांत सरकारी खर्च ३०३२९३ रु. होता. उलटपक्षीं १९२६ सालीं जेव्हां साक्षरतेचें प्रमाण हजारीं ज्यास्तींत ज्यास्त ३३ किंवा थोडें अधिक असेल तेव्हां सरकारी खर्च ७७०००० रु. होता. साक्षरतेचे आंकडे घेऊन सरकारी खर्चाच्या आंकड्याबरोबर तुलना केल्यास ह्या खर्चांचा खरोखर सामान्य जनतेस कितपत उपयोग होत आहे आणि ह्या वाढत्या खर्चाच्या योगानें निजामइलाख्यांत शिक्षणप्रसार कितपत होत आहे हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

खर्चाच्या तक्त्याकडे (तक्ता नं. २) पाहिलें म्हणजे असें दिसून येतें कीं, १९११ पर्यंत खर्चाची वाढ संथपणें चालूच होती. परंतु उस्मानिया युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यानंतर खर्चाची वाढ १९११ मधील १० लाखांपासून १९२१ मध्यें ६७ लाखांपर्यंत झाली. १९२१ ते १९२६ ह्या पांच वर्षांच्या अल्पावधींतही पुन्हां १० लाखानें वाढ करण्यांत आली. ह्यावरून सामान्य जनतेच्या शिक्षणाकडे फारसें लक्ष न देतां शिक्षणखात्यानें आपलें सारें लक्ष उस्मानिया विद्यापीठाकडेच दिलें असावें असें दिसतें

नं. १–२–३ ह्या तक्त्याचें अवलोकन केल्यास सामान्य लोकांतील साक्षरतेचें प्रमाण निश्चितरीतीनें खालावलें आहे असें दिसतें. आतां संस्थानांतील हिंदू

व मुसलमान ह्या प्रमुख समाजांनीं शिक्षणाच्या बाबतींत कशी काय प्रगति केली आहे हें पाहूं. तक्का नं. ४ पाहिल्यास असें दिसलें कीं, हिंदूंनीं १८८१–१८९१ ह्या दशकांत साक्षरतेच्या बाबतींत थोडीबहुत प्रगति केली होती. परंतु १९२१ चे आंकडे पाहिले म्हणजे तेंच प्रमाण कायम असल्याचें दिसत नाहीं. उलट पक्षीं तक्का नं. ५ वरून असें दिसतें कीं, १८८१ सालीं मुसलमान समाजांतील साक्षरतेचें प्रमाण शेंकडा पांच होतें, तें १९२१ सालीं १० झालें. ह्याचा अर्थ असा होतो कीं, ज्या काळांत मुसलमानांनीं दुप्पट वेगानें साक्षरतेच्या बाबतींत आघाडी मारली, त्या काळांत हिंदूंची यत्किंचितही प्रगति झाली नाहीं.

शिक्षणविषयक प्रगतीची पूर्ण कल्पना येण्याकरितां दोन्ही समाजांनीं दुय्यम आणि उच्च शिक्षणांत कशी काय प्रगति केली आहे, ह्याचाही आपण विचार केला पाहिजे. ५ व ७ नंबरच्या तक्त्यामध्यें दोन्ही समाजांच्या विद्यार्थ्यांचे आंकडे दिले आहेत. दुय्यम शिक्षणांत दोन्ही समाजांतील विद्यार्थ्यांची संख्या जरी सारख्या प्रमाणांत आहे, तरी संस्थानांतील हिंदूंची संख्या मुसलमानांच्या आठपट आहे ही गोष्ट लक्षांत ठेविली म्हणजे हिंदूंची किती निकृष्ट स्थिति आहे हें सिद्ध होतें.

उच्च शिक्षणांतही १९२५ सालीं हिंदू विद्यार्थ्यांची संख्या मुसलमान विद्यार्थ्यांपेक्षां २२६ नें कमी असल्याचें तक्का नं. ७ वरून दिसतें. उलटपक्षीं १८९४ ते १९१० पर्यंत हिंदू विद्यार्थ्यांचें प्रमाण मुसलमानांच्या नेहमीं दुप्पट होतें. हिंदू समाजांतील उच्च शिक्षणाचा ऱ्हास उस्मानिया युनिव्हर्सिटीच्या स्थापनेपासून सुरू झाल्याचें दिसतें. १९१० सालीं जेव्हां मद्रास युनिव्हर्सिटीस जोडलेलें एकच कॉलेज होतें, तेव्हां मुसलमान विद्यार्थ्यांची संख्या फक्त ३० होती. तीच १९१८ सालीं उस्मानिया युनिव्हर्सिटीच्या स्थापनेनंतर त्याच्या सातपट झाली आणि १९२५ सालीं तर त्यांचा आंकडा ६०७ पर्यंत वाढला.

हें समालोचन पूर्ण होण्यास स्त्री–शिक्षणाच्या आंकड्यांचाहि विचार केला पाहिजे. सर्वसामान्य स्त्रियांतील साक्षरतेचें प्रमाण दाखविण्याकरितां ८ नंबरचा तक्का देण्यांत आला आहे. नं. ९ व १० च्या तक्त्यांवरून अनुक्रमें हिंदू आणि मुसलमान स्त्रियांच्या साक्षरतेचें प्रमाण दिसून येतें; आणि ह्या दोन्ही तक्त्यांची तुलना करून पाहिल्यास विलक्षण विरोध दिसून येतो. १९२१ सालीं ३०३ हिंदू स्त्रियांत १ स्त्री साक्षर आहे. उलट त्याच वर्षीं ३२ मुसलमान स्त्रियांत १ स्त्री साक्षर असल्याचें दिसतें. म्हणजे मुसलमान स्त्रियांतील साक्षरतेचें प्रमाण हिंदू स्त्रियांपेक्षां दसपट अधिक आहे.

तक्का नं. ११ वरून असें दिसतें कीं, हिंदू समाज मुसलमानांपेक्षां आठपटीनें अधिक असला, तरी प्राथमिक शाळांतील हिंदू मुलींची संख्या मुसलमान

मुलींपेक्षां निम्यानें कमी आहे. दुय्यम शिक्षणाच्या शाळांतून (तक्ता नं. १२) हिंदू आणि मुसलमान विद्यार्थिनींची संख्या १९२७ सालीं अनुक्रमें ६३९ व ८६६ होती. अर्थात् ह्या बाबतींतही एकंदर लोकसंख्येचा विचार केल्याशिवाय प्रगतीचें खरें स्वरूप लक्षांत येणार नाहीं. उच्च शिक्षणांत (तक्ता नं. १३) एकही हिंदु विद्यार्थिनी आढळून येत नाहीं. उलटपक्षीं १९२४ आणि १९२७ ह्या सालीं अनुक्रमें ८ व ९ मुसलमान विद्यार्थिनी होत्या.

प्रजाशिक्षणपरिषदेच्या स्टँडिंगकमेटीनें जे खुलासे प्रसिद्ध केले आहेत त्याव रून सरकारचा व रयतेचा शिक्षणविषयासंबंधीं दृष्टीकोणच कसा भिन्न आहे हें दिसून येतें. सदर खुलासे वाचल्यास प्राथमिक शिक्षण आम्ही संस्थानांतील स्थानिक भाषांतून मोफत देतों, त्याचप्रमाणें स्थानिक भाषांना व खासगी संस्थांनाही आम्ही उत्तेजन देतों अशी जी शेखी मारण्यांत येते, त्यांत कितपत तथ्य आहे हेंही वाच-कांस दिसून येईल. ज्या ज्या खासगी संस्थांना सरकारी मदत देण्यांत येते त्यांची यादी सरकारनें लोकांच्या माहितीकरितां जरूर प्रसिद्ध करावी आणि त्याबरोबर प्रत्येक संस्था किती जुनी आहे, तिला मदत किती देण्यांत येते आणि संस्थेच्या प्रत्यक्ष खर्चाशीं मदतीचें काय प्रमाण आहे ह्याचाही तपशील द्यावा. सरकारकडून गेल्या दहा वर्षांत ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या आहेत त्यांची गुणवर्णनासह तपशीलवार यादी, सदरहू स्टँडिंग कमेटीनें म्हटल्याप्रमाणें ह्या पूर्वींच प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होती.

आतां आपण खासगी शाळेच्या कायद्याकडे वळूं. सदरहू कायद्याचीं १, ६ (अपवाद,) ७, १० आणि १३ हीं कलमें विचारपूर्वक वाचण्यासारखीं आहेत. पहिल्या कलमांत कायद्याची व्याप्ति सांगण्यांत आली असून कलम ६ (अपवाद) च्या आधारें ह्या कायद्याच्या कक्षेंतून कोणतीही शाळा वगळण्याचे अनियंत्रित अधिकार राखून ठेवण्यांत आले आहेत. कलम १० मध्यें सदरहू कायदा मोडणारास शिक्षा सांगण्यांत आली असून १३ व्या कलमान्वयें कोणतीही संस्था जोंपर्यंत शिक्षणाधिकाऱ्यांच्या मतें शैक्षणिक, सामाजिक, नैतिक अथवा राजकीय दृष्टीनें विघातक नसेल तोंपर्यंत त्या संस्थेला साह्य देण्या-संबंधीं अमर्याद अधिकार देण्यांत आले आहेत. हा कायदा खासगी शाळांच्या उन्नतीकरितां काढण्यांत आला आहे असें जें सरकारकडून सांगण्यांत येतें तें कायदा वाचून कोणासही खरें वाटणार नाहीं. इतकेंच नव्हे तर शिक्षण परिषदेच्या स्टँडिंग कमेटीनें ह्याबाबत जे आंकडे प्रसिद्ध केले आहेत त्यांवरून हा कायदा शिक्षणप्रगतीस किती विघातक झाला आहे हें सिद्ध होतें.

सारांश, हैद्राबाद संस्थानांतील हिंदू पुरुष व स्त्रिया साक्षरतेच्या दृष्टीनें काय किंवा प्राथमिक, दुय्यम अथवा उच्च शिक्षणाच्या दृष्टीनें काय निःसंशय मागसलेले

आहेत. ब्रिटिश इलाख्यांत शिक्षणाच्या बाबतींत तरी हिंदूसमाज मुसलमानांच्या मानानें फार पुढें गेला आहे, तेव्हां हिंदूसमाज सामान्यतःच मागसलेला आहे, असें म्हणून हा प्रश्न टाळतां येणार नाहीं. संस्थानांची उन्नति म्हणजे संस्थानांतील सर्व जातींची उन्नति. ह्या दृष्टीनें सरकारी शिक्षणसंस्थांच्या संस्थानांतील बहुसंख्यांक अशा हिंदूसमाजास लोकसंख्येच्या प्रमाणांत कां उपयोग होत नाहीं याचा शिक्षणखात्यानें अवश्य विचार केला पाहिजे. सदर्हू खात्याचें हल्लींचें धोरण बरोबर नाहीं. ही गोष्ट केवळ वरील एका कारणांमुळेंही सिद्ध होते. त्यावरून शिक्षणखात्यानें योग्य तो बोध घेऊन परिणामावरून आपल्या प्रयत्नांची परीक्षा केली पाहिजे, आणि जेणें करून प्रजेच्या सर्व वर्गाची उन्नति होईल, असें धोरण स्वीकारिलें पाहिजे.

हिंदू समाजानेंही सरकारी शिक्षणसंस्थांचा शक्य तितका अधिक उपयोग करून घेतला पाहिजे. कारण सरकारला कराचा जो पैसा मिळतो त्यांत अधिकांश हिंदूंचाच असतो. जर शिक्षणक्रमासंबंधीं किंवा अशा संस्थांच्या कार्यपद्धतीविषयीं कांहीं तक्रारी असल्या तर त्यांनीं त्या स्पष्टपणें व धैर्यानें योग्य अधिकाऱ्यांपुढें मांडल्या पाहिजेत; आणि मागासलेला समाज असें दूषण येऊं देतां कामा नये. येथें हीही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, केवळ सरकारी संस्थांवर विसंबून शिक्षणाची प्रगति होणें अशक्य आहे. लोकांनींही ह्या कामीं पुढाकार घेतला पाहिजे आणि असल्या खाजगी प्रयत्नांस उत्तेजन देऊन सर्व समाजास शिक्षणोन्नतीस सारखाच वाव देणें हें प्रत्येक सुधारलेल्या सरकारनें आपलें कर्तव्य समजलें पाहिजे; परंतु एकीकडे संस्थानांतील खाजगी संस्थांना मदत करण्याची वेळ आली म्हणजे पैशाची अडचण दाखवून मदत नाकारावयाची, किंवा दिलीच तरी अगदीं कमी मदत द्यावयाची परंतु संस्थानाबाहेरील संस्थांना आणि त्यांतही इस्लामी संस्थांना मदत करण्यांत मात्र हजारों रुपये खर्च करणाऱ्या निजामसरकारच्या शिक्षण-खात्यास काय म्हणावें, हेंच समजत नाहीं. संस्थानाबाहेरील इस्लामी संस्थांच्या मदतीकरितां दरवर्षी १२७७४८ रु. या खात्यातर्फे पाठविण्यांत येतात ही या बाबतींत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

तक्ता नं. १

हैद्राबाद संस्थामांतील दर हजारीं साक्षरतेचें प्रमाण दाखविणारा तक्ता.

वर्ष.	लोकसंख्या.	दरहजारीं प्रमाण.	शेरा.
१८८१	९८४५५९४	३७	
१८९१	११५३७०४०	४४	
१९०१	११३४११४२	३४	
१९११	१३३७४६७६	३२	
१९२१	१२४७१७७०	३३	

तक्ता नं. २

हैद्राबाद संस्थानांतील शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचें वाढतें प्रमाण दाखविणारा तक्ता.

वर्ष.	खर्च.	शेरा.
१८८१	२३९२२०	
१८९१	३०३२९३	
१९०१	७४८६६५	
१९११	१०१९७८७	
१९२१	६७६३१०१	
१९२३	६८२९९०२	
१९२६	७७२५८०७	

तक्ता नं. ३

सन १८८१ ते १९२१ पावेतों हैद्राबाद संस्थानांतील साक्षरता व निरक्षरता दाखविणारा तक्ता. (हे आंकडे खानेसुमारीच्या दश-वार्षिक रिपोर्टावरून घेतले आहेत.)

वर्ष.	एकूण लोक सं.	साक्षर.	निरक्षर.	साक्षरतेचें प्रमाण.	शेरा.
१८८१	९८९५५९४	३१८८८०	९५२६७१५	३० १।१४	
१८९१	११५३७०४०	३७०७५२	१११५६२८८	३१ १। ३	
१९०१	११११४११४२	३२७।६९	१०८११९७३	३३ १।१३	
१९११	१३३७४६७६	३६८१६६	१३००६५१०	३६ १। ५	
१९२१	१२४७१७७०	३६५२९०	१२१०६४८०	३· १।३३	

तक्ता नं. ४

सन १८८१ ते १९२१ पावेतों हैद्राबाद संस्थानांतील साक्षर हिंदूंचें प्रमाण दाखविणारा तक्ता.

वर्ष.	हिंदूंची लोक-संख्या.	साक्षर.	निरक्षर	साक्षरांचें प्रमाण.	शेरा.
१८८१	८८९३१८१	२६४५०७	८६२८६७४	३३ १।१०	
१८९१	१०३१५२४९	३४६४७५	९५६९७७४	२९ १।१३	
१९०१	९८७०८३९	२५०२६७	९६३०५७२	२९ १। ८	
१९११	११६२६३७५	२६७०४१	११३५९३३४	४३ १। ९	
१९२१	१०६५६४५३	२७७०५६	१०३७९३९७	३५ ६।१३	

तक्ता नं. ५

संस्थानांतील साक्षर मुसलमानांचें प्रमाण दाखविणारा तक्ता.

वर्ष.	मुसलमानांची लोकसंख्या.	साक्षर.	निरक्षर.	साक्षरांचें प्रमाण	शेरा
१८८१	९२५९२९	४५७५२	८८०१७७	२० ११८	
१८९१	११३८६६६	७०१४७	१०६८५१९	१६ ११४	
१९०	११५५७५०	६३११०	१०९२६४०	१८ ११५	
१९११	१३८०९९०	८१२६०	१२९९७३०	१६ ११५	
१९२१	१२९८२७७	११५५२२	११८२७५५	११ २११८९	

तक्ता नं. ६

सन १८८१ ते १९२१ पावेतों संस्थानांतील साक्षर स्त्रियांचें प्रमाण दाखविणारा तक्ता.

वर्ष.	स्त्रियांची लोकसंख्या.	साक्षर	निरक्षर.	साक्षरांचें प्रमाण	शेरा
१८८१	४८४३४५७	४९६२	४८३८४९५	९८२ ११३	
१८९१	५६६३९११	६९२०	५६[illegible]६९९१	८१८ ११८	
१९०१	५४६७५१३	१८८८३	५४४८६३०	२८९ ११९	
१९११	६५७७५५८	२४०७७	६५५३४८१	२७३ ११३	
१९२१	६१२६[illegible]९९	४३३४०	६०८३३५९	१४१ २१३	

तक्ता नं. ७

हिंदू स्त्रियांची साक्षरता.

वर्ष	हिंदू स्त्रियांची संख्या	साक्षर	साक्षरतेचें प्रमाण	शेरा
१८८१	४२७५३६९	१८८९	२३१६ १/३	
१८९१	५०६८२७८	५२१७	९५३ १/४	
१९०१	४८४८६३८	९४७५	५११ १/८	
१९११	५७२११०१	१०८९३	५२५ १/१५	
१९२१	५२४९८६०	१७३१६	३०३ १/६	

तक्ता नं. ८

मुसलमान स्त्रियांची साक्षरता.

वर्ष	मुसलमान स्त्रियांची संख्या	साक्षर	साक्षरतेचें प्रमाण	शेरा
१८८१	१३६६९९	३१	४४०९ १/१२	
१८९१	४५६४८३	१२२९	३७१ १/७	
१९०१	५६५५२०	५८१६	९७ १/४	
१९११	६७५१६९	८४७७	७९ १/२	
१९२१	६३९२५५	१९५९९	३२ १/२	

तक्ता नं. ९

स्त्रियांचें उच्च शिक्षण. सन १९२४ पूर्वी सरकारी रिपोर्टांत एकही विद्यार्थिनी नमूद नाहीं.

वर्ष.	कॉलेजांतील विद्यार्थिनी.	हिंदू.	मुसलमान.
१९२४	८	×	८
१९२७	९	×	९

तक्ता नं. १०

स्त्रियांचें दुय्यम शिक्षण.

वर्ष.	हिंदू मुली.		मुसलमान मुली.	शेरा.
१८९४	सरकारी शाळा		२८	संस्थानांतील दोन्ही समाजांच्या लोकसंख्यांचें प्रमाणही लक्षांत घेतलें पाहिजे.
	बिनसरकारी शाळा	१३	८६	
१९००		१२	४४	
१९०५		३८	६५	
१९१०		७१	१८१	
(उस्मानिया विद्यापीठाच्या स्थापनेनंतर)				
१९१८	हायस्कूल	५५	२७०	संस्थानांतील दोन्ही समाजांच्या लोकसंख्येचें प्रमाणही लक्ष्यांत घेतलें पाहिजे.
	मिडलस्कूल	४९१	१३३	
१९२५	हायस्कूल	१०२	३३७	
	मिडलस्कूल	५०८	३७९	
१९२७	हायस्कूल	१५६	३९४	
	मिडलस्कूल	४८३	४७२	

तक्ता नं. ११

स्त्रियांचें प्राथमिक शिक्षण.

वर्ष.	हिंदू मुली.	मुसलमान मुली.	शेरा.
१८९४	सरकारी शाळा १३८ बिन सरकारी शाळा २६८	१०९६ ७२९	येथेंहि संस्थानांतील हिंदु मुसलमानांच्या लोकसंख्येचें प्रमाण लक्षांत घेतलें पाहिजे.
१९००	१३५८	२२५७	
१९०५	१४७६	२४२८	
१९१०	१९४४	२८०९	
१९१८	७५८१	७६८८	
१९२५	१०८१५	२०१०५	
१९२७	११९६४	२२०९७	

तक्ता नं. १२

संस्थानांतील कॉलेजांत जाणाऱ्या (हिंदू व मुसलमान) विद्यार्थ्यांची संख्या (हे आंकडे सरकारी रिपोर्टांवरून घेतले आहेत.)

वर्ष	हिंदू विद्यार्थी	हिंदूंची लोकसंख्या	मुसलमान विद्यार्थी	मुसलमानांची लोकसंख्या.	शेरा
१८९४	२३	१०३१५२४९	११	११३८६६६	
१९००	२२	९८७०८३९	१२	११५५७५०	
१९०५	२४	९८७०८३९	८	११५५७५०	
१९१०	४९	११६२६३७५	३०	१३८०९९०	

(उस्मानिया विद्यापीठाच्या स्थापनेनंतर)

वर्ष	हिंदू विद्यार्थी	हिंदूंची लोकसंख्या	मुसलमान विद्यार्थी	मुसलमानांची लोकसंख्या	शेरा
१९१८	९८	११६६२६३७५	२०७	१३८०९९०	
१९२५	३९१	१०६५६४५३	६१७	१२९८२७७	

तक्ता नं. १३

दुय्यम शिक्षण (सरकारी रिपोर्टावरून).

वर्ष.	हिंदू विद्यार्थी.	मुसलमान विद्यार्थी	शेरा.
१८९४	४५३३	३५२४	कृपा करून तक्ता नं. ४ मध्यें देण्यांत आलेले लोकसंख्येचे आंकडे लक्षांत घ्यावे.
१९००	६४१८	५४९६	
१९०५	६००२	६१०७	
१९१०	६२६१	७९८५	
१९१८	१०५००	१२५४६	
१९२५	१८००८	१८९७४	

श्रीमंत राजेराजयान सर किसन प्रसाद महाराजा बहादुर

यमिनु—सलतनत के. सी. आय्. ई., जी. सी. आय्. ई.

अध्यक्ष—कार्यकारी कौन्सिल हैद्राबाद, दक्षिण.

ता. १९ डिसेंबर रोजीं रेसिडेन्सी बाजारांत हैद्राबाद संस्थानांतील हिंदु प्रजेतर्फे भरलेल्या सार्वजनिक सभेनें निवडलेल्या कार्यकारी मंडळाचे आम्ही सभासद महाराजांच्या सेवेसीं खालील अर्ज मांडण्याची अनुज्ञा मागतों.

या प्रसंगीं आसफिया घराणें व हैद्राबाद संस्थानचे सत्ताधीश हिज एक्झॉल्टेड हायनेस निजामसाहेब यांच्याविषयीं आमच्या हृदयांत जी अनुपम राजनिष्ठा वसत आहे तिचें प्रदर्शन करणें आम्ही आपलें कर्तव्य समजतों, आणि आमच्या संस्थानाधिपतींच्या राज्यछत्राखालींच आम्हांस आमची धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व औद्योगिक प्रगति करून घ्यावयाची आहे हेंही आम्ही जाहीर करूं इच्छितों.

(२) ता. १९ डिसेंबर रोजीं भरलेल्या सार्वजनिक सभेंत जे ठराव येथील हिंदुजनतेनें पसार केले त्यांची एक नक्कल यासोबत पाठविली आहे. या नकलेचा आमच्या मागण्यांचा संदर्भ तात्काल समजण्यांत बराच उपयोग होईल व निजाम सरकारचें लक्ष या ठरावांकडे पूर्णपणें लक्ष वेधलें जावो अशी आम्ही अपेक्षा करतों.

(३) या संस्थानांत शेंकडा पंचायशीं प्रजा हिंदु असतां त्यांचें सरकारी नोकरींतील प्रमाण फारच अल्प व लोकसंख्येशीं विषम आहे. सरकारी नोकरींत भरणा करतांना हिंदूंच्या हक्काकडे दुर्लक्ष्य केलें जातें याची हिंदुप्रजाजनाला जाणीव होऊं लागली आहे हें आम्ही नम्रपणें सरकारच्या नजरेस आणूं इच्छितों. संस्थानच्या राज्यकारभारांत हिंदूंना फारच थोडा वांटा मिळतो व ज्या ठिकाणीं सरकारी धोरण आखलें जातें अशा सेक्रेटरीएट वगैरे कचेऱ्यांत तर फारच थोड्या हिंदूंची वर्णी लागते असें आमचें नम्र विधान आहे. सर्व संस्थानांत एकहि हिंदु तालुकदार किंवा सुभेदार नसावा व न्यायखात्यांत हिंदु नौकरांचें प्रमाण फारच अल्प असावें हें पाहून हिंदु प्रजाजनांना फारच दुःख होतें. रेव्हेन्यु, न्याय आणि पोलिस ह्या तीन खात्यांशींच जनतेचा अधिक संबंध येतो व प्रजाजनांच्या दृष्टीनें तीं खातीं फारच महत्त्वाचीं आहेत. सारा भरणारे जे लोक अधिक आहेत व लोकसंख्येच्या बहुमताचें प्रतिनिधित्व ज्या जातीकडे

आहे त्या जातींतूनच वरील खात्यांत नौकरांचा भरणा मोठ्या प्रमाणावर झाला पाहिजे असें आम्हांस वाटतें. आम्हांस असेंहि वाटतें कीं सर्व जातींतून सरकारी नौकरांची निवड मोकळेपणानें करण्यांत आली तर जातीजातींतील दंगे होण्याचा कमी संभव आहे. अशा तऱ्हेनें दंगे होणें हा हिंदुस्थानला एक शापच झालेला आहे व या संस्थानांतहि या तऱ्हेचे दंगे अलिकडे वारंवार होऊं लागले आहेत. जो मनुष्य येथें जन्मला व वाढला त्याला आपल्या संस्थानची सेवा सरकारी नौकरींत शिरून करण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे व सरकारी नौकरीला सार्वजनिक सेवा हें नांवहि यथार्थ आहे. ह्याकरितां संस्थानांतील सर्व जातींच्या लोकांना सेवा करण्याची सारखीच संधि देण्यांत आली पाहिजे व कोणत्याही एकाद्या विशिष्ट जातीवरच मेहरबानी करण्यांत येऊं नये हें सरकारच्या निदर्शनास आम्हांस आणून द्यावेसें वाटतें.

(४) आमची दुसरी तक्रार अशी आहे कीं, सर्व धर्मांना सारखाच मान देण्यांत यावा असें सरकारी फर्मान असून सुद्धां या संस्थानांत वस्तुस्थिति अशी आहे कीं सर्व धर्मीयांना वस्तुतः सारखेंच वागविलें जात नाहीं. संस्थानचा असा कोणताही धर्म नसतो आणि तत्त्वतः संस्थानचा असा कोणताच धर्म असूं नये हें तत्त्व आम्ही अत्यंत नम्रपणें पुढें मांडूं इच्छितों. खरें पाहतां, धर्म, जात, गोत न पाहतां सर्व प्रजेचे हितसंबंध सारख्याच तऱ्हेनें रक्षण करण्याकडे लक्ष पुरविणें हें सरकारचें कर्तव्य आहे. हें सर्वमान्य तत्व या संस्थानांत अमलांत आणलें जात नाहीं. कधीं कधीं अधिकाऱ्यांकडून भलताच पंक्तीप्रपंच करण्यांत येतो, व मुसलमानांची लोकसंख्या शेंकडा नऊ या प्रमाणांत असली तरी सर्वांत जास्त कृपेस पात्र असलेले असे मुसलमानच आहेत हेंहि उघडपणें स्पष्ट करण्यांत येतें हें पाहून आम्हांस खेद होतो.

सन १३४१ फसलीचें अंदाजपत्रक पहातां असें दिसून येतें कीं, पन्नास हजार रुपये केवळ मुसलमानी संस्थांकरतां आणि साडेसतरा हजार रुपये इस्लामी वाङ्मयाकरतां राखून ठेवले आहेत. दरवर्षीं मोठमोठ्या रकमा इस्लामी संस्थांच्या प्रित्यर्थ खर्च होतात. धार्मिक देणग्या वार्षिक ज्या देण्यांत येतात त्या शेंकडा ९५ मुसलमानांसच मिळतात. ह्याचप्रमाणें खास आणि मेहरबानी म्हणून मिळणारें वेतन या सदराखालीं २६२८३० इतके रुपये मुसलमानांना देण्यांत येतात तर हिंदूंच्या वांट्याला फक्त १३७८४ रुपये येतात.ह्याचप्रमाणें खास व धार्मिक देणग्या या सदराखालीं २००६४२ इतकी रक्कम मुसलमानांच्या पदरांत टाकण्यांत येते तर अवघे १३४४ रुपये हिंदूंच्या वांट्याला येतात. आम्हांस ही गोष्ट सरकारच्या निदर्शनास आणावीशी वाटते कीं, संस्थानाबाहेरील मुसलमानी संस्थांना या पांच वर्षांत फारच मोठ्या देणग्या देण्यांत आलेल्या आहेत. उदाहरणार्थ नऊ लाख नेजद रिलीफच्या कामाकरतां, लंडन येथील मशिदीप्रीत्यर्थ पांच लक्ष रुपये, अलिगड येथील मुस्लीम विश्वविद्यालयाला

दहा लाख रुपये व दिल्ली व पानिपत येथील मुस्लीम शाळांना अनुक्रमें पन्नास व वीस हजार रुपये देण्यांत आले आहेत. याशिवाय वार्षिक दोन लक्ष रुपयांची देणगी इस्लामी संस्थांना देण्यांत येते ती वेगळीच.

आम्ही सरकारच्या हेंही नजरेस आणूं इच्छितों कीं, दर वर्षी मशिदी बांधण्याकडे व काजीच्या मुलांना शिष्यवृत्ति देण्याकडे आणि 'हाफीज' तयार करण्याकडे मोठमोठ्या रकमा सरकार खर्च करतें. इस्लामी प्रजेला धार्मिक शिक्षण देण्यासाठीं सरकारनें अनेक खास मिशनऱ्यांची स्वखर्चानें नेमणूक केली आहे. आम्ही ह्यावरील सदराखालीं रकमा खर्च होतात म्हणून तक्रार करीत नाहीं; कारण संस्थाना-मधील एखाद्या वर्गाची प्रगति झाली तर तितक्याच प्रमाणांत संस्थानचा तो एक फायदाच झाला असें आम्ही समजतों. परंतु आम्हांस जें कांहीं म्हणावयाचें आहे तें एवढेंच कीं, ह्या संस्थानास एका वर्गाप्रमाणें सर्व वर्गांना सर्व तऱ्हेच्या सारख्याच सोई करून देण्यांत याव्या. ह्या संबंधांत आम्हांस हें नम्रपणें दाखविणें इष्ट वाटतें कीं हिंदु लोकांना आपल्या खर्चानें देऊळ बांधण्यास किंवा दुरुस्त करण्यास सुद्धां पर-वानगी मिळण्याची फार मारामार पडते आणि चहूंकडे सरकार मशिदी बांधावयास मदत करीत असतें. हिंदूंविषयीं होत असलेला हा वागणुकींतील विरोध जास्तीच स्पष्ट व उघड होतो. शेवटीं ह्या प्रश्नाविषयीं आमचें असें म्हणणें आहे कीं, सरकारनें काढलेल्या कांहीं हुकुम व पत्रकांमुळें रयतेच्या धार्मिक स्वातंत्र्यावर अनवश्यक बंधनें घातलीं गेलीं आहेत व यामुळें कोणत्यानाकोणत्या कारणास्तव हिंदूंना आपले धार्मिक आचार व समारंभ प्रसंगोचित् अशा लवाजम्यासहीत पार पाडणें आणि धार्मिक मिरवणुकी त्रासाशिवाय काढणें अशक्यप्राय झालें आहे. सार्वजनिक रस्त्यां-वर धार्मिक मिरवणुकी काढणें हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे व कोण-तेंही सरकार हा हक्क हिरावून घेऊं शकत नाहीं! मात्र शांततारक्षणार्थ मॅजिस्ट्रेटला ठरावाच्या विवक्षित प्रसंगीं खास हुकुम देण्याचा अधिकार आहे. वाद्यें वाजविणें व मिरवणुकींसंबंधीं सरकारनें जे हुकुम व पत्रकें प्रसिद्ध केलीं आहेत त्यांची पुन्हां एकदां बारकाईनें चौकशी होणें जरूरीचें आहे. कारण ब्रिटिश हिंदुस्थानांतील अनेक हायकोर्टांत व प्रिव्ही कौन्सिलच्या सन्मान्य न्यायाधिशांनीं ह्या विषयावर अनेक वेळां आपलीं मतें व्यक्त केलीं आहेत.

(५) आम्ही सरकारच्या हें नजरेस आणूं इच्छितों कीं त्यांनीं आपलें संस्थानचें शैक्षणिक धोरण हिंदु प्रजेला पटेल व तिच्या संस्कृतीला व एकंदर प्रगतीला सहाय्यक होईल असेंच ठेवावें. सर्व संस्थानांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यांत यावें अशी आमची विनंति आहे. कारण साक्षरतेचें प्रमाण व संख्या इतर कांहीं संस्थानांच्या मानानें पहातां फारच कमी आहे व हिंदूंच्या बाबतींत तर हें प्रमाण अतिशय खाला-वलें आहे. यासंबंधांत हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं सरकार शिक्षणावर बरीच मोठी

रक्कम खर्च करीत असूनसुद्धां १८९१ मध्यें हिंदूंचें साक्षरतेचें जें प्रमाण होतें तें-सुद्धां कायम ठेवतां आलें नाहीं. प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेंतूनच देणें इष्ट आहे. सरकारी शाळांकरितां नेमलेल्या अभ्यासक्रमांत असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण त्यांच्या मातृभाषेंतूनच देण्यांत यावें. परंतु हें तत्त्व प्रत्यक्ष अमलांत आणलें जात नाहीं. आणि अनेक ठिकाणांहून अशा तक्रारी ऐकण्यांत येतात कीं प्राथमिक शाळेंतून इतिहास व गणित यांसारखे सामान्य विषयसुद्धां फक्त उर्दूतून शिकवले जातात. सरकार प्राथमिक शाळांतून मुलांना त्यांच्या मातृभाषेंतून शिक्षण दिलें जावें अशा तऱ्हेचे खास हुकूम तात्काळ काढील अशी आम्ही आशा बाळगतों. सरकारला हें तत्त्व मान्य झालें आहे कीं, मातृभाषेंतून दिलें जाणारें शिक्षणच जास्त फायदेशीर होतें. आणि म्हणून दुय्यम शाळांतून सुद्धां तेलगू, मराठी व कानडी ह्या देशी भाषांतूनच शिक्षण देण्यांत यावें. कारण उर्दूपेक्षां वरील प्रत्येक भाषा ही किती तरी मोठ्या प्रमाणांत संस्थानांतील लोकांची मातृभाषा आहे। खाजगी शाळेबद्दल सरकारनें जें पत्रक काढलें आहे तें देशहिताला विघातक आहे आणि ह्या तऱ्हेनें अनेक विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण देण्याचें सरकारनें नाकारल्यासारखें होत आहे. सन १३३४ फसलीचे सरकारी आंकडे बघतां ४०५३ खाजगी शाळा होत्या व त्यांतून ७६६५४ विद्यार्थी शिकत होते. परंतु खाजगी शाळेचें वरील पत्रक निघाल्यानंतर खाजगी शाळांची संख्या १३०५ पर्यंत उतरली व विद्यार्थीहि ३१७४० एवढेच राहिले. ह्याचा अर्थ असा होतो कीं ४४९१४ विद्यार्थ्यांना शिक्षणापासून पराङ्मुख करण्यांत आलें. सुधारलेल्या देशांतून शिक्षणासाठीं खाजगी प्रयत्न करणाऱ्यांना उत्तेजन देण्याचे सरकारचें धोरण असतें. आणि यासाठीं असलें पत्रक सरकारनें रद्द करावें असें आम्ही सुचवतों. सरकारनें अत्यंत प्राचीन अशा हिंदू संस्कृतीच्या प्रगति व रक्षणा-विषयीं कांहींच प्रयत्न केला नाहीं, मात्र इस्लामी संस्कृतीच्या रक्षणाविषयीं व वाढी-विषयीं सारखा प्रयत्न करण्यांत येतो. आम्ही आशा बाळगतों कीं, सरकार या संस्था-नांतील दोन अत्यंत महत्वाच्या अशा वर्गांच्या संस्कृती रक्षणाविषयीं सारखीच मदत देईल.

७ सरतेशेवटीं ब्रिटिश हिंदुस्थान व इतर संस्थानें यांनीं जी विलक्षण प्रगति केली आहे त्याकडे आम्ही सरकारचें लक्ष वेधूं इच्छितों व हिंदुस्थानची भावी राज्य-घटना सांघिक तत्त्वावरच होणार असल्यामुळें, वाक्स्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य, लेखन-स्वातंत्र्य व धार्मिकस्वातंत्र्य हे मूलभूत हक्क येथील प्रजाजनांना देण्यांत यावे अशी आम्ही विनंति करतों. रामपूरच्या नबाबसाहेबांनीं जाहीर केल्याप्रमाणें सर्व हिंदु-स्थानांत प्रमुख असलेल्या अशा आमच्या संस्थानानें वरील मूलभूत हक्कांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा काढावा हें अत्यंत इष्ट होय. नाहींतर आमचें संस्थान मागें

रेंगाळलें असा लोकापवाद येईल. प्रजेच्या स्वातंत्र्याला आळा घालणारीं सर्व पत्रकें व हुकूम ताबडतोब सरकारनें परत घ्यावींत. इतर लहान लहान संस्थानांतील प्रजाजनांना जे नागरिकत्वाचे हक्क आहेत त्यापेक्षां आमचे येथील प्रजाजनांचे हक्क फारच कमी आहेत म्हणून जबाबदार राज्यपद्धति हेंच ब्रिटिश हिंदुस्थानप्रमाणें येथील राज्यकारभाराचें अंतिम ध्येय कल्पून सरकारनें कमींत कमी ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांना जे हक्क मिळाले आहेत ह्या धोरणाला अनुसरून येथील जनतेलाहि वरचेवर जास्त जास्त हक्क द्यावेत. सध्यांच्या कायदेमंडळास जास्त व्यापक स्वरूप देऊन त्याची वाढ करण्यांत आली पाहिजे. आणि प्रजाजनांना कौन्सिलमध्यें पूर्ण प्रातिनिधित्व मिळेल याची सरकारनें योग्य काळजी घेतली पाहिजे व लोकांच्या शब्दाला राज्यकारभारांत योग्य मान मिळेल अशी व्यवस्था अमलांत यावी म्हणून कायदेकौन्सिलचेंहि अधिकार वाढविण्यांत यावेत.

याशिवाय कांहीं प्रश्न असे आहेत कीं, त्यांचा संबंध स्थानिक स्वराज्याशीं असून त्यांचा जनतेशींहि महत्त्वाचा संबंध येतो व आम्हांस दृढ आशा आहे कीं, सरकार या बाबतींत लोकांच्या कार्यक्षेत्राला पूर्ण वाव देईल.

महाराज, आमच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा तक्रारी आपल्यापुढें योग्य विचाराकरितां मांडल्या आहेत व या बाबींकडे सरकारचें लक्ष तात्काळ वेधलें जाऊन सरकार योग्य ते उपाय तन्निवारणार्थ अमलांत आणील अशी आम्हांस दृढ आशा आहे.

आपले नम्र सेवक.

हिंदूंच्या तक्रारीबाबत.

" सरकारचें प्रसिद्धीपत्रक. "

इन्फरमेशन ब्युरो खात्याकडून आमच्या सरकारनें खालील प्रसिद्धीपत्रक प्रसिद्ध करण्याकरितां पाठविलें आहे त्याचा सारांश पुढीलप्रमाणें.

ज्यामध्यें हैद्राबाद संस्थानमधील सरकारी नोकऱ्यांमध्यें हिंदूंचें प्रमाण या विषयाचा उहापोह केला आहे असें एक पुस्तक आजकाल वर्तमानपत्रद्वारें व इतर मार्गानें फार प्रसिद्धीस आलें आहे. ह्याचें प्रसिद्धीकरण म्हणजे नुकत्याच राज्यव्यवस्थेविरुद्ध सुरूं झालेल्या उघड राजकीय चळवळीचा एक भाग आहे. ह्यांतील विधानें अत्यंत गैरसमजूत पसरविणारी असल्यामुळें सरकारला उत्तर देणें भाग पडलें आहे.

वर उल्लेखिलेल्या पुस्तकांत सुरुवातीसच हें विधान आहे कीं " १९३१ च्या खानेसुमारीवरून या संस्थानांत हिंदूंची संख्या १२२०३५०० व मुसलमानांची संख्या १५३४३३६ असल्याचें आढळतें. परंतु सरकारी नोकरींत मात्र हिंदूंचें प्रमाण व्यस्त असल्याचें आढळून येतें. पुस्तककर्ते म्हणतात कीं हिंदूंना नोकरीवर न नेमण्याबाबत कोणतेंच योग्य कारण नाहीं. हिंदूंची संस्कृति उच्च दर्जाची असून ते मुसलमानांपेक्षां कोणत्याच प्रकारें कमी नाहींत. पुस्तककर्त्यांनीं असें सुचविलें आहे कीं या संस्थानांत जर हिंदूंच्या प्रगतीच्या मार्गांत जर कोणची अडचण येत असेल तर ती फक्त त्यांचा धर्म हीच होय. पुढें पुस्तककर्त्यांनीं खातेवार हिंदूमुसलमानांच्या गॅझेटेड अधिकाऱ्यांच्या जागेची तुलना केली आहे. त्यांत त्यांनीं. असें दाखविलें आहे कीं हिंदू अधिकारी २४९ असून त्यांचा महिन्याचा पगार सगळा मिळून १२४११७ रु. होतो तर मुसलमान अधिकारी ८७५ असून त्यांचा पगार सगळा मिळून ४८३७५४ होतो आणि शेवटीं असें दाखविलें आहे कीं खालच्या. नोकऱ्यांतूनही हिंदूंची स्थिति तितकीच वाईट आहे; जितकी. गॅझेटेड अधिकाऱ्यांच्या जागेंतून किंबहुना त्याहूनही अधिक वाईट आहे.

पुस्तकांत जरी गणिताच्या पुष्कळशा चुका आहेत तरीसुद्धां एकंदरींत मानानें आंकडे बरोबर असल्याचें सरकार कबूल करीत आहे. परंतु ज्या रीतीनें त्यांची मांडणी केली गेली आहे त्यावरून सहेतुक अथवा निर्हेतुकपणें संस्थानांतील हिंदूंचें अगदीं विरुत चित्र रंगविलें आहे. सरकारी नोकऱ्यांतून हिंदूंना मुद्दाम होऊन वगळण्याचें धोरण ठेवण्यांत आलें आहे ह्या सूचनेस कांहींही आधार नाहीं. सरकारी नोकऱ्यांत दोन जातींमध्यें इतकी मोठी तफावत असण्याचें कारण दुसरीकडे शोधलें पाहिजे; परंतु तें करण्यापूर्वीं कांहीं गोष्टी लक्षांत ठेवावयास पाहिजेत. कारण ह्यामुळेंही तफावत बरीचशी कमी होते.

सर्वांत प्रथम आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे आदिहिंदूंना हिंदू गणणें ही चूक होय. कारण उघडच आहे कीं, यांतील बहुसंख्यांक लोक अधिकाऱ्यांच्या जागेची इच्छाही करीत नाहींत व त्यांची लायकीही नसते. त्यांची संख्या २४७३२३० इतकी मोठी असल्यामुळें ही संख्या वजा केली असतां नोकऱ्यांमधील आंकड्याच्या प्रमाणांत मोठा फरक पडतो. तसेंच खेडेगांवांत राहणाऱ्या मोठ्या लोकसंख्येचा आंकडाही गणनेंत, दाखल केल्यामुळें घोटाळा उडाला आहे. कारण नोकऱ्यामध्येंच विशेषतः ग्याझेटेड अधिकाराच्या नोकऱ्यावर दोन्ही जातींतील शहरवासियांमधूनच भरती केली जाते; ह्या बाबतींत नुकत्याच झालेल्या खानेसुमारींतील खालील आंकडे मत्त्हवाचे आहेत.

जात	शहरांत राहणाऱ्यांची संख्या	खेड्यांत राहणाऱ्यांची संख्या	शहरांत राहणाऱ्यांचें शेंकडा प्रमाण	खेड्यांत राहणाऱ्यांचें शेंकडा प्रमाण
आदि हिंदू खेरीज करून इतर हिंदू.	८०३५०२	८८९६११३	८.३	९१.७
मुसलमान.	५०६९४४	१०२७७२२	३३	६७

ह्या ठिकाणीं हें सांगितलें पाहिजे कीं २००० वस्तीच्या किंवा त्याहून ज्यास्त गांवांचा शहर या सदरांत समावेश केला आहे. संस्थानांतील हिंदू मुख्यत्वेंकरून शेतकरी आहेत. सर्व संस्थानांतील हिंदूंचें आदिहिंदू वगळून मुसलमानाशीं प्रमाण जरी ६.३ ते १ आहे तरी खेड्यांत राहणाऱ्यांचें प्रमाण ८.६ ते १ असून शहरांत राहणाऱ्यांचें प्रमाण १.६ ते १ आहे. ह्या मानानें पाहतां पुस्तककर्त्यानें राज्यव्यवस्थेविरुद्ध हिंदूंना कमी नोकऱ्या मिळण्याबाबत जो आरोप केला आहे, त्यांतील जोर पुष्कळसा नाहींसा होतो.

तरी पण असा प्रश्न करितां येईल कीं, लोकसंख्येचे आंकडे योग्य तऱ्हेनें दाखविले गेले तरीसुद्धां ग्याझेटेड अधिकाऱ्यांच्या जागेवर मुसलमानांची इतक्या मोठ्या प्रमाणांत नेमणूक कशी केली जाते, याला कारणें दोन आहेत. पहिलें कारण हें कीं, शहरांतील मुसलमान रहिवाश्यांचा हिंदूंपेक्षां स्वभावतः व ऐतिहासिक परंपरेनें सरकारी नोकरीकडेच कल असतो. तुलनात्मक दृष्टीनें त्यांची जात गरीब असून त्यांच्याजवळ भांडवल नसतें आणि धंद्याचे मार्गहि फार थोडे मोकळे असल्यामुळें स्वाभाविकपणेंच नोकरीचा राजमार्ग ते पतकरतात. ही गोष्ट केव्हांही नाकबूल करतां येणार नाहीं कीं, पुष्कळसे हिंदू आपल्या धन्याची नोकरी करूं इच्छितात. पण त्यांचे विशेष हितसंबंध दुसरीकडे असतात. दरवर्षीं होणाऱ्या सिव्हिल सर्व्हिस परीक्षेस दोन्ही जातींतून बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पाहिल्यास सरकारी नोकरींत शिरण्याच्या दोन्ही जातींत असलेल्या उत्कट इच्छेचें उत्कृष्ट चित्र दृष्टीस पडतें. ग्याझिटेड अधिकाऱ्यांच्या मोकळ्या जागांपैकीं शेंकडा पन्नास जागा हैद्राबाद

सिव्हिल सर्व्हंटस्‌करितां राखून ठेवण्याचा नियम आहे. बाकीच्या जागा खालच्या अधिकाऱ्यांच्या बढतीनें किंवा अन्य तऱ्हेनें भरण्यांत येतात. वर्षांतून एकदां हैद्राबाद सर्व्हिसमध्यें येऊं इच्छिणाऱ्या व ज्यांची लायकी आहे अशा सगळ्या विद्यार्थ्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बोर्डापुढें यावें लागतें. हें बोर्ड प्रत्येक विद्यार्थ्यांची वैयक्तिक मुलाखत घेऊन मग ठरवितें कीं कोणत्या विद्यार्थ्यास चढाओढीच्या परीक्षेस बसूं द्यावें. हें ठरवितांना विद्यार्थ्यांच्या कॉलेजमधील आयुष्यक्रमाच्या शैक्षणिक व खेळाडू-वृत्तिबाबत त्याच्या घराण्याचा; त्याच्या सामाजिक दर्जाचा आणि त्याच्या स्वतःच्या व्यक्तीत्वाचा विचार केला जातो. ह्या कसोटीस जे उतरत नाहींत त्यांना पुढें जावयास मिळत नाहीं. प्रस्तुत विषयाच्या स्पष्टीकरणार्थ खालीं सात वर्षांचे आंकडे दिले जात आहेतः---

	अर्ज करणारांची संख्या.		बोर्डानें पास केले त्यांची संख्या.	
वर्ष	हिंदु	मुसलमान.	हिंदू	मुसलमान
१९२६	२०	१६२	१६	१२०
१९२७	१६	९२	५	४७
१९२८	४	५५	४	३४
१९२९	२२	४९	१६	३७
१९३०	१७	४२	८	२०
१९३१	१२	४१	५	२०
१९३२	९	३९	६	२३

बोर्डाकडून हिंदू विद्यार्थ्यांना फारच समाधानकारक रीतींनें वागविलें जातें. कांहीं वेळां तर मुद्दामच मुसलमानांपेक्षां कमी प्रकारची कसोटी त्यांना लाविली जाते. कारण हिंदूंची संख्या येते त्यापेक्षां जास्त सिव्हिलसर्व्हिसमध्यें यावी म्हणून असें केलें जातें.

दुसरें कारण हें कीं, या संस्थानांत हिंदूंपेक्षां मुसलमानांची असल्या परीक्षे-मध्यें लायकी जास्त असल्याचें दिसून येतें. कारण १९२६ पासून १९३१ पर्यंत सिव्हिल सर्व्हिसमधील ३८ मोकळ्या जागांपैकीं फक्त ४ च जागा हिंदू मिळवूं शकले. हिंदू विद्यार्थी कमी कां असतात यासंबंधीं नेहमीं देण्यांत येणारें उत्तर सरकारला माहीत आहे. उत्तर हें देण्यांत येतें कीं, सध्यां प्रचलित असलेली शिक्षणपद्धति ज्यामध्यें शिक्षणाचा माध्यम दुय्यम व वरिष्ठ शिक्षणांत उर्दू किंवा इंग्रजी ठेविला गेला आहे त्यामुळें हिंदु विद्यार्थ्यांची कुचंबणा होते. सरकारला हें उत्तर समाधानकारक वाटत नाहीं. परंतु येथें शिक्षणपद्धतीच्या योग्यायोग्यतेचा विचार करावयाचा नाहीं. इतकें सांगितलें असतां पुरें आहे कीं, तहसीलदारीच्या वेळोवेळीं होणाऱ्या परीक्षेस किंवा नॉन गॅझेटेड नोकरांच्या खात्याकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेंत हिंदु विद्या-र्थ्यांचा तुटवडा स्पष्टपणें निदर्शनास येतो. परंतु तेंच दुसऱ्या इतर परीक्षेंत जरी उर्दू भाषा तेथेंहि असते तरीपण तेथें त्यांची उणीव दिसून येत नाहीं. उदाहरणार्थ

येथील वकीलीच्या परीक्षेस मागील पांच वर्षांत ३१६७ हिंदु विद्यार्थी बसले व १३१८ मुसलमान विद्यार्थी बसले. संस्कृती किंवा धर्म ही नोकरीवर नेमणूक करण्या बाबत कसोटी होऊं शकत नाहीं. व्यक्तीची लायकी हीच नेमणुकीच्या बाबतींत महत्त्वाची बाब विचारांत घ्यावयाची असते. तेव्हां अशा परिस्थितींत मुसलमानांच्या वांट्यास लोण्याचा मोठा गोळा आल्यास त्यांत कांहीं मोठेसें आश्चर्य नाहीं. विशेषतः जेव्हां ही गोष्ट लक्षांत घेतली जाईल कीं, २० किंवा २० वर्षांवरील वयाच्या दरहजारीं मुसलमानांची संख्या १६० आहे तर हिंदूमध्यें ही संख्या ७१ आहे.

वरिष्ठ सरकारी नोकऱ्यांमधील हिंदूंचें प्रमाण यासंबंधीं वर लिहिलें गेलें इतकें पुरें आहे. कनिष्ठ नोकऱ्यामध्यें त्यांचें प्रमाण कसें आहे त्यांचे आकडे उपलब्ध नाहींत. परंतु इतकें खात्रीपूर्वक सांगतां येईल कीं, त्यांचें प्रमाण वरिष्ठ नोकऱ्यांपेक्षां कनिष्ठ नोकऱ्यांत जास्त आहे.

आंकडे स्पष्टपणें खरी काय स्थिति आहे, ते दाखवीत आहेत. विचारी आणि निःपक्षपाती टीकाकाराला हें पटविण्यास पुरें आहे कीं, सरकारी नोकरीच्या नेमणुकीमध्यें सरकार हिंदु–मुसलमानांचा भेदभाव ठेवीत नाहीं. याबद्दल आतां पुरेसें लिहून झालें आहे. आतां फक्त पुस्तककर्त्यानें जी गोष्ट वगळली आहे ती ह्या चित्राची दुसरी बाजू विशद करण्याचें काम राहिलें आहे. संस्थानामध्यें जवळ जवळ २२००० खेडीं आहेत. बहुतेक प्रत्येक खेड्याला एक माली पाटील, एक पोलीस पाटील व एक कुलकर्णी असतो. हे तिन्ही हिंदूच असतात. उदाहरणार्थ परभणी जिल्ह्यांत जेथें हिंदु–मुसलमानांच्या लोकसंख्येचें प्रमाण १०० स १२ आहे तेथें शेंकडा ९९ पाटील कुळकर्णी हिंदूच आहेत. हिंदु सर्व संस्थानभर पसरलेले असल्यामुळें व पाटील कुळकर्णीपणाचा मक्ताच त्यांनीं घेतला असल्यामुळें जिल्ह्यांतून त्यांचें वजन व त्यांचा दरारा फार आहे. त्यांचें वेतनही प्रमाणांत आहे. चालू सालच्या बजेटांत फक्त दिवाणी खेड्यांच्या पाटील कुळकर्ण्यांच्या वेतना (स्केला) करितांच कांहीं नाहीं तरी २२.१० लाखाइतकी मंजुरी झाली आहे. ही रक्कम सर्व वेतनाची. कारण संस्थानचें शेंकडा ४६ क्षेत्र जहागिरीस दाखल आहे व तें यांत वगळलें आहे. ह्यावरून हें दिसून येईल कीं, सरकारी खात्यांतून जरी मुसलमानांची संख्या ज्यास्त येत असली तरी हिंदूंनीं पाटील कुळकर्ण्यांच्या रूपानें ग्रामव्यवस्थेचा मक्ताच घेतल्यामुळें हें तराजूचें पारडें बरोबर होत आहे.

सरकारची हिंदू प्रजा सर्वांच्या अगोदर हें कबूल करील कीं, पुस्तककर्त्याचा नेम चुकला. हिंदु प्रजेला हें कळून येईल कीं, सरकारच्या अंतःकरणाला प्रजेची उन्नती करणें व त्यास सुख देणें जितकें प्रिय आहे तितकें मुसलमान ख्रिश्चन किंवा पारशी यांचें आहे. सरकारला सर्व प्रजेच्या राजनिष्ठेची सारखीच किंमत असून सरकारी नोकरींत किंवा इतरत्रही सरकारला जातीजातींतील भेदभाव केव्हांही पसंत नाहीं.

ह्याच पुस्तककर्त्याचीं असलींच दुसरीं दोन पुस्तकें (ज्यांमध्यें हिंदूंवरील अन्यायाच्या बाबतींत विवरण केलें आहे) व संस्थानांतील प्रचलित शिक्षणपद्धति यासंबंधीं सरकारकडून वेगळ्या प्रसिद्धिपत्रकांत विचार केला जाईल.

हैद्राबाद संस्थानच्या हिंदू प्रजेनें जाहीरसभेंत निवडून दिलेल्या

स्टँडिंग कमिटीतर्फे उत्तर.

एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलच्या ना. अध्यक्षांनीं डेप्युटेशनची भेट घेण्याचें नाकारल्या कारणानें, हैद्राबाद संस्थानच्या हिंदु प्रजेनें जाहीरसभेंत निवडून दिलेल्या स्टँडिंग कमिटितर्फे ता. २८ जानेवारी १९३२ इ. रोजीं रजिस्टर करून टपालमार्गें ना. अध्यक्षांच्या हुजूरातीस एक मेमोरिअल सादर केलें. हें विनंतीपत्रक ऊर्फ मेमोरिअल वर्तमानपत्रांतून यापूर्वीच प्रसिद्ध झालें आहे. सदरील मेमोरिअलमध्यें सरकारच्या नजरेस खालील गोष्टी आणण्यांत आल्या होत्या त्या ह्या कीं, सरकारी नोकरीवर नेमणूका करण्यांत हिंदूंच्या हक्काची पायमल्ली केली जाते, त्यांचें सरकारी नोकरींत प्रमाण अगदीं अल्प आहे व मेमोरिअलच्या तिसऱ्या पॅराग्राफमधील शेवटच्या भागांत हें दाखविलें होतें कीं, सर्व जातीच्या लोकांना सरकारी नोकरींत सारखाच वाव असावा व कोणत्याही जातीवर खास मेहेरबानी नसावी.

संस्थानांमधील सरकारी नोकऱ्यांमध्यें हिंदूंची सद्यःस्थिती काय आहे हें दाखविण्याकरितां स्टँडिंग कमिटीनें एक पुस्तकही सोबत पाठविलें होतें. ज्यांच्यामध्यें संस्थानांतील नोकऱ्यामधून अधिकाराच्या जागेवर हिंदूंचें प्रमाण कसें आहे यासंबंधीं विवेचन केलें होतें.

ह्या विषयावर सरकारतर्फे प्रसिद्धीखात्याच्या द्वारें एक कम्युनिकही प्रसिद्ध झालें आहे. व तें कम्युनिक २३ फेब्रुवारी १९३२ च्या बुलेटिनमध्यें छापलें गेलें आहे. विशेष स्पष्टीकरणार्थ आणखी एक कम्युनिक दिल्लीहून ता. २ मार्च १९३२ रोजीं प्रसिद्ध झालें असून तेंही ७ मार्च १९३२ च्या बुलेटिनमध्यें छापलें गेलें आहे.

सरकारतर्फे सरकारची बाजू स्पष्ट करणारीं वरील कम्युनिक प्रसिद्ध केल्याबद्दल स्टँडिंग कमिटी सरकारची आभारी आहे. ह्या कम्युनिकांमधून सरकारतर्फे हें दाखविण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे कीं, नोकऱ्या देतांना सरकार जातीचा प्रश्न मुळींच लक्षांत घेत नाहीं. आणि सरकारी नोकऱ्यांतून मुसलमान ज्यास्त कां याचीं कांहीं कारणेंही दिलीं आहेत. ह्या कारणांचा विचार पुढें करण्यांत येईल. पण त्यापूर्वीं हें मान्य केलें पाहिजे कीं, वरील कम्युनिकाच्या शेवटीं जें तत्त्व सांगण्यात आलें तें कमिटीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें व बहुमोलाचें आहे. तें तत्त्व म्हणजे सरकारला सर्वांच्या राजनिष्ठेची सारखीच किंमत असून सरकारी नोकऱ्यांतून अथवा

इतर दिशेनेंही जातिभेद केलेला मुळींच खपणार नाहीं. ह्या मेमोरिअलमध्यें कमिटी-नेंही ह्याच तत्त्वावर जोर दिला असून ह्या प्रसंगानें पुनः तेंच तत्त्व जोरानें पुढें मांडीत आहे व कमिटीचें कार्यक्षेत्रही ह्या तत्त्वाला अनुलक्षूनच आंखलें गेलें आहे. निःपक्ष-पाती वाचकाला मेमेरिअलमध्यें जातिभेदाचें भूत कोठेंही आढळणार नाहीं आणि कमिटीतर्फें स्पष्टपणें असें जाहीर करण्यांत येतें कीं, जातिभेदाची भावना कमिटीच्या-पुढें केव्हांही नव्हती. कमिटीचें ध्येय हें आहे कीं, संस्थानांतील सर्व जातींना समान-तेनें वागविलें जावें व जातिभेदाचें हें भूत काढून टाकण्याकरितां कमिटी शक्य तितका प्रयत्न करील. संस्थानांत हिंदूंची संख्या शेंकडा ८५ आहे आणि कमिटीला हें आढळून आलें कीं, हिंदूंचे हक्क पद्धतशीर रीतीनें मारले जात आहेत म्हणून त्यांनीं हें काम हातीं घेतलें; पण त्यामुळें कमिटी जातिविशिष्ट काम करणारी संस्था ठरूं शकत नाहीं. कमिटी स्पष्टपणें जाहीर करूं इच्छिते कीं, जोंपर्यंत कमिटिचे सभासद हिंदूंकारितां विशेष सवलतीची मागणी करणार नाहींत व असल्या हक्काची मागणी करणार नाहींत कीं, ज्यामुळें दुसऱ्या जातीचें नुकसान होईल तोंपर्यंत जातीविशिष्ट संस्थेचें खापर त्यांच्या माथीं फोडतां येत नाहीं. जोंपर्यंत कमिटी न्यायाची याचना करीत आहे तोंपर्यंत जातिविशिष्टतेचा शिक्का त्यांच्यावर मारतां येत नाहीं.

हिंदूंच्या लोकसंख्येसंबंधीं लिहितांना कम्युनिक म्हणतें कीं, आदिहिंदूंची हिंदूंमध्यें गणना करणें योग्य होणार नाहीं. कमिटीला सरकारकडून प्रसिद्ध झालेल्या ह्या विधानाबद्दल आश्चर्य वाटत आहे. कारण हिंदूंमध्यें अशा तऱ्हेचे भेद पाडण्याचा प्रयत्न आजपर्यंत ह्या संस्थानमध्यें झाला नव्हता. कमिटी जोरांत हें जाहीर करते कीं, आदिहिंदु हें नांवच ज्याप्रमाणें दर्शवित आहे त्याप्रमाणें आदिहिंदु हे हिंदूच होत. इतर हिंदू ज्या देवांना भजतात त्याच देवांना आदिहिंदू भजतात. इतर हिंदु ज्या ग्रंथांना प्रमाण मानतात त्याच ग्रंथांना आदिहिंदूही प्रमाण मानतात व इतर हिंदूं-च्याच चालीरीती ते पाळतात. मि. अजीज अहमदसाहेब, असिस्टंट डायरेक्टर इन्फर-मेशन ब्युरोनें जेव्हां हेंच प्रमाण पुढें मांडलें तेव्हां सर्व हिंदूंनीं त्याचा जोरानें निषेध केला व स्थानिक आदिहिंदुपुढाऱ्यांनीं हीच भावना बुलेटिनवर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध केली. खरें पाहूं जातां एका जातीमध्यें अशा तऱ्हेचे भेद पाडण्यास एका कारणा-शिवाय कोणतेंही कारण दिसत नाहीं. आणि तें कारण म्हणजे एका जातींतील कांहीं चालकांची विभक्तीकरण करून एकाची दुसऱ्याशीं लढालढी लावून देणें हेंच होय.

कमिटीला हें माहीत आहे कीं, आजपर्यंत सरकारनें " फोडा आणि झोडा " या तत्त्वाचा केव्हांही अवलंब केला नव्हता; सरकारला असल्या तऱ्हेचे खोडसाळ भेद करण्याची कोणतीही अवश्यकता नाहीं.

सदरीं कम्युनिकमध्यें असें म्हटलें आहे कीं, आदि हिंदूंपैकीं अधिकांश लोक अधिकाराच्या नोकरीची कधीं आकांक्षा बाळगीत नाहींत व ते त्या गोष्टीस लायकही

नाहींत तेव्हां असें सुचविण्यांत येतें कीं त्यांची गणना हिंदूंमध्यें करूं नये. ह्या विधानांतील मूलभूत कल्पना अत्यंत सदोष असून जर हें विधान तसें पुढें वाढविलें तर त्यापासून हास्यापपद अनुमानें निघतात. उत्तरादाखल असेंही म्हणतां येईल कीं, मुसलमानांमध्येंही असे लोक आहेत कीं, जे नोकरीची कधीं आकांक्षा बाळगीत नाहींत व जे नोकरीस लायकही नसतात. असला हा बहुसंख्याक समाज मुसलमानांतून वगळल्यास तें योग्य, स्पृहणीय व न्यायीपणाचें होईल काय ?

कम्युनिकमधील दुसरा मुद्दा पुढें मांडण्यांत आला आहे तो असा कीं, बहुशः शहरांत राहणाऱ्या लोकसंख्येंतूनच नोकरवर्गाची भरती केली जाते. शहरांत राहणाऱ्या हिंदूंचे प्रमाण शहरांत राहणाऱ्या मुसलमानांच्या प्रमाणाशीं १·६ ते १ असें आहे व यापेक्षां ज्यास्त प्रमाणांत हिंदूंना नोकऱ्या देऊं नयेत. प्रथमतः कमेटीला हेंच कळत नाहीं हें विधान ह्या मुद्याला लागूं कसें होतें व त्यांत काय राम आहे. नुसता शहरांत राहणाऱ्या लोकसंख्येचाच ह्या बाबतींत विचार कां व्हावा हेंच कमिटीस समजत नाहीं. सरकारी नोकरीकरितां उमेदवाराच्या शैक्षणिक व इतर लायकीचा विचार करावा लागतो आणि असा कायदा कोठेंही नाहीं कीं, उमेदवार खेड्यांतला राहणारा आहे म्हणून तो नोकरीस नालायक समजण्यांत यावा. थोड्या वेळापुरतें जर असें गृहीत धरलें कीं असा कायदा आहे तरीसुद्धां हिंदु–मुसलमानाचें प्रमाण (शहरांत राहणाऱ्यांचें) १·६ ते १ असल्याचें सरकारला कबूल आहे. ह्या प्रमाणाच्या दृष्टीनें विचार केला तरी सुद्धां हिंदूंचें प्रमाण नोकऱ्यांमध्यें मुसलमानांच्या बरोबरीनें नव्हे तर त्यांच्यापेक्षां अधिक असावयास पाहिजे. ह्या प्रमाणाच्या दृष्टीनें सुद्धां हिंदूंच्या नोकऱ्यांमधील अल्प प्रमाणाचें समर्थन करतां येत नाहीं. कम्युनिकमध्यें सरकारी नोकऱ्यांमध्यें मुसलमानांचें प्रमाण ज्यास्त असण्याचीं दोन कारणें दाखविलीं आहेत. एक हें कीं हिंदूंपेक्षां मुसलमान हे स्वभावतः व त्यांच्या ऐतिहासिक परंपरेमुळें सरकारी नोकरीकडे त्यांचा विशेष कल असतो व दुसरें हें कीं, सिव्हिलसर्व्हिससारख्या परिक्षेमध्यें हिंदूंपेक्षां ते ज्यास्त लायक ठरतात.

पहिल्या कारणासंबंधीं बिनधोकपणें असें म्हणतां येईल कीं, तें बरोबर नसून प्रमेयावरून तें अनुमान काढलें आहे तेंच दोष आहे. हिंदूंना कित्येक वर्षेपर्यंत सरकारी नोकरींत वाव मिळूं द्यावयाचा नाहीं, त्यांना सवलती द्यावयाच्या नाहींत, व अशा तऱ्हेनें सिव्हिलसर्व्हिसच्या चढाओढीच्या परीक्षेस बसण्यापासून त्यांना परावृत्त करावयाचें व मग म्हणावयाचें कीं, हिंदूंमध्यें असल्या परीक्षेस बसण्याची लायकीच नाहीं. अशा तऱ्हेचें म्हणणें म्हणजे सिद्ध करावयाचें प्रमेय गृहीत धरून वाद करण्यासारखेंच आहे. सिव्हिलसर्व्हिसच्या परिक्षेस हिंदूंची संख्या कमी असते. याचें कारण नालायकी किंवा नोकरीकडे त्यांचा कल नसणें हें नसून त्यांना खात्रीपूर्वक हें वाटत असतें

कीं, आपण निवडून येण्याचा संभव कमी असून ह्या नाहींतर त्या कारणानें आपण वगळलें जाणार हें कारण आहे.

इ. स. १८८५ (१२९५ फ.) मधील सरकारी नोकरीचे आंकडे लक्षांत घेतले असतां आपणास असें आढळून येईल कीं, हिंदूंची संख्या एकूण ४९४९ होती तर मुसलमानांची संख्या २८८२ होती. तेच १९२० ई. (१३३० फ) चे आंकडे पाहिले तर प्रमाण यांच्या उलट दिसून येईल. हिंदूंची संख्या २३९३ तर मुसलमानांची संख्या ५१७४ आहे. १२९५ व १३३० फ. मधील नोकरांचे तक्ते दिले आहेत, त्याव- रून आपणास दिसून येईल कीं, १३३० फ. मध्यें पगाराचें मान जसजसें वाढत जातें, तसतशी हिंदूंची संख्या ज्यास्त प्रमाणांत कमी होत जाते. १३४० फ. (१९३० ई) मध्यें परिस्थिती ह्या पेक्षांहि वाईट झाली आहे असें कामिटी उघडपणें विधान करते. दुःखाची गोष्ट ही आहे कीं, ह्या सालाचे आंकडे कामिटीला मिळूं शकले नाहींत.

तक्ता नंबर १ इ. स. १८८५ (१२९५ फ.) मध्यें प्रत्येक खात्यांत हिंदू मुसलमान नोकरांचें प्रमाण दाखविणारा तक्ता.

खात्याचें नांव.	हिंदू.	मुसलमान.
१ सेक्रेटरीएट	३७	१६४
२ रेव्हिन्यू (माल)	२३०६	३४७
३ जंगल	२५	२७
४ अबकारी	६२	२९
५ करोडगिरी	१३००	५८
६ स्टँप	१२	५
७ टांकसाळ	१५	१२
८ टपाल	८४	११८
९ खजिना	१४१	८५
१० न्याय	२३४	३७६
११ पोलीस	४७९	१४३५
१२ शिक्षण	११४	११७
१३ मेडिकल	७	२६
१४ छापखाना	१०	१७
१५ तामिरात	११०	५५
१६ म्युनिसिपॉलिटी	१०	३३
१७ स्टेबलर	१	३
१८ भाषांतर	२	०
एकूण	४९४९	२८८२

१९२० इ. (१३१० फ.) मध्यें हिंदू-मुसलमानांची पगारवारीनें संख्या दर्शविणारा तक्ता नंबर २.

वार्षिक पगार.	हिंदू.	मुसलमान.
३०० ते ६००	१६३९	३१०५
६०० ते ९००	२५६	६६१
९०० ते १२००	१९५	४२९
१२०० ते १५००	७४	१३८
१५०० ते १८००	७०	१७०
१८०० ते २४००	३८	१५८
२४०० ते ३०००	२१	१०१
३००० ते ३६००	३२	१२४
३६०० ते ४२००	४	४४
४२०० ते ५०००	९	४७
५००० च्या वर	४८	१९७

वरील आंकड्यांवरून सरकारी पत्रकांत ओढून ताणून जें कारण दाखविण्याचा प्रयत्न केला आहे कीं, ऐतिहासिक परंपरेनें मुसलमानांचा ओढा सरकारी नोकरीकडे हिंदूंपेक्षां अधिक आहे तें किती निराधार आहे हें सिद्ध होतें. १८८५ पासून सरकारचें धोरण बदललें असून हिंदूंना नोकरींत घेण्याचें प्रमाण कमी कमी करण्यांत आलें आणि आतां जेव्हां हिंदूंचें प्रमाण अगदींच कमी झालें तेव्हां हें कारण पुढें करण्यांत आलें कीं, हिंदू हे स्वभावतःच सरकारी नोकरी करण्यास नाखुष असतात. हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, पूर्वी देशमुख देशपांड्यांच्या अधिकाराच्या जागेवर हिंदू असत व देशाच्या कामकाजाची व्यवस्था पूर्णपणें त्यांच्याकडे होती. जेव्हां त्यांच्याकडून हें काम काढून घेण्यांत आलें तेव्हां सरकारनें एका हुकुमान्वयें असें अभिवचन दिलें होतें कीं, मालगुजारी खात्यांत देशमूख देशपांड्यांना योग्य अशा नेमणुका दिल्या जातील. हा हुकूम २८ सफर १२८७ हिजरी (१८७० इ.) च्या सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध झाला आहे. कमिटीला ही गोष्ट नमूद करण्यास अत्यंत खेद वाटतो कीं, हें वचन पाळलें गेलें नाहीं.

सरकारी पत्रकांत सरकारी नोकरींत निवडून येण्यास उमेदवारास खालीं दिलेले गुण अंगीं असणें अवश्य आहे असें म्हटलें आहे. (१) उमेदवाराचा कॉलेजमधील आयुःक्रम (२) खानदानी हक्क (३) त्याचा सामाजिक दर्जा (४) त्याचा व्यक्तिप्रभाव. पहिल्या कारणासंबंधीं असें केव्हांही म्हणतां येणार नाहीं कीं हिंदु दुसऱ्यांपेक्षां या बाबतींत मागासलेले आहेत. हें सुप्रसिद्ध आहे कीं ते युनिव्हर्सिटीच्या परीक्षांतून पहिला नंबर पटकावितात. दुसरें खानदानी हक्क

या बाबतींत हिंदूंना फार मोठी अडचण आहे. खानदानी हक्क म्हणजे काय यासंबंधीं सांगितलेंच आहे कीं खानदानी हक्क म्हणजे नोकरीकरितां उमेद्‌वार असलेला विद्यार्थी एखाद्या विद्यमान सरकारी नोकरींत असलेल्या गृहस्थाच्या खानदानीचा असावयास पाहिजे. याचा परिणाम हा होतो कीं उमेद्‌वार कितीहि लायक असला तरी जर तो सरकारी नोकराच्या खानदानांतील नसेल तर वगळला जातो. या तत्त्वामुळें सरकारी नोकरी म्हणजे कांहीं खानदानीचा मक्ताच होऊन बसला आहे. यापूर्वी हें दाखविलेंच आहे कीं, सरकारी नोकरींत हिंदूंचें प्रमाण अगदींच अल्प आहे आणि याच तत्त्वामुळें हें प्रमाण कधींच वाढूं शकत नाहीं. सामाजिक दर्जा आणि व्यक्तिप्रभाव हे संदिग्ध शब्द आहेत आणि त्यामुळें लायकी अथवा नालायकीची निव्वळ सिलेक्शन कमिटीच्या निव्वळ मर्जीवर अवलंबून राहते आणि या बोर्डावर कोणीही हिंदू नसतो. अशीं उदाहरणें पुष्कळशीं दाखवितां येतील कीं हिंदु उमेद्‌वार एवढ्याचकरितां निवडला नाहीं कीं ज्या जागेकरितां तो उमेद्‌वार आहे ती जागा त्याला शोभेशी नाहीं. उमेद्‌वाराची योग्यता त्यापेक्षां जास्त आहे आणि म्हणून त्याला समज दिली जाते कीं बाबा कशाला तूं ह्या भानगडींत पडतोस? दुसऱ्या धंद्यांत पडलास तर तुझा भाग्योदय होईल. सारांश सरकार आपली बाजू सावरण्याचा कितीही प्रयत्न करो हिंदूंची ही पक्की खात्री झाली आहे कीं ह्या नाहीं त्या निमित्तानें त्यांना सरकारी नोकरींतून मुद्दाम वगळण्यांत येतें. जर त्यांना समान तऱ्हेचा वाव मिळेल तर कांहीं काळानें ही त्यांची समजूत दूर होईल.

सरकारी पत्रकांत हा प्रयत्न केला गेला आहे कीं हैद्राबाद सिव्हिलसर्व्हिसच्या परीक्षेस हिंदुमुसलमानांचे विद्यार्थी किती बसतात याचे आंकडे देऊन मुसलमानांची संख्या जास्त असल्याचें कारण दाखवून असें ध्वनित केलें आहे कीं हिंदू परीक्षेंत मुसलमानांबरोबर टिकाव धरूं शकत नाहींत. हेंही सांगण्यांत आलें आहे कीं शेंकडा ५० जागा हैद्राबाद सिव्हिल सर्व्हंटसकरितां राखून ठेवण्यांत आल्या आहेत आणि म्हणून मुसलमानांची संख्या अधिकाऱ्यांच्या जागेवर ज्यास्त प्रमाणांत आहे.

प्रथमतः वरील कारणानें सरकारच्या बाजूला बळकटी येत नाहीं. कारण जरी सिव्हिल सर्व्हिस क्लास स. १८८४ ई. (१२९४ फ.) मध्यें उघडला गेला तरी जवळ जवळ २८ वर्षे हा क्लास बंदच होता. आणि सरकारी नोकरीच्या जागा परीक्षेशिवाय इतर मार्गांनीं भरल्या जात. म्हणूनच हें स्पष्ट दिसून येतें कीं शेंकडा ५० अधिकाऱ्याच्या जागेवर सिव्हिल सर्व्हंट येऊं शकले नाहींत. दुसरें सिव्हिल सर्व्हिस क्लासमध्यें दाखल करून घेण्याची परीक्षा चढाओढीची नाहीं. सिव्हिल सर्व्हिस क्लासमध्यें नेमणूक व निवडणूक ह्या पद्धतीनें विद्यार्थी घेतात. चढाओढीच्या पद्धतीनें मुळींच घेत नाहींत. म्हणून हें म्हणणें न्याय होणार नाहीं कीं हिंदु मुसलमानांबरोबर परीक्षेंत टिकाव धरूं शकत नाहींत. स्वतः सरकारी पत्रकानेंच हें कबूल केलें आहे कीं वकीली-

सारख्या चढाओढीच्या परीक्षेस हिंदू विद्यार्थी मोठ्या प्रमाणांत बसतात आणि सिव्हिल सर्व्हिस परीक्षेचा अभ्यासक्रम पाहिल्यास तो वकीलीच्या परीक्षेच्या अभ्यासक्रमासारखाच आहे.

नंतर सरकारी पत्रकांतील कांहीं ठिकाणचीं विधानें एकमेकांच्या विरुद्ध असल्याचें कमिटी निदर्शनास आणूं इच्छिते. आणि ह्याचें कारण हेंच असेल कीं हिंदूंचें सरकारी नोकरींत अत्यंत अल्प प्रमाण कां याचें कारण दाखविण्यास सरकारजवळ ह्यापेक्षां अधिक चांगला व बळकट पुरावा नाहीं हें होय. एका वाक्यांत सरकारी पत्रक म्हणतें कीं मुसलमान हे स्वभावतः व ऐतिहासिक परंपरेनेंच सरकारी नोकरीकडे ज्यास्त वळतात व ह्यावरून असें ध्वनित केलें गेलें आहे कीं हिंदू लोकांना सरकारी नोकरीची पर्वा नाहीं; पण लगेंच पुढें असें म्हटलें आहे कीं आपल्या राजाची नोकरी करावी अशी हिंदूंची महत्त्वाकांक्षा असते. जर हिंदूंना नोकरीची पर्वा नाहीं तर मग अशी महत्वाकांक्षा ते कां बाळगतात ? दुसऱ्या ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं सिव्हिल सर्व्हिस परीक्षेसारख्या परीक्षांमधून उत्तीर्ण होण्याची लायकी मुसलमानांत विशेष आहे. हिंदू त्या मानानें कमी लायक असून मुसलमानांची ते बरोबरी करूं शकत नाहींत आणि अशी तक्रार केली गेली आहे कीं हिंदू हे चढाओढीच्या परीक्षेंत फार मोठ्या प्रमाणांत बसत नाहींत. परंतु त्याच पॅरिग्राफांत सरकारी पत्रकांत हें कबूल केलें आहे कीं वकीलीच्या परीक्षेस गेलीं पांच वर्षें हिंदू ३१६७ बसले तर मुसलमान ११९८ च बसले. ह्याचें कारण फक्त हेंच कीं ह्या परीक्षेस बोर्डाची निवडणूक वगैरेसारख्या अटी नसून सर्वांस सारखीच मोकळीक आहे. दुसरें उदाहरण द्यावयाचें म्हणजे नुकीच करोडगिरी खात्याचे ऑडिटर्स नेमण्याकरितां एक चढाओढीची परीक्षा झाली आणि कमिशनर करोडगिरीनें परीक्षेंत आपल्या गुणानें पास होण्याच्या मार्गाशिवाय इतर कोणत्याही मार्गानें पास होण्याची सवलत देण्याचें नाकारल्यामुळें निकालांत हिंदूंचें प्रमाण ३ ते १ असल्याचें आढळून आलें. खरी स्थिती ही असल्यामुळें सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेंत हिंदू विद्यार्थी कमी येतात याचें कारण एखाद्या जातीचा स्वभाव किंवा लायकी हें नसून त्याचें कारण अन्यत्र शोधलें पाहिजे. यावरून जीं दोन कारणें मुसलमानांचें प्रमाण ज्यास्त असण्याबाबत सरकारनें पुढें केलीं आहेत तीं किती कुचकामाचीं आहेत हें सिद्ध होतें.

सरकारी पत्रकांत पाटील कुलकर्ण्यांना मधें आणून त्यांच्याशीं तुलना करून मुसलमानांचें सरकारी नोकरींतील प्रमाण जास्त कां याचें समर्थन करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. सरकारी नोकऱ्यांबाबत विचार करतांना पाटील कुलकर्ण्यांचा प्रश्नच उद्भवत नाहीं. नोकऱ्या ह्या पाटील कुलकर्ण्यांच्या वतनाप्रमाणें वंशपरंपरा चालत नाहींत. जर पाटील कुलकर्णी अशिक्षित किंवा नालायक असेल तर प्रचलित कायद्यान्वयें त्याचें वतन काढून घेतां येत नाहीं. जर वतनदार विधवा किंवा अज्ञान

असेल तर गुमास्ता नेमण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. पाटील कुलकर्ण्यांचा वारसा मंजूर करतांना व सरकारी नोकरीवर नेमणूक करतांना ज्या गोष्टी महत्त्वाच्या समजल्या जातात त्या अगदीं भिन्न आहेत. जर सरकारी नोकरी ही वंशपरंपरा चालू शकते, असें सरकार समजत असेल तरच पाटील कुलकर्ण्यांचा प्रश्न तर्कशास्त्राच्या कसोटीला उतरतो. नुसती अशा तऱ्हेची तुलना करणें हें निव्वळ निरर्थक आहे.

सरकारनें सरकारी नोकऱ्यांत मुसलमानांचें प्रमाण जास्त कां यासंबंधीं जीं कारणें दाखविलीं त्याचें यापेक्षां जास्त उत्तर देण्याचें कारण नाहीं कारण कमिटीचा हा उद्देश नाहीं कीं सरकारी अधिकारी आणि हिंदु प्रजा यांमध्यें वैमनस्य वाढावें. परंतु त्याबरोबरच कमिटी एकमतानें ह्या गोष्टीवर जोर देऊं इच्छिते कीं कमिटीला सर्व पक्षांशीं समता पाहिजे व कमिटीला कसल्याही प्रकारचा जातिभेद नको आहे. कमिटीला मुसलमान प्रजाबंधूंविरुद्ध कोणत्याही प्रकारची तक्रार नाहीं. जें कांहीं कमिटीचें मागणें आहे तें हें कीं, सरकारी धोरण बदललें पाहिजे असे कीं त्या योगानें सर्वांची सारखी परीक्षा होईल, सर्वांवर सारखा विश्वास बसेल व सर्वांना सारखाच फायदा मिळेल. सरतेशेवटीं सरकारला कमिटी आश्वासन देते कीं इतर राजनिष्ठ प्रजेपेक्षां हिंदूंची राजनिष्ठा तसूभरही कमी नाहीं आणि कमिटीस असा विश्वास आहे कीं त्यांच्या न्याय्य मागण्या जर राजेसाहेबांच्या कानावर गेल्या तर राजनिष्ठ प्रजेच्या मनावर सरकारी धोरणाविषयीं जें हें मत झालें आहे कीं बळी तो कान पिळी हें धोरण आहे तें केव्हांही राहूं दिलें नसतें. आमच्या परमप्रिय राजेसाहेबांनीं एका संस्मरणीय प्रसंगीं जे श्रेष्ठ आणि मुत्सद्दीगिरीचे विचार प्रदर्शित केले होते कीं न्यायानें राज्य करणें पुरें नसून प्रजेचा विश्वास बसला पाहिजे कीं आपल्यावर जें राज्य केलें जातें तें न्यायाचें आहे; ह्या श्रेष्ठ विचारावरच हिंदू प्रजेची आशा व विश्वास अवलंबून आहे.

हैद्राबाद दक्षिण,
२३ मार्च १९३२

सही. **काशिनाथराव वैद्य,**
स्टँडिंग कमिटी बोलावणारे.

हैद्राबाद संस्थान राजकीय परिषद्.

अधिवेशन पहिलें, अकोला.

(ता. २७-८-१९३१)

अध्यक्ष--बॅ. रामचंद्रराव नाईक यांचें भाषण

जबाबदार राज्यपद्धतीची मागणी

स्वागताध्यक्षांचें भाषण.

परिषदेचे स्वागताध्यक्ष मि. सिराज उलहसन तिरमिझी हायकोर्ट वकील यांनीं आपलें भाषण उर्दूंत केलें. ते आपल्या भाषणांत म्हणाले, "प्रत्येक देश गुलामगिरींतून व परदास्याच्या शृंखलांतून आपली मुक्तता करून घेण्याचा प्रयत्न करीत असतांना हैद्राबादचाही हा जन्मसिद्ध हक्क कोणास नाकारतां येणार नाहीं. वऱ्हाड आमच्यापासून दुरावला जाण्याचा संभव असून त्यामुळें आमच्या मनाला अत्यंत क्लेश होत आहेत.

वऱ्हाडशीं आमचा ऋणानुबंध.

आम्ही व आमचे वऱ्हाडी लोक हे एकच आहोंत असें जगाच्या निदर्शनास आणण्यासाठीं आम्हीं ही परिषद् अकोल्यास भरविली. हैद्राबादच्या भवितव्यतबद्दल आम्हाला त्यांच्याइतकाच जिव्हाळा वाटत आहे; हें वऱ्हाडांतील जनतेनें विसरूं नये. आम्ही सर्व एका झेंड्याखालीं असतांना त्यांच्या आमच्यामध्यें असलेली एकी ही याचें निदर्शक आहे. निजामसाहेब संस्थानी सिव्हिल सर्व्हिसमध्यें वऱ्हाडांतील लोक घेतात यावरून हीच गोष्ट सिद्ध होत नाहीं का ? आज वऱ्हाड ब्रिटिशांच्या अंमलाखालीं असलेला जो दिसत आहे, तो सक्तीनें ठेवण्यांत आला आहे हें निजाम व निरनिराळ्या व्हाईसरॉयांच्यामध्यें झालेल्या पत्रव्यवहारावरून कोणासहि सहज दिसून येणार आहे. कायद्याच्या भरभक्कम पायावर ब्रिटिश सरकारला हा प्रदेश आपल्या हाताखालीं ठेवितां येत नाहीं; तर त्यानें तो बळकाविलेला आहे.

स्थानिक स्वराज्याची थट्टा.

संस्थानांतील 'स्थानिक स्वराज्य' हें केवळ नाममात्र असून जनतेला निवडणुकीच्या बाबतींत अधिकार नसून त्यांच्या अर्ज-विनंत्यांना बेधडक धुडकावून लाव-

ण्यांत येतें. राजकारणाचा प्रश्न हा मुख्यत्वें जनतेचा असून, प्रजेला आपलें मत प्रदर्शित करण्याचा पूर्ण अधिकार आहे. सध्याचें कौन्सिल म्हणून जें कांहीं आहे, तें प्रातिनिधिक असावयास पाहिजे; पण तसें तें नसल्याकारणानें तें लोकमतनिदर्शक आहे अशी कोणीहि बावळी कल्पना करून घेऊं नये.

जनतेच्या मागण्या.

भावी संघटनेची योजना अजून निश्चित झालेली नसल्यानें तिच्याबद्दल बरेंवाईट मत प्रदर्शित करणें अस्थानीं होणार आहे, असें सांगून मि. तिरमिझी पुढें म्हणाले कीं, आम्हांला आज अगोदर भाषणस्वातंत्र्य व वृत्तपत्रस्वातंत्र्य पाहिजे आहे. लोकप्रतिनिधिस्वातंत्री " स्थानिकस्वराज्य " तावडतोब स्थापावयास पाहिजे असून कायदेमंडळ लोकमताला जबाबदार असणें जरूर आहे. कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष लोकांच्या मधून निवडलेले असावेत.

निजामसाहेबांना प्रजेच्या आकांक्षांबद्दल अत्यंत सहानुभूति वाटत असून ते फार सुविद्य आहेत. त्यांना प्रजेच्या उन्नतीची अगदीं तळमळ लागून राहिली आहे असें सांगून स्वागताध्यक्षांनीं आपलें भाषण संपविलें.

अध्यक्षांचें भाषण.

बॅ. रामचंद्रराव नाईक एम्. ए. यांची अध्यक्षस्थानीं रीतसर निवड झाल्यावर त्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें व आपल्या भाषणास सुरवात केली. अध्यक्षपदाचा मान दिल्याबद्दल आभारप्रदर्शन करून व आपलें भाषण तयार करावयास भरपूर वेळ न मिळाल्यामुळें प्रसंगाला साजेसें होणार नाहीं व जर कांहीं चुका झाल्या तर त्याबद्दल सगळ्यांनीं क्षमा करावी अशी श्रोतृवर्गाला विनंति करून पुढें ते म्हणाले कीं, हैद्राबादचें भवितव्य उज्ज्वल कसें होईल याबद्दल चर्चा व उपाययोजना करण्यासाठीं ही जी संस्थानच्या प्रजाजनांची परिषद् भरली आहे, तिला हैद्राबादच्या इतिहासांत फार मोठें स्थान मिळणार आहे; परंतु अशा या चांगल्या कार्यासाठीं सुद्धां आम्हांला दुसऱ्यांच्या हद्दींत यावें लागावें यापेक्षां दुर्दैव दुसरें कोणतें असणार ! पण आम्ही कांहीं अगदींच परकीय ठिकाणीं आलों आहों असें नाहीं; केवळ कायदेशीर बोलावयाचें झाल्यास आम्ही आमच्या संस्थानची सरहद्द ओलांडली नाहीं, एवढीच काय ती समाधानास जागा आहे.

अकोल्याची मदत.

एका काळीं अकोला हें हैद्राबादेंत मोडत होतें; पण भविष्यकाळाच्या पोटांत काय आहे तें कोण सांगणार ! आम्ही परत एकाच्या अंमलाखालीं रहाणार अगर नाहीं हें आज सांगणें जरी शक्य नसलें तरी एक गोष्ट निश्चित आहे कीं, हैद्राबादच्या राजकीय उन्नतीच्या मार्गांत आज अकोलेकर मंडळींनीं आम्हांला जी अगदीं वेळेला मदत केली आहे तिचा आम्हांस विसर पडणार नाहीं.

लाजिरवाणी गोष्ट.

एकाद्या संस्थानच्या अगर राष्ट्राच्या प्रजाजनांना दुसरीकडे जाऊन आपल्या गाऱ्हाण्यांची व आपल्या हक्कांची मागणी करण्याची पाळी यावी ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे; आणि त्यांतल्या त्यांत हैद्राबादी लोकांसारख्या राजनिष्ठ, शांतताप्रिय लोकांवर हा प्रसंग यावा हें फारच लाजिरवाणें आहे.

धोक्याची सूचना.

यामुळें संस्थानी राजयंत्रांत कांहीं तरी बिघाड झाला आहे आणि त्याचा जर वेळींच बंदोबस्त करण्यांत आला नाहीं तर भयंकर परिस्थिति उत्पन्न होऊन दरबार व प्रजा यांचे संबंध दुरावण्याचा मात्र संबंध आहे व याचे परिणाम संस्थानला हितावह होणार नाहींत असें वाटावयास लागतें. या बाबतींत योग्य खबरदारी जर घेण्यांत आली नाहीं तर, कांहीं लोकांचा कल कायदेभंग करण्याकडे वळण्याचा संभव आहे; परंतु येथील जनता त्या मनोवृत्तीची नाहीं.

परिषदेबद्दल वृथा गैरसमज.

या परिषदेच्या उद्दिष्टाबद्दल बराच गैरसमज पसरविण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला तरी सुद्धां, या परिषदेस इतके लोक जमावे ही कांहीं कमी अभिमानाची गोष्ट नव्हे ! ! ही परिषद् यशस्वी रितीनें पार पाडून दरबारच्या मनांत आपणांबद्दल जें कांहीं किल्मिष असेल तें नाहींसें करून टाकूं अशी मला उमेद आहे व पुढील वर्षी परिषदेसाठीं आपणांला असें बाहेर पडावयास न लागतां संस्थानांतच पूर्ण भाषण व लेखन स्वातंत्र्य उपभोगावयास मिळेल अशी मी आशा बाळगतों.

सभाबंदीचा जाहीरनामा.

भाषणस्वातंत्र्य व संस्था स्थापण्याची मुभा हे लोकांचे जन्मजात हक्क आहेत. सभा भरविण्याची परवानगी पोलिस कमिशनरकडे अगर डिस्ट्रिक्ट कलेक्टरकडे मागण्याबाबत जी पोलिस गस्ती (सर्क्युलर) आहे, त्यानें लोकांच्या मनांत असंतोषाचें बीज रुजलें गेलें आहे. हैद्राबादची प्रजा कायद्याची दास असल्यामुळें या गस्तीचें आम्हांला विशेष वाटतें. संस्थानांत व सालसांत जेव्हां चळवळ झाली तेव्हां हैद्राबाद संस्थान अगदीं शांत होतें; भाषणस्वातंत्र्य असतांना लोकांनीं असें काय केलें आहे कीं, ज्यामुळें दरबारला हा सभाबंदीचा हुकूम काढण्याची पाळी यावी ! माजी निजामांनीं मिंटो सर्क्युलरला उत्तर देतांना सांगितलें होतें कीं, आमच्या संस्थानांतील रयत समाधानी, शांतताप्रिय व कायद्यास मान देणारी अशी आहे. मेसर्स हंकिन, डन्लाप व सर जॉर्ज वॉकर यांनीं संस्थानाची जी सेवा केली, ती सेवा अजून लोक विसरले नाहींत.

खोट्या इज्जतीस बळी.

संस्थानच्या प्रजेंत निजामांच्याबद्दल भक्ति वसत असल्याची कबुली सुद्धां निजामांनींच जाहीररीत्या दिली आहे, मग अशा स्थितींत पोलिस गस्तीची काय

आवश्यकता आहे, हेंच आम्हांस कळत नाहीं. प्रत्येक वेळीं या गस्तीचा लोकांनीं निषेध केला आहे पण दरबारला अजून लोकमताची कद्र वाटत नाहीं. सभा, परवानगीचा हा जाहीरनामा जर मागें घेतला तर आपली नाचक्की होईल अशी कदाचित् दरबारला भीति वाटत असेल; पण खरोखर स्थिति अगदीं मात्र याच्या-विरुद्ध आहे. हा जाहीरनामा माघारी घेतल्यास लोकांच्यावरील असलेल्या त्यांच्या प्रेमाची कसोटीच लागणार आहे. दरबारनें हा जाहीरनामा परत घ्यावा अशी माझी दरबारास विनंति आहे. परंतु दरबार सदासर्वदा लोकमतास धाब्यावर बसवूं लागलें तर त्याची प्रतिक्रिया होणें साहजिक असून दरबारबद्दल जनतेला काडीमात्रहि आदर वाटणार नाहीं, हें दरबारनें पक्कें लक्षांत ठेवावें. हैद्राबादबद्दल आत्मीयता वाटत अस-ल्यामुळें व हैद्राबादला योग्य दर्जा लाभावा अशी अंतःकरणांत प्रेरणा झाल्यामुळें ही परिषद् आम्हीं आज भरविली आहे.

संस्थानावर निसर्गाची कृपा.

हैद्राबाद हें ग्रेट ब्रिटनपेक्षां मोठें संस्थान असून त्याची लोकसंख्या सव्वा कोट आहे. गोदावरी, कृष्णा, भीमा व तुंगभद्रा या मोठमोठ्या नद्या संस्थानांतून वहात अस-ल्यामुळें जमीन सुपीक आहे. हवा समशीतोष्ण असून येथें दाट जंगल आहे. लोखंड, तांबें, दगडी कोळसा व इतर खनिज पदार्थ विपूल प्रमाणांत येथें सांपडतात. हैद्राबादची ऐतिहासिक परंपरा अभिमान वाटण्याजोगी असून बेदर, औरंगाबाद, वरंगलासारखीं इतिहासप्रसिद्ध स्थळें संस्थानांत आहेत. लहान मोठीं सरोवरें, मोठमोठीं देवळें व मशिदी, जगप्रसिद्ध एलोरा व अंजिठ्याचीं कोरीव लेणीं यांनीं हें संस्थान आलंकृत झालेलें आहे. गोवळकोंडा हिऱ्याबद्दल एकदां प्रसिद्ध होतें; कोहिनूर हिरा आज बादशहांच्या मुकुटास शोभा देत आहे. निसर्गाची या भूप्रदेशावर कृपा आहे, एवढेंच नव्हे तर रामदास, एकनाथ, ज्ञानेश्वर, गुरु गोविंदसिंग यांसारख्या साधुसंतांचें व महमंद हुसेन सारख्या मौलवींचें हैद्राबाद संस्थान हें जन्मस्थान आहे. पुरातन काळांतील आकण्णा मादण्णा व आधुनिक काळांतील राजा चंदुलाल व सर सालर जंग यांसारखे महा मुत्सद्दी येथें होऊन गेले. केवळ ऐतिहासिक गोष्टींचा अभिमान धरून चालणार नाहीं. तर पुढील भवितव्य कसें काय होणार याचाहि आपण विचार केला पाहिजे.

देशाच्या प्रगतीची खूण.

१ शिक्षण, २ उद्योगधंदे, ३ धार्मिक सहिष्णुता, ४ राजकारभारांत लोकमताचें प्राबल्य, ५ न्यायदान व ६ लोकांची संस्कृति. या सहा गोष्टींमुळें कोणत्याही देशाच्या उन्नतीचें मोजमाप ठरविण्यांत येत व असतें. हें मोजमाप हैद्राबाद संस्थानास लावणें अस्थानीं होणार नाहीं.

शिक्षणाचा बोजवारा.

दरबार शिक्षणखात्यावर ७८३ लाख रुपये खर्च करीत असून साक्षरता फक्त साडे तीन टक्के आहे. या रकमेपैकीं बराचसा पैसा शिक्षणाचें माध्यम जें उर्दू ठेवण्यांत आलें आहे, त्याच्या प्रयोगामध्यें रक्कम खर्च होत आहे. आणि मौज अशी कीं, संस्थानच्या बहुसंख्याक प्रजेची मातृभाषा उर्दू नाहीं. अधिकाऱ्यांचे लठ्ठ लठ्ठ पगार, पुस्तकांचें भाषांतर, इमारतींचें भाडें यासाठीं निरर्थक पैसा खर्च होत आहे. लठ्ठ पगाराचे अधिकारी तरी संस्थानांतील असतात का? तिकडूनही नन्नाचा पाढा! या शिक्षणखात्याचा रयतेशीं अजिबात संबंध नसावा ही सर्वांत आश्चर्याची गोष्ट आहे. शिक्षणासाठीं शिष्यवृत्त्या म्हणून ज्या देण्यांत येतात त्या अशाच फुकटच्याफाकट! श्रीमंत बापाच्या पोरांना शिष्यवृत्त्या काय द्यावयाच्या असतात? परंतु येथील प्रकार सर्वच निराळा! प्राथमिक शिक्षणाची दैना तर बोलावयासच नको. २००० ते ३००० वस्तीच्या ११ खेड्यांत, १००० ते २००० वस्तीच्या ११५ खेड्यांत, ५०० ते १००० वस्तीच्या २९८८ खेड्यांत मुळींच शाळा नाहीं. ५०० वस्तीखालील किती खेड्यांतून शाळा नाहींत, याचा तर मुळींच विचार करावयास नको आहे.

खाजगी शाळांवर नियंत्रण.

खाजगी शाळा काढण्याबाबत दरबारनें जें नियंत्रण घातलें आहे. त्यामुळें शिक्षणाच्या प्रगतीस फारच अडथळा होत आहे. इतर राष्ट्रांकडे दृष्टि जर फेंकली तर असें दिसून येतें कीं, तेथें खासगी प्रयत्नास शक्य तितकें उत्तेजन देण्यांत येतें; परंतु आमच्या मोंगलाईतील पद्धत और आहे. खासगी शाळांची वाढ करण्याच्या प्रयत्नास मदत तर होत नाहींच. उलट खाजगी शाळांवर नियंत्रण ठेवल्यानें त्यांची संख्या मात्र बरीच कमी झाली आहे. लोकांना आपल्या देशबांधवांची सेवा करण्याची संधिही त्यामुळें मिळेनाशी झाली आहे. उर्दू मातृभाषा नाहीं, अशा शें. ८५ टक्के मुलींच्या शिक्षणाची तजवीज मुळींच नाहीं. खुद्द राजधानीच्या गांवांत मुलींचीं तीन हायस्कुलें आहेत, पण तेथें बहुसंख्याक असलेल्या तेलगू, मराठी, कानडी जनतेस त्यांच्या या भाषा शिकविण्याची तरतूद नाहीं. तिन्हीं उर्दू हायस्कुलें आहेत.

शिक्षणखात्यावर भरमसाट खर्च होत आहे पण शिकलेल्यांची संख्या मात्र वाढली जात नाहीं! सक्तीच्या शिक्षणाचा कायदा पास करण्याची अत्यंत अवश्यकता आहे. टर्कीप्रमाणें बालकमंदिरें काढलीं जाऊन प्रत्येकाला ज्ञानामृत प्राशन करण्याची संधि खरोखर मिळावयास पाहिजे आहे.

पैसा भरपूर मिळेल!

प्राथमिक शिक्षण सक्तीचें केल्यास त्यासाठीं पैशाची कमतरता पडेल असें मात्र मुळींच नाहीं; फार झालें तर विशेष कर बसवावे लागतील. उस्मानिया युनिव्ह-

सिटीसाठीं टोलेजंग इमारती बांधण्यासाठीं जो पैसा शिलकी टाकण्यांत आला आहे, तो याकारणीं खर्च व्हावा.

शिक्षण कसें पाहिजे !

शिक्षणक्रमांत सुधारणा होण्याची अत्यंत आवश्यकता असून व्हॉइसरॉय यांनीं हैद्राबादला गेल्या प्रसंगीं भेट दिल्यावळीं तसा इषाराहि पण दरबारला दिला होता; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. जनतेला पसंत व मुलांना भावी आयुष्यांत उपयोगी पडेल अशा प्रकारचें शिक्षण देण्यांत यावयास पाहिजे आहे. शिक्षण हा राष्ट्रोन्नतीचा पाया असल्यानें शिक्षणखात्याकडे दरबारचें जास्त लक्ष असावयास पाहिजे. शिक्षणावर एका बोर्डाची देखरेख पाहिजे आहे, व या बोर्डाचे निम्मे सभासद तरी लोकांचे प्रतिनिधी असें असले पाहिजेत.

निरनिराळ्या रोगांच्या वार्षिक भेटी.

लोकांच्या आरोग्याकडे लक्ष देण्यांत येत नसून क्षयानें तर संस्थानांत ठाणें दिलें आहे. प्लेग, एन्फ्लुएंझा, या रोगांच्या वार्षिक भेटीचा लाभ संस्थानला होत असून मृत्युसंख्या वाढत्या प्रमाणावर आहे. दवाखान्यांची संख्या तुटपुंजी असून प्रसूतिगृहांची योग्य व्यवस्था नाहीं. डायरेक्टर ऑफ् फिजिकल कल्चर या बड्या अधिकाऱ्याची दृष्टि राजधानीच्या बाहेर जाऊंच शकत नाहीं. आरोग्यास विघातक अशी बाल-विवाहाची चाल कायद्यानें बंद व्हावयास पाहिजे आहे. सर्वत्र आखाडे व मुलांच्यासाठीं उद्यानें स्थापणें जरूर असून सरदारदरकदारांनीं या कार्यांत मन घालावयास हरकत नाहीं.

हैद्राबादला ' थर्ड क्लास.'

संस्थानच्या राज्यकारभारांत अंशभागी होण्याचा प्रजाजनांचा नैसर्गिक हक्क कोणीहि नाकबूल करूं शकणार नाहीं. सदर बाबतींत वेळींच योग्य फरक जर करण्यांत आला नाहीं, राज्यकारभारांतील भागीदारी प्रजेला मिळाली नाहीं तर कित्येक अशा अपरिहार्य गोष्टी घडून येतील कीं, त्यामुळें दरबार व प्रजा यांना कालिमा येईल. संस्थानच्या कारभारांत प्रजेचा हात किती आहे, हें संस्थानच्या प्रगतीचें गमक आहे. छोटीं छोटीं संस्थानें झपाट्यानें पुढें जात असून आपण जर आतां मागें पडलों, तर हैद्राबादला ' थर्ड क्लास ' तिसरा वर्ग मिळण्याचा संभव असून प्रजा व राज्यकर्ते यांच्यामध्यें प्रेमभाव रहाणार नाहीं.

बेगुमान कार्यकारी मंडळ.

लोकशाहीचा प्रवाह ओळखून निजामसाहेबांनीं १२ वर्षांपूर्वीं कार्यकारी मंडळाची स्थापना केली; पण हें कार्यकारी मंडळ लोकपक्षीय कायदेमंडळास जबाबदार नसून त्यांत लोकपक्षाचे प्रतिनिधी नाहींत. कार्यकारी मंडळाचा राज्यकारभार दिवसें-

दिवस जास्त जास्त वाईटच होत चालला आहे. कार्यकारी मंडळाला जास्त अधिकार निजामसाहेब देत आहेत. परंतु अधिकाऱ्यांना आपलें स्थान लोकमतावर अवलंबून आहे असें वाटलें पाहिजे व त्यासाठीं तशी परिस्थिति दरबारनें निर्माण केली पाहिजे. हैद्राबाद संस्थान सुधारणा संस्थेनें कायदेमंडळाची घटना कशी असावी व कार्यकारी मंडळ लोकमताला कसें जबाबदार राहील याची एक योजना तयार केली असून ती दरबारनें ' प्रथमारंभ ' म्हणून अंमलांत आणावी अशी आमची सूचना आहे.

संघटना.

संघटनेबद्दल (फेडरेशन) आज मत देणें हें अकालीं होणार आहे, तरी पण जर दुसऱ्या गोलमेज परिषदेंत संघटनेची योजना फलद्रूप झाली तर त्यांमध्यें संस्थानी प्रजेचे प्रतिनिधी असणें अत्यवशक आहे, एवढेंच मला सदर बाबतींत म्हणावयाचें आहे.

बड्या अधिकाऱ्यांची चंगळ.

सध्यांच्या काळांत कोणत्याही सरकारच्या आर्थिक पतीला फार महत्त्व आहे. हैद्राबादची आर्थिक परिस्थिति आज जरी उत्तम आहे, तरी ती अशीच टिकणें असंभवनीय आहे. राज्यकारभाराचा खर्च फाजील प्रमाणांत वाढूं लागला आहे.संस्थानांत लठ्ठ पगाराचे अधिकारी असून या मंदीच्या काळांतहि त्यांच्या पगारांत वाढ करण्यांत येत आहे. संस्थानाबाहेरील परकीय संस्था व व्यक्ती यांना देण्यांत हजारों रुपये खर्च होत आहेत; तर संस्थानांतील स्वार्थत्यागानें चालविणाऱ्या संस्था उपासमारीमुळें मरणाच्या पंथास लागल्या आहेत. संस्थानांत काटकसरीला पुष्कळ वाव आहे. आज तूर्ततूर्त म्हणून कायदेमंडळास अंदाजपत्रकाबाबत सूचना करण्याचा अधिकार देण्यांत यावा, अशी आमची सूचना आहे.

उद्योगधंद्यांची आबाळ.

संस्थानांत उद्योगधंदे मुळींच नाहींत. तरुण लोकांना धंद्यांपेक्षां नोकरीची लालसा फार आहे. धंदेवाल्यांना संस्थानांत योग्य मान मिळत नाहीं हें त्याचें कारण असावें असें मला वाटतें. रेसिडेन्सी हद्दींत उद्योगधंदे काढण्यास व्यापारी कंपन्या राजी असतात, पण संस्थानांत काढण्यास तयार होत नाहींत,हा विचाराचा प्रश्न आहे. नवीन नवीन उद्योगधंदे काढण्यास दरबारनें प्रोत्साहन दिलें पाहिजे, फार काय मदत सुद्धां केली पाहिजे. नाहीं तर, संस्थानांतील पैसा बाहेर पळ काढल्याशिवाय रहाणार नाहीं. हैद्राबादसारख्या संस्थानांत संस्थानची एकहि पेढी नसावी हें आश्चर्याचें नाहीं काय? म्हैसूर, त्रावणकोर, कोचीन वगैरे संस्थानांतून सरकारी पेढ्या आहेत. निजाम दरबारनें उद्योगधंद्यांच्या पेढ्या, शेतकीसाठीं पेढ्या काढण्याच्या योजनेबाबत एक चौकशी कमिटी नेमावी.

लष्कर व पोलिस.

राखीव सैन्यावर अवलंबून राहण्याचे हे दिवस राहिलेले नाहींत; नागरिक सैन्य, स्वयंसेवक दल यांना उत्तेजन देण्यांत आलें पाहिजे. यामुळें खर्चांत बरीच बचत होईल. पोलिस खात्यांत जे लोक घ्यावयाचे ते शिकलेले, चांगल्या वर्तणुकीचे, सर्व धर्मांचे, सर्व पंथाचे पण संस्थानांतील असे घेण्यांत यावेत.

शेतकी.

शेतकी खात्याची अत्यंत आबाळ होत असून खेड्यांच्या गरजांकडे मुळींच लक्ष देण्यांत येत नाहीं. खेड्यांतून पाण्याची ओरड फार आहे, शेतकऱ्यांचे अधिकार व हक्क काय आहेत, ते छापून दरबारनें शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे म्हणजे ते बेमुर्वतखोर वकील व निर्दय सावकार यांच्या कचाटींत सांपडणार नाहींत.

स्वदेशीचा प्रसार.

संस्थानचें उद्योगखातें थोडथोडें काम करीत आहे, पण जनतेच्या सहकार्या-शिवाय खरें काम होणार नाहीं. निरनिराळ्या लहानमोठ्या गांवांत पांगलेल्या कसबी लोकांना हुडकून काढून खेड्यांतील धंद्यांना सुरवात करण्यांत आली पाहिजे. मुलकी अधिकाऱ्यांची बढती, ते किती धंदे सुरू करतात यावर अवलंबून ठेवावी. मुलांच्या अभ्यासक्रमांत स्वदेशीचा (म्हणजे संस्थानी) वस्तूंचा अंतर्भाव करून स्वदेशीचें तत्त्व त्यांच्या मनावर बिंबविण्यांत यावें. दरबारनें संस्थानांतील वस्तूच घेतल्या पाहिजेत; वृत्तपत्रकारांनीं स्वदेशीच्या जाहिराती माफक दरानें द्याव्या. उद्योगखात्यावर देखरेख करण्यासाठीं एक मंडळ असावें व या मंडळांतील निम्मे सभासद तरी लोकप्रतिनिधी असावेत.

स्थानिक स्वराज्य संस्था.

स्थानिक स्वराज्याच्या संस्था पूर्णपणें लोकांच्याकडे सोंपवाव्या म्हणजे त्या त्या गांवाचा स्थानिक कारभार चांगला चालेल, रोगराई कमी होईल व त्यांना महत्वाच्या गोष्टी जबाबदारीनें अंगावर घेण्याचें शिक्षण मिळेल.

धर्मतत्त्वांचें नवें पुस्तक.

हिंदुस्थानांत क्षुल्लक कारणावरून सुद्धां जातीजातींत भयंकर तंटे उत्पन्न होतात व त्यामुळें आम्हां हिंदी लोकांना लाजेनें मान खालीं घालावी लागत आहे. तेव्हां कोणत्याही शाळेंत एका विशिष्ट धर्माची संथा न देतां सर्व धर्मांतील उत्तमोत्तम तत्त्वें एका पुस्तकांत समाविष्ट करून, तें धार्मिक पुस्तक म्हणून शाळांतून शिकविण्यांत यावें अशी माझी सूचना आहे माझी आणखी एक सूचना अशी आहे कीं, जाति-विषयक खेळांचे क्लब अगर चौरंगी सामने अजिबात बंद करण्यांत यावे. अशा

प्रकारची उपाय-योजना केली गेली तर निदान भावी पिढी तरी या जातिवैमनस्या-पासून अलिप्त राहील. परस्परांच्या धर्माबद्दल सहिष्णुता जर निरनिराळ्या धर्मीयांनीं दाखविली तर हा जातिविषयक प्रश्न सुलभ रीतीनें सुटणार आहे.

वर्तमानपत्रें काढण्यास बंदी.

वृत्तपत्रें हें शिक्षणाचें व अधिकाऱ्यांना दाबांत ठेवण्याचें एक मुख्य साधन आहे. आपल्या संस्थानांत १० उर्दू, ३ मराठी व २ तेलगू अशीं १५ वृत्तपत्रें आहेत. कानडी व हिंदी पत्रें काढण्यासाठीं दरबारकडे परवानगी मागण्यांत आली होती, पण ती नाकारण्यांत आली. लोकजागृति करण्याची प्रभावशाली शक्ति वर्तमानपत्रांतून असून लोकांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याचें तें मुख्य साधन आहे. हैद्राबाद दर-बारला कांहीं पत्रें आवडतात व त्यांना दरबारकडून मलिदा मिळतो; दरबारनें सर-सकट सर्वांना मदत तरी एक करावी, नाहीं तर कोणालाच मदत करूं नये. वृत्त-पत्रांच्यावर केव्हां गदा येईल याचा मुळींच नेम नसल्यामुळें प्रजेंत असंतोष मात्र वाढत जातो आहे.

व्यसनी प्रजा हें राजाला भूषण नव्हे.

अबकारीपासून १७५ लाख रुपये व जकातीपासून १५७ लाख रुपये संस्था-नला उत्पन्न होत आहे. अबकारीचें इतकें अवाढव्य उत्पन्न येत आहे ही कांहीं दरबारला भूषणास्पद गोष्ट नाहीं ! ! संस्थानांत व्यसनासक्त किती आहेत याचें मात्र हें उत्पन्न निदर्शक आहे. संस्थानांतील उद्योगधंद्यांवर जकात शक्य तों ठेवण्यांत येऊं नये; संरक्षक जकात मात्र असावी.

न्यायदानांतील एक ढोबळ दोष.

न्यायदानाचा कारभार हें राज्यकारभाराच्या कसोटीचें एकमेव लक्षण आहे. न्यायाधीश लांच खाणारे असतां कामा नयेत, एवढेंच नव्हे तर त्यांनीं कोणाच्या भीडभिकेला अगर वजनाला बळी पडतां कामा नये. अधिकाऱ्यांच्या मर्जीवर न्यायाधिशाचें अस्तित्व अवलंबून नसणें हाच त्यास एक तोडगा आहे. न्यायखात्यां-तील अंमलदारांना स्थानिक भाषांचें ज्ञान चांगलें असलें पाहिजे. नाहीं तर होतें काय, खटले वर्षानुवर्ष पडून राहतात. अलीकडे न्यायदानांत जरा कुठें हालचाल झाल्यासारखी दिसत आहे. पण एक गोष्ट दरबारच्या नजरेस आणणें जरूर आहे असें मला वाटतें. ज्युडिशिअल कमिटी हें संस्थानांतील वरिष्ठ कोर्ट असून हायकोर्टावरील अपिलें या कमिटीकडे जातात. आणि हायकोर्टाचे न्यायाधीश या ज्युडिशिअल कमिटीवर न्याया-धीश म्हणून बसतात. त्यामुळें पुष्कळ वेळा होतें काय कीं हायकोर्टातील तीन पोक्त व अनुभविक न्यायाधिशांचे निवाडे तरुण व अननुभवि अशा त्याच हायकोर्टातील तीन न्यायाधिशांकडून त्यांचें स्थान बदलल्याबरोबर बदलले जातात. ज्युडिशिअल कमिटीचे

अध्यक्ष व दरबारचे कायद्याचे सल्लागार हे एकच असणें केव्हांही इष्ट नाहीं. एकच मनुष्य सल्लागार व न्याय देणारा होऊं शकत नाहीं. ज्यूडिशिअल कमिटीचे न्यायाधीश हे स्वतंत्र असणें अवश्य आहे. (देणग्या) अलियात कायदा बदलून घेण्याची फार अवश्यकता आहे.

जहागिरदारांना उपदेश.

संस्थानांत २००० लहान मोठे जहागिरदार असून त्यांच्या जहागिरींनीं एकतृतीयांश भूप्रदेश व्यापलेला आहे. कांहीं जहागिरदार तर उत्पन्नानें इतर कांहीं संस्थानिकांचे तोडीचे आहेत. या जहागिरदारांच्या पूर्वजांनीं मनगटाच्या जोरावर जहागिरी कमाविल्या पण हे कांहीं आतां लढाई खेळण्याचे दिवस नाहींत; तेव्हां जहागिरदारांनीं परदेशीं जाऊन विद्यार्जन करावें व संशोधन वगैरे करून संस्थानच्या लौकिकांत भर टाकावी; कारण त्यांना आतां हा एवढाच मार्ग उरला आहे. कारण त्यांना संस्थानांतील उच्च पदाच्या नोकऱ्या मिळत नसून त्या परस्थांना देण्यांत येत आहेत.

निजामसाहेबांना विज्ञप्ति.

संस्थानच्या अभिवृद्धीसाठीं आपण झटलें पाहिजे. प्रजची सेवा जो करतो तोच खरा उत्तम अधिकारी हें अधिकाऱ्यांनीं लक्ष्यांत ठेवावें. प्रजेचा संतोष हाच संस्थानच्या प्रगतिचा पाया होय, हेंहि अधिकाऱ्यानीं लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. निजामसाहेबांनीं जबाबदार राज्यपद्धतीस सुरवात म्हणून, प्रथम आधुनिक असें एक कायदेमंडळ स्थापावें अशी निजामसाहेबांना आपल्या भाषणाच्या शेवटीं विनंति करून अध्यक्षांनीं आपलें भाषण संपविलें.

मंजूर झालेले महत्त्वाचे ठराव.

परिषदेंत पास झालेले महत्त्वाचे ठराव पुढें देण्यांत आले आहेतः--

(१) जबाबदार राजपद्धति संस्थानांत सुरू करण्याची निझाम सरकारनें घोषणा करावी, (२) सध्यांच्या कायदे कौन्सिलांतील स्थितिबद्दल खेदप्रदर्शन व ब्रिटिश हिंदुस्थानांतील कायदे कौन्सिलच्या धर्तीवर येथील कौन्सिलचीहि रचना करावी. (३) भाषण, लेखन व मुद्रण वगैरे जे प्रजेचे नैसर्गिक हक्क आहेत, ते ह्या संस्थानांतील प्रजेसहि दिले जावे. (४) (अ) गस्ती निशान ५३ सन १३३५ फसलीचें सरकारी सर्क्यूलर रद्द करावें. (ब) राजकीय सभा भरविण्यास सध्यां परवानगी मागावी लागते, ही अडचण दूर करण्यांत यावी. (५) छापखाने व वर्तमानपत्रें वगैरेंवरचीं सध्यांचीं बंधनें दूर करावीं. (६) गोलमेज परिषदेमध्यें प्रजेचेहि प्रतिनिधी पाठविले जावे, अशी निझाम सरकारास विनंति आहे. (७) हैद्राबाद म्यु. ची रचना मुंबई किंवा कलकत्ता म्यु. च्या धर्तीवर केली जावी व लोकप्रतिनिधींच्या

ताब्यांत या संस्थेचा पूर्ण कारभार असावा. त्याचप्रमाणें लोकल फंड, डिस्ट्रिक्ट बोर्ड्स वगैरे संस्थाहि लोकांच्या ताब्यांत दिल्या जाव्यात. (८) सध्यांची आर्थिक हलाखीची स्थिति लक्षांत घेऊन शेतसारा निम्यानें कमी करावा. (९) प्राथमिक शिक्षण मातृभाषेंतून असावें व तें सक्तीचें व मोफत करावें. (१०) सुधारणांमुळें बजेटांत जर कांहीं तूट येईल तर लोकप्रतिनिधींच्या सल्ल्यानें कायदेमंडळानें अधिकाऱ्यांचे पगारांत काटकसर करून व जरूर पडल्यास उत्पन्नावर कर ठेवून ही तूट भरून काढावी. (११) शैक्षणिक खात्यांत व पद्धतींत कोणत्या सुधारणा कराव्यात याबद्दल सरकारी व बिनसरकारी मंडळानें चौकशी करून कांहीं तजवीज करावी. (१२) मजुरांच्या बाबतींत व्हिटले कमिशननें सुचविलेल्या सुधारणा संस्थानांत अंमलांत आणल्या जाव्या. (१३) सरकारी नोकऱ्या मुलकी लोकांनाच शक्यतोंपर्यंत द्याव्या व तज्ज्ञमंडळींची जरूरी पडल्यास ते बाहेरून मागवावे. (१४) जातीजातींतील भांडणांचा तीव्र निषेध व शक्यतोंपर्यंत परस्परांनीं राष्ट्रीय वृत्तीनें परस्परांशीं वागावें अशी सर्व लोकांना विनंति आहे. (१५) खाजगी शाळा काढण्याबद्दल जीं बंधनें घालण्यांत आलीं आहेत, तीं अनिष्ट असून सरकारनें हीं बंधनें काढावीं. (१६) ग्रामपंचायतींची स्थापना खेडोपाडीं सुद्धां व्हावी. (१७) बाहेरील वर्तमानपत्रांना संस्थानांत येण्यास जी बंदी करण्यांत आली आहे ती दूर करण्यांत यावी. (१८) देशी मालालाच लोकांनीं उत्तेजन द्यावें व सरकारनेंही याच धोरणाचा अवलंब करावा, अशी कळकळीची विनंति आहे.

हैद्राबाद संस्थानचा जमाखर्च

इ. स. १९२० मु. सन १३२८ फसली.

जमा

रेव्हिन्यू

जमीन महसूल } फॉरेस्ट रेव्हिन्यू }	३४१९४२६० ८००८७८
फॉरेस्ट	१२८४३२९
कस्टम	१५७१३०८२
आबकारी	१६३७६१९६
अफू व गांजा	१५२८२६५
स्टँप	२२०७६९९
रजिस्ट्रेशन	३६०९२२
खाणी	१९४१८०
वऱ्हाडचा मोबदला	२९१६६६७
व्याज	५२३६७११
मिंट	१३३१४३
करन्सी	१४५४४८६
हुंडणावळ	२८१९३१
पोस्ट	९५७६८६
इरिगेशन	२९८८५
रेल्वे	४७५७४४५
इंप्रुव्हमेंट व रिझर्वफंड	५००६२३२
इतर	३०४४२५
एकूण जमा	**८९२४३१६७**

खर्च

रेव्हिन्यू	७८८८६४८
इरिगेशन	९८५७१४
फॉरेस्ट	८९९३८३
कस्टम	१७१९१७७
आबकारी	२४८९७८१
अफू व गांजा	१०४४८५
स्टँप	१०१७०७
रजिस्ट्रेशन	१२५४०३

खाणी	६२४२१
व्याज	२१९३७१०
सिंकिंगफंड	१००००००
मिंट	१०८०७३९
करन्सी	१८८९६
हुंडणावळ	४५०६२
पोष्ट	१२१८६५२
निझामसाहेबांचे खाजगी खर्चाकरितां वार्षिक दिले जातात ...	५० लाख
राज्यव्यवस्था	३६७३७९७
पोलिटिकल खर्च	५५६२१७
विमा	५८०५९
मनसब	१५४३६१६
फौज	६४८८९४३
न्याय	१९०४३८७
जेल	३७५४४०
पोलीस	५८९८३६१
एज्युकेशन	७१७७११२
दवाखाना	१८८०८५६
धर्मसंबंधीं	१२६८४४९
कृषीकर्म	४४९४८५
व्हेटरनरी	३०४०८०
को-ऑपरेटिव्ह	५६२३२
लहान ऑफिसेस	३६४८४
म्युनिसिपालिटी व इंप्रुव्हमेंट	१ करोड १० लाख
इमारती व रस्ते	१५६७०
इरिगेशन	२०५३६३०
रेल्वे	१७००८२
इलेक्ट्रिकसिटी	११४५०
प्रेस	९६१८६
इंडस्ट्री	२१७२११
इंप्रुव्हमेंट व इतर }	१४९३४३९
एकूण खर्च	**७६३८९६५७**

हैद्राबाद संस्थानांतील
हिंदूंची दुर्दशा

निझाम सरकारच्या प्रचलित राजपद्धतीखालीं असलेल्या **सव्वा कोट** हिंदू प्रजेची राजकीय, धार्मिक, शिक्षणविषयक परिस्थिति कशी अनुकंपनीय आहे हें समजून घेण्याची आपली इच्छा असल्यास "**हैद्राबाद संस्थानांत हिंदूंची दुर्दशा**" हें पुस्तक अवश्य वाचा, व विचार करा. पुस्तकाची किंमत चार आणे. ट. खर्च निराळा. याच पुस्तकाचें हिंदी भाषेंत भाषांतर किं. चार आणे. शिवाय खालील पुस्तकें आमचेकडे मिळतील.

१ "हैदाबाद व देशी संस्थानें" पृष्ठें ७५०, मूळ किंमत ३ रु., सवलतीची किंमत १ रुपया.

२ "**देशी संस्थानें**" अर्थात् हिंदुस्तानांतील देशी संस्थानांची सविस्तर यादी; किंमत दोन आणे.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण.

दि इंटरनॅशनल बुक सर्व्हिस,
बुकसेलर्स, पब्लिशर्स, न्यूज एजंट्स,
डेक्कन जिमखाना, पुणें नं. ४
Poona 4.

पुणें पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।२ येथें **आर्यभूषण** छापखान्यांत रा. **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं छापिलें व श्रीयुत **गो. ह. कुळकर्णी** यांनीं पुणें पेठ भांबुर्डा घ. नं. ७६१ बी येथें प्रसिद्ध केलें.

MISRULE OF THE NIZAM

(Being extracts from and translations of articles regarding the administration of Mir Osman Ali Khan Bahadur, the Nizam of Hyderabad (Deccan)

Edited and Published

by

D. RAGHAVENDRA RAO.

1926

MISRULE OF THE PRESENT NIZAM

Ed. & Published by D. Raghavendra Rao

STRANGE STORY OF INDIAN PREMIER'S WIDOW

A strange story of the imprisonment of the widow of a Native Indian Prime Minister is told in an Indian letter received by the Daily Herald from "a Lover of Justice" and we give it as written.

"I beg to draw your attention to the sad case of a lady in which the honour of Great Britain is at stake. Lady Vicar-ul-Umra is the widow of Sir Vikarul-Umra who was at one time the Prime Minister to the Nizam of Hyderabad. He was a true friend of the Empire and was highly esteemed by the Royal family of England as well as by the British officials and a succession of Viceroys.

"Since the accession to the throne of the present Nizam, this lady, heir to the great wealth of Sir Vicar-ul-Umra and a member of the Royal family of Hyderabad, has been kept in virtual internment in her own palace by the order of His Exalted Highness the Nizam, for fear she may leave his territory and take away her extensive wealth with her. Her trusty servants are dismissed and her relatives, even her grandsons are not allowed to visit her. Inside her palace she is surrounded by a host of spies and eaves-droppers and outside it by cordons of Police.

"In these days of plague for instance, when one requires plenty of fresh air, she is not even allowed to go out for a drive. This close confinement is telling on her health, and unless the British public, with its wonted

chivalry and love of justice, immediately comes to her rescue, I fear her feeble body will succumb to the continuous tyranny of which she is the victim. This lady wants to place herself under the protection of Great Britain: Will any kind hearted member of Parliament ask Mr. Montagu to enquire into her case before it is too late? Her daughter who lives with her is sharing the same fate. Her husband who is a British subject is not allowed to enter the Nizam's territory, nor she to go to him. Some English ladies who called upon her were turned away after being handled most indecently by the Nizam's police. People are asking how England, the champion of small nations can allow these atrocities in a native state subject to her supremacy in India?".

"Daily Herald", Tuesday 9th March, 1920.

NOBLE'S VAST POSSESSIONS SEIZED.

The case of the lady Vicar-ul-Umra who as related in the "Daily Herald" is virtually a prisoners in her palace, by the Nizam's order, is not by any means an isolated instance of the tyranny of the Nizam's regime (writes an Indian Correspondent).

This ruler takes much interest in the affairs of those of his subjects and nobles who are reputed to be wealthy. Nor is it merely a passive interest as some of them have found to their cost.

The most glaring instance is that of Nawab Moinuddin Khan, first cousin of the Nizam and the only son of the late Sir Asmanjah, a premier of the State. This young man is the richest noble of the State, whose landed property alone brings him a rental of £300,000 a year. This huge income does not comprise the whole of his wealth, for he is also the fortunate, or as it turned out to be, the

unfortunate possessor of a fine collection of jewels, the value of which ran into millions.

It was this young nobleman, who first excited the interest of the Nizam. All of a sudden his huge estate was placed under the Controller who could be relied upon to fulfil the duties of his office for the benefit of the Nizam. his palace was taken away, and the young man along with his mother, Lady Asmanjah, sent to an old palace where they have since been surrounded by a horde of detectives and where every restriction has been placed on their liberty.

Income of £300,000 once the palace of Bashir Bagh is now in the Nizam's possession. Its treasures were ruthlessly auctioned for nominal prices, the Nizam being the chief buyer, for none dared to outbid him. The young noble's palaces, motors and everything that belonged to him are either in the Nizam's actual possession or under his supervision.

These events took place nearly seven years ago and the young noble's plight has since become worse. His place of abode is infested by spies in the Nizam's pay. If he wants to take a drive in his own motor car he has to take the Controller's permission, who is himself under the thumb of the Nizam. Out of his income of £300,000 the young man is only allowed £3,000 a year the rest is in the charge of the Controller.

There are many such instances in Hyderabad, but what does the Nizam care as long as he is on the soft side of Resident appointed by the Crown? The Resident shuts his eyes to these little "eccentricities" of the Nizam and gets him to subscribe thousands of pounds to a War loan or make a gift of one lakh of pounds to combat the submarine meance or force him to employ an Englishman as his Finance Minister.

"Daily Herald", Monday 15th March 1920.

SYSTEM OF GOVERNANCE.

By St. Nihal Singh

Before going to the Nizam's dominions in the course of my recent tour in India, I had the pleasure of seeing a good deal of Sir Ali Inam, who had been in London for several weeks some time before my departure on that tour and had learnt how the fabric of governance had been modernised by His Exalted Highness the Nizam by the creation of an Executive Council. A copy of the Firman bound in pale yellow silk which he kindly gave me at the time, seemed to confirm the impression that great changes had been wrought in the form of administration in Hyderabad. At the end of the rescript there were a series of schedules which clearly defined the subjects with which the President of the Council was fully competent to deal, others which he, in conjunction with his colleagues of the Council, could dispose of, and finally those which His Exalted Highness had 'reserved' and which could be dealt with only under his personal order.

I therefore went to the Nizam's capital filled with high hopes. If I did not actually expect to find that autocracy had been supplanted by constitutional rule, the least I expected to find was that the purely personal type of administration had been tempered by the Council form of Government.

Before I explain how actual experience dispelled that expectation, I had better describe the opportunities I had for gaining that experience. I went to the Nizam's capital on the eve of His Royal Highness the Prince of Wales's visit, and remained there about a week. Since that stay was manifestly too short for purposes of study,

and since the capital was in a state of unusual excitement owing to the presence of the King Emperor to be, I determined to revisit the place as soon as I possibly could manage. Some two or three months later I returned to Hyderabad for that purpose.

In the ordinary course of events I should have stayed there a month or so at the utmost, and after familiarising myself with conditions, gone away. It so happened, however, that His Exalted Highness's Government commissioned me to prepare a book, materials for which it undertook to supply.

I welcomed that professional work because, it offered me the opportunity of making a much closer study into the methods of administration in Hyderabad than I should have been able to make had I been there for a short time, and had not enjoyed special facilities. My work brought me into intimate contact with the heads of the various departments and with their secretaries and principal subordinates. It also enabled me to tour through a considerable portion of the Nizam's Dominions and visit places of archaeological and historical interest and centres of agriculture and industry. Since much of this touring was done by motor I had the chance to see something of the countryside, and of the people who created the wealth without which the Nizam, his Nawabs and officials could not have existed for a single day.

HOW THE COUNCIL WORKS.

During the early period of my stay in Hyderabad, I found much to confirm the impressions which I had gathered from the Firman bound in pale yellow silk, and my conversations with Sir Ali Imam. The Executive Council of His Exalted Highness the Nizam met regularly every week and was attended by the heads of the various administrative departments. It had not only its regular sessions but also had extraordinary sittings as the work proved heavy.

or was of an urgent nature, and therefore, could not wait, or for both reasons. The meetings occupied a considerable time, often the whole morning, and not unfrequently delayed the members' luncheons. The house placed at my disposal was within a stone's throw of the building in which the council met. The noise of the coming and going of motor cars, many of which the benign Government provided, in one way or another to the members, told me of what was going on. Sometimes this or that councillor or his secretary, would come in to see me on his way to or from the council, and that also would tell its own tale as to the meeting.

I must explain that the secretaries could be present when a case relating to their respective departments was under discussion. They could assist their members and from what I heard some of the members could hardly have done without such assistance. If the Council chose to ask them, they might even speak. None of them could, however, vote that being the exclusive privilege of the members of the Government.

The Council sat behind closed doors, and what happened within the chambers was supposed to be an inviolable secret. Human nature is so constituted, however, that it abhors a secret as nature in general abhors a vacuum. That seemed to me to be particularly the case with human nature in Hyderabad. What happened this morning behind the closed doors in the Council chambers in Begumpet would be common gossip around the Char Minar the next morning or may be much sooner. From what transpired later, the details as retailed there would be found to be somewhat out of focus, distorted here and there, and usually very much magnified but with all this high colouring the gossip-'Char Minar gup'' they called it in Hyderabad—seldom missed the centre of gravity.

Just how it happened I never was able to discover. The favourite explanation was that everybody there had

his own set of spies, to spy upon everybody else. How far that was true, I am unable to say. I know this much, however, that that was the general belief, and more than once a high official, when talking to me lowered his voice, or even went and looked outside the door to see if anybody was eavesdropping. But the eavesdroppers if there were any have been exceedingly expert, for none was ever caught.

AN ATMOSPHERE OF SUSPICION.

On one occasion I took it into my head to chaff one of the men who behaved in this, to me, ludicrous manner about his nervousness. 'I am not suffering from nerves' he explained, "this is Hyderabad. You do not know the atmosphere in which we all live and breathe." And then he told me of an incident which he had heard on what he regarded as good authority.

On one occasion, my visitor related, the Nizam took one of his chief noblemen to task for holding opinions of which he disapproved. The Nawab denied that he had ever expressed such opinions and was rendered speechless with amazement when the Nizam told him that the night before when he was in his zenana with his wife number so and so, he had said such and such things..........He had to admit that his august ruler was relating the actual facts, although to save his soul he could not imagine how events which had taken place in the sanctity of his harem, could possibly have become known to him and in so short a time after they occured. The story may be apocryphal, probably is, but it is none the less significant,

From all I heard, it became clear to me, soon after my arrival for the second time in Hyderabad, that the council did meet and did discuss maters; but it did so fully conscious that some two or three miles away from the Council Chamber lived and laboured its master who at any moment and on any matter, great or small might take a different view from the one taken by them, and that view would

have to prevail. Being men wise in their day and not entirely aloof from worldly considerations, they naturally did their work in a manner which avoided unpleasantness as far as possible.

I use the word "unpleasantness" advisedly, for the atmosphere of the place rendered it impossible for anyone to dare to push matters to the point of conflict between the ruler and his Council. Any order which came from "King Kothi" would have to be obeyed or at least seemingly obeyed. A way might be devised to delay putting his order into execution, or even to go behind it. But it could not be opposed directly or openly—at least not with impunity.

THE MASTERFUL NIZAM.

If the Nizam had been so constituted that he would let others govern for him, matters might have been different. But he is a man of restless energy. For him it is not at all unusual to work from early in the morning till late in the evening, and sometimes even far into the night. His interest is confined to no single department of state nor is he content merely to lay down principles and leave the details to be worked out by others. He has no passions, no hobby other than keeping a strict eye upon the administration, and managing his crown property as economically as possible. He rarely goes out of 'King Kothi', and all his walking hours are devoted to making enquiries into what is happening in his extensive dominions, asking questions of every one he sees, reading papers sent up to him or perhaps called for by him, and dictating orders on every imaginable topic, on every day of the week with the exception of Friday, which devout Muslim that he is, he refuses to break except for some very special reason which cannot be avoided.

One has really to see a sheaf of Firmans come from King Kothi to the Sadar-i-Azam as the President of the

Council is called, in order to form an idea of the amount of time and energy which the Nizam puts into work week in, week out. A single batch contained 20, 30, 50 or even more Firmans.

While I was in Hyderabad, a batch used to come usually on Tuesday and Thursday evening. Often, however, they came every day. They used to be delivered in a special motor car, all sealed in an envelope so carefully that no one could tamper with it without leaving traces of his guilt behind.

I have had the copies of more than one Firman supplied to me for use in preparing the book upon which I was working, and therefore can personally attest to the elegance of the language employed by the Nizam. I was still more struck by the precision of the language, which showed that the man who had dictated the words was a clear thinker and able to express his ideas not only concisely but also very definitely, rather remarkable for an Eastern potentate. His Exalted Highness insisted upon personally signing each Firman, and since he is not the man to sign without knowing what he is signing, his signature betokened the great interest that he took in the administration of his dominions and the great pains that he bestowed upon the actual work of governing his people.

GOVERNMENT BY FIRMAN

Government in Hyderabad in consequence is government by Firman. Officials exist, and the higher ones among them constitute the Executive Council, whose functions have been clearly defined. These officials however live and work in the shadow of personal rule. Rather than take the risk of having their decisions upset, they naturally prefer to find out their master's will before passing orders even upon comparatively trivial matters, which lie well within their competence.

The highest and lowest official in Hyderabad I found, ordered his official existence upon that basis. It is idle

to expect in such a circumstance sturdy independence can exist.

To talk of the supersession of personal rule by the council type of government in Hyderabad is, therefore, mere moonshine. Officials there may bear different designations today than they did before, but the real ruler remains the same—His Exalted Highness, though as I shall show in subsequent articles, that will sometimes express itself strangely.

"The Hindu" Saturday, 4th August 1923

PUBLIC SERVICES

By St. Nihal Singh

One day while I was talking with an eminent Hyderabad official, it casually occurred to me to ask him if he could name off hand, how many of his colleagues holding high posts in the Nizam's service were either graduates and post graduates of the Anglo-Oriental college at Aligarh (now the Muslim University of Aligarh) or were in one way or another connected with that institution. I was amazed at the long list which those names made.

The member for Finance was not a graduate, but he was on the Council of the University. The Secretary for Finance was, however, a graduate; the Secretary in charge of the Medical portfolio was the adopted son of the famous Nawab who for many years, constituted, one of the main supporters of the institution, and was at least partly educated there. The Director of Public Instruction was the grandson of the founder of the college. The Principal of the Oosmania University College was a distinguished scholar of it. And thus the names went on multiplying and the list extending.

"Why not call Hyderabad an annexe of Aligarh, and be done with it?" I jocosely suggested to our friend.

"Why not", he replied, with a smile on his face.

"You would not be far wrong if you did so" he added after a moment's serious thinking.

These men who have passed through the portals of the Aligarh institution or in some other way are connected with it, are needless to point out, Muslims. Almost cent per cent of the colleagues who are holding the important posts in His Exalted Highness the Nizam's Government are also Muslims.

When I first came to Hyderabad, the President of the Executive Council (Sir Ali Imam) was a Muslim belonging not to the same sect (Sunni) to which His Exalted Highness adhered, but still a Muslim. So far as I can recollect of all his colleagues there was but one non-Muslim among them—the Hon. the Nawab Faridoon-ul-Mulk Bahadur—a Parsi of very cosmopolitan sympathies, who had had the shredwness to master Urdu, and to look upon Friday—the Muslim Sabbath—as dies non. Unless my memory serves me wrong, not a single Secretary to the Government of His Exalted Highness was a Non-Muslim.

EXCEPTIONAL NON-MUSLIMS.

